# मो.रा वाळंबे लिखित सुगम मराठी व्याकरण व लखेन विषयाच्या नोटस

## आपली भाषा लिपी व व्याकरण

भाषा म्हणजे विचार, भावना, अनुभव व कल्पना व्यक्त करण्याचे साधन असते.

भाषा मुख्यत: दोन प्रकारची आहे. १.स्वाभाविक किंवा नैसर्गिक २.कृत्रिम किंवा सांकेतिक.

मनुष्यप्राण्याची बोलण्याची भाषा किंवा हावभावाची भाषा यांची तुलना नैसर्गिक भाषेत होते. ‘भाषा’ हा शब्द ‘भाष’ या संस्कृत धातूपासून आला असून त्याचा अर्थ बोलणे किंवा बोलण्याचा व्यवहार करणे असा आहे.

लिहिण्यासाठी आपण लिपी वापरतो. लिपीचा शोध लागल्यामुळे लेखन शक्य झाले आहे.

भाषा हे एक संवादाचे प्रभावी माध्यम आहे. बोलणारा व ऐकणारा यांना जोडणारा पूल म्हणजे भाषा होय.

आपल्या घरात बोलली जाणारी भाषा म्हणजे मातृभाषा होय. मराठी आपली मातृभाषा आहे.

संस्कृत भाषा हि मराठीची जननी होय. मराठी भाषेतील पहिला शिलालेख कर्नाटकातील श्रवणबेळगोल येथील श्रीगोमटेश्वराच्या मूर्तीखाली आढळतो. ‘श्री चामुण्डराये करवियले’ हि शिलालेखातील ओळ म्हणजे मराठीतील पहिले उपलब्ध वाक्य होय. इसवी सन ९८३ च्या सुमारास हे वाक्य तिथे कोरले गेले असावे.

विवेकसिंधू हा ग्रंथ लिहिणारे आद्यकवी मुकुंदराज, श्री ज्ञानदेवी आणि अमृतानुभव हे अलोकिक ग्रंथ लिहिणारे श्री ज्ञानदेव यांनी मराठी भाषा संपन्न केली. ‘लीळाचरित्र’ हा आद्यगद्यग्रंथ लिहिणारे म्हाइभट मराठीतील प्रारंभीच्या काळातील प्रसिद्ध ग्रंथकार होत.

महाराष्ट्राची राजभाषा मराठी आहे. २७ फेब्रुवारी हा जेष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस जागतिक मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो.

आपण जी लिपी वापरतो, तिचे नाव देवनागरी लिपी आहे. बाळबोध लिपी असेही तिला म्हणतात. आपली हि देवनागरी लिपी उभ्या, आडव्या, तिरप्या, गोलसर अशा रेषांनी बनलेली आहे. लिहिणाऱ्याच्या डावीकडून उजवीकडे तिचे लेखन होते. शब्द लिहून झाल्यावर त्यावर शिरोरेघा देण्याची पद्धत आहे.

ज्या लिपीत प्रत्येक ध्वनी स्वतंत्र चिन्हाने म्हणजे र्वणाने दाखविला जातो व कोणत्याची र्वणाला एकापेक्षा जास्त ध्वनी नसतात, ती आर्दश लिपी.

देवनागरी लिपीत प्रत्येक ध्वनींना स्वतंत्र र्वण आहेत.

“मराठी असे आमुची मायबोली, जरी आज ती राजभाषा नसे” असे माधव जुलियन यांनी म्हटले आहे.

“लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी” असे सुरेश भट म्हणतात.

देवनागरी लिपीत मराठी, हिंदी, संस्कृत भाषांचे लेखन आपण करू शकतो.

## व्याकरणाच्या अभ्यासाचे महत्व

भाषेची देवाणघेवाण म्हणजेच भाषेचा व्यवहार व्यवस्थित रीतीने चालावा यासाठी काही नियम ठरविण्यात आले आहेत या नियमांनाच व्याकरण असे म्हणतात.

भाषेच्या अंगभूत नियमांची व्यवस्था म्हणजेच भाषेचे व्याकरण होय.

व्याकरण म्हणजे भाषेचे स्पष्टीकरण करणारे शास्त्र होय. व्याकरण हा शब्द

वि + आ + कृ (= करण) यांपासून बनला आहे. याचा शब्दश: र्अथ स्पष्टीकरण असा आहे.

“भाषेचे व्यवहार ज्या नियमांनी ठरविले जातात ते नियम स्पष्ट करणारे शास्त्र म्हणजे व्याकरण होय” असे श्रीपाद भागवत यांनी म्हटले आहे.

महर्षी पतंजलींनी व्याकरणाला ‘शब्दानुशासन’ असे नाव दिलेले आहे. अनुशासन म्हणजे नियमन, शिस्त.

आपल्या भाषेतील शब्दातील र्वण, त्यांचे उच्चार, शब्दसिद्धी, वाक्यरचना, वाक्यातील पदांचे, शब्दांचे परस्परसंबंध इत्यादी बाबतीत नियम घालून देणारे शास्त्र म्हणजे व्याकरण.

व्याकरण हे भाषेचे रचनास्वरूप आर्दश कसे असावेत हे प्रतिपादन करणारे शास्त्र आहे.

भाषास्वरुपात बदल होत जाणे हे भाषेच्या जिवंतपणाचे लक्षण असते. भाषा हि स्थलकालानुरूप बदलत जाते.

भाषेची घडण समजून घेताना प्रथम लक्षात येते कि भाषा वाक्यांनी बनते, वाक्य शब्दांनी बनतात आणि शब्द वर्णांनी बनतात. व्याकरणाच्या अभ्यासाचे १.र्वणविचार २.शब्दविचार ३.वाक्यविचार असे घटक आहेत.

नोटस् फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

# <u>वर्णविचार - १</u>

कोणताही विचार पूण अंथाचा असला कि त्याला 'वाक्य' असे म्हणतात.

वाक्य म्हणजे पूण अंथाचे बोलणे होय.

वाक्यातील शब्दांना पद असे म्हणतात. वाक्य शब्दांनी किंवा पदांनी बनलेले असते.

ठरविक क्रमाने आलेल्या अक्षरांच्या समूहाला काही अंथ प्राप्त झाला तर त्याला शब्द असे म्हणतात.

शब्द हे अक्षरांनी बनलेले असतात. अक्षरे या आपल्या ध्वनीच्या किंवा आवाजाच्या खुणा आहेत म्हणून अक्षरांना ध्वनिचिन्हे असे म्हणतात.

आपल्या तोंडावाटे निघणाऱ्या मुलध्वनींना आपण वंण असे म्हणतो. हे ध्वनी हवेत विरतात व नाहीसे होतात ते नष्ट होऊ नयेत म्हणून आपण लिहून ठेवतो. ( आपण ते रंगाने म्हणजे वंणाने लिहून ठेवतो म्हणून त्यांना वंण असे म्हणतात.) लिहून ठेवल्यामुळे ध्वनी हे नाश पावत नाहीत ते कायम राहतात म्हणून त्यांना अक्षर ( म्हणजे नाश न पावणारे ) असे म्हणतात.

मराठी भाषेतील वंणमाला पुढीलप्रमाणे आहे.

## वर्णमाला

मराठी भाषेतील वर्णमाला पुढीलप्रमाणे आहे -

| | |
|---|---|
| स्वर : - | अ आ इ ई उ ऊ ऋ लृ ए ॲ ऐ ओ ऑ औ |
| स्वरादी : - | ं (अं) : (अः) |
| व्यंजने :- | क् ख् ग् घ् ङ् |
| | च् छ् ज् झ् ञ् |
| | ट् ठ् ड् ढ् ण् |
| | त् थ् द् ध् न् |
| | प् फ् ब् भ् म् |
| | य् र् ल् व् |
| | श् ष् स् |
| | ह् ळ् |
| संयुक्त व्यंजने :- | क्ष् ज्ञ् |

# <u>वर्णांचे प्रकार</u>

**१.स्वर** :- स्वरू म्हणजे उच्चार करणे, ध्वनी करणे या र्वणमालेतील अ पासून औ पर्यंतच्या बारा वर्णांना स्वर असे म्हणतात.

स्वरांचा उच्चार करताना ओठांच्या किंवा जिभेच्या विविध हालचाली होत असतात पण

ओठांचा एकमेकांशी किंवा जिभेच्या कोणत्याही भागाचा मुखातील कोणत्याही अवयवाशी र्स्पश न होता मुखावाटे जे ध्वनी बाहेर पडतात त्यांना स्वर असे म्हणतात.

स्वरांचा उच्चार करतेवेळी हवेचा र्माग अडवलेला नसतो. स्वर म्हणजे नुसते सूर.

**२.स्वरादी** - अं व अ: या दोन वर्णांना स्वरादी असे म्हणतात. यात अनुस्वार (ं) व विर्सग (:) असे दोन उच्चार आहेत. अनुस्वार व विर्सग यांचा उच्चार करताना या वर्णांच्या अगोदर स्वर येतो म्हणून त्यांना स्वरादी असे म्हणतात. उदाहरर्णाथ अंगण, शंकर , किंकर, मन:स्थिती , दु:ख

**अनुस्वार** - अनुस्वाराचा उच्चार स्पष्ट व खणखणीत होतो असे काही शब्द आहेत. उदाहरर्णाथ गंगा, घंटा, उंट, इंधन, इत्यादी

काही वेळा अनुस्वरांचा उच्चार अस्पष्ट, ओझरता होतो. उदाहरर्णाथ देवांनी, घरांमध्ये

**स्पष्ट व खणखणीत उच्चांराना अनुस्वार असे म्हणतात, तर ओझरत्या अन अस्पष्ट उच्चारांना अनुनासिक असे म्हणतात.**

**विसर्ग** - विर्सग याचा अर्थ श्वास सोडणे होय. विर्सगाचा उच्चार 'ह' या र्वणाला थोडा हिसडा देऊन केलेल्या उच्चारासारखा आहे.

**३.व्यंजन** - मराठी र्वणमालेतील क, ख,.......पासून ह,ळ पर्यंतचे र्वण व्यंजन आहेत. ज्यांचा स्वतंत्रपणे उच्चार करता येत नाही त्यांना व्यंजने म्हणतात. ज्या वर्णांचा उच्चार स्वरांच्या साहायावाचून र्पूण होत नाही त्यांना व्यंजने म्हणतात.

**अक्षरे** - अक्षरे म्हणजे र्पूण उच्चारलेले र्वण. अ आ इ ई वगेरे स्वर र्पूण उच्चारांचे आहेत.

**सर्व स्वर व स्वरयुक्त व्यंजने यांना अक्षरे म्हणतात.**

प्रत्येक व्यंजनात अ, आ, इ, ई, उ, ऊ , ए, ए, ओ, औ हे दहा स्वर व अं, अ: यांची चिन्हे मिळवून आपण बारा अक्षरे तयार करतो त्याला आपण बाराखडी किंवा बाराक्षरी असे म्हणतात.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या. धन्यवाद

# स्वरांचे प्रकार

**१.ह्रस्व स्वर व दीर्घ स्वर** - अ, इ, उ, ऋ, लृ या स्वरांचा उच्चार आखूड होतो, त्यांचा उच्चार करण्यास कमी वेळ लागतो म्हणून त्यांना ह्रस्व स्वर असे म्हणतात.
आ, ई, उ, ऊ, ए, ए, ओ, औ या स्वरांचा उच्चार करण्यास अधिक वेळ लागतो, त्यांचा

उच्चार लांबट होतो म्हणून त्यांना दीघ स्वर असे म्हणतात.

**२.संयुक्त स्वर** - दोन स्वर एकत्र येवून बनलेल्या स्वरांना संयुक्त असे म्हणतात. ए, ए, ओ, औ, हे संयुक्त स्वर आहेत.
ह्रस्व स्वरांचा उच्चार करण्यास जो वेळ लागतो त्याला एक मात्रा मानतात.
दीघ स्वर व संयुक्त स्वर यांचा उच्चार करण्यास दोन मात्रा मानतात.

**३.सजातीय स्वर व विजातीय स्वर** - एकाच उच्चारस्थानातून निघणाऱ्या स्वरांना सजातीय स्वर असे म्हणतात. उदाहरर्णाथ अ-आ , इ-ई, उ-ऊ

भिन्न उच्चारस्थानातून निघणाऱ्या स्वरांना विजातीय स्वर असे म्हणतात.
उदाहरर्णाथ अ-इ, अ-उ, इ-ए, ऊ-ए, अ-ऋ

आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

## व्यंजनांचे प्रकार

**महाप्राण व अल्पप्राण व्यंजने**

| अल्पप्राण | महाप्राण | अल्पप्राण | महाप्राण |
|---|---|---|---|
| क् | ख् (क् + ह्) | ग् | घ् (ग् + ह्) |
| च् | छ् (च् + ह्) | ज् | झ् (ज् + ह्) |
| ट् | ठ् (ट् + ह्) | ड् | ढ् (ड् + ह्) |
| त् | थ् (त् + ह्) | द् | ध् (द् + ह्) |
| प् | फ् (प् + ह्) | ब् | भ् (ब् + ह्) |

# <u>वर्णविचार - २</u>

क्ष व ज्ञ मुलध्वनी आहेत असे वाटते प्रत्यक्षात ती संयुक्त व्यंजने आहेत म्हणून त्यांचा समावेश र्वणमालेत करत नाहीत.

उच्चारस्थानांनुसार वर्णांचे वर्गीकरण

| स्वर | व्यंजने | मुखाचा भाग | वर्णाचे नाव |
|---|---|---|---|
| अ, आ | क्, ख्, ग्, घ्, ङ्, ह् | कंठ | कंठ्य |
| इ, ई | च्, छ्, ज्, झ्, ञ्, य्, श् | तालू | तालव्य |
| ऋ | ट्, ठ्, ड्, ढ्, ण्, र्, ष्, ळ् | मूर्धा | मूर्धन्य |
| लृ | त्, थ्, द्, ध्, न्, ल्, स् | दंत | दंत्य |
| उ, ऊ | प्, फ्, ब्, भ्, म् | ओष्ठ | ओष्ठ्य |
| ए, ऐ | - | कंठ + तालू | कंठतालव्य |
| ओ, औ | - | कंठ + ओष्ठ | कंठौष्ठ्य |
| - | व | दंत + ओष्ठ | दंतौष्ठ्य |
| - | च्, छ्, ज्, झ् | दंत + तालू | दंततालव्य |

मराठी र्वणमालेत एकंदरीत ५० र्वण आहेत.

च, छ, ज, झ, त्र, य, श हे तालव्य र्वण आहेत मात्र त्यांचा उच्चार य ने युक्त होतो. उदाहरर्णाथ च्य, ज्य

च, छ, ज, झ यांचा उच्चार तालव्य व दंततालव्य असा दुहेरी होतो.

नोट्स फुकट मिळत आहेत तर

## <u>जोडाक्षरांचे लेखन</u>

एकच व्यंजन दोन वेळा जोडले गेले कि त्या संयुक्त व्यंजनाला द्‌वित असे म्हणतात.

उदाहरर्णाथ क + क = क्क,  त + त = त्त

ज्या अक्षरात दोन किंवा अधिक व्यंजने एकत्र येऊन शेवटी त्यात एक स्वर मिसळतो त्यास जोडाक्षरे असे म्हणतात. उदाहरर्णाथ विद्‌यालय मध्ये द्‌या (द + य + आ )

मध्ये उभा दंड असणारी व्यंजने - क, फ

शेवटी उभा दंड असणारी व्यंजने  - ग , ण , श

अर्धा दंड असणारी आणि अर्धी होऊ शकणारी व्यंजने - छ , ल, ळ

अर्धा दंड असणारी पण अर्धी होऊ न शकणारी व्यंजने - ट, ठ, ड, ढ, द, ह

दंड नसलेले व्यंजन - र

मराठीत प्रत्येक वर्णाचा पूर्णोच्चार होतो. त्याशिवाय त्याचे लांबट व तोकडा (निभृत) असेही उच्चार होतात.

## संधी - स्वरसंधी

जोडशब्द तयार करताना पहिल्या शब्दातील शेवटचा वर्ण व दुसऱ्या शब्दातील पहिला वर्ण हे एकमेकांमध्ये मिसळतात आणि त्या दोघांबद्दल एकच वर्ण तयार होतो, वर्णांच्या अशा एकत्र होण्याच्या प्रकारास संधी असे म्हणतात.

संधी म्हणजे सांधणे, जोडणे होय.

## संधीचे प्रकार

**१.स्वरसंधी** - एकमेकांशेजारी येणारे वर्ण हे जर स्वराने जोडले असतील, तर त्यांना स्वरसंधी असे म्हणतात. स्वरसंधीचे स्वरूप स्वर + स्वर असे असते.
उदाहरर्णाथ कवि + ईश्वर = कवीश्वर (इ + ई = ई)

**२.व्यंजनसंधी** - जवळजवळ येणाऱ्या दोन वर्णांपैकी दोन्ही वर्ण व्यंजने असतील किंवा पहिला वर्ण व्यंजन व दुसरा वर्ण स्वर असेल तर त्याला व्यंजनसंधी असे म्हणतात.
उदाहरर्णाथ सत + जन = सज्जन (त + ज), चित + आनंद = चिदानंद (त + आ)

**३.विसर्गसंधी** - एकत्र येणाऱ्या वर्णातील पहिला विर्सग व दुसरा वर्ण व्यंजन किंवा स्वर असेल तेंव्हा त्यास विर्सगसंधी असे म्हणतात. विर्सग + व्यंजन किंवा विर्सग + स्वर असे त्याचे स्वरूप असते. उदाहरर्णाथ तप: + धन = तपोधन (विर्सग + ध),
दु: + आत्मा = दुरात्मा (विर्सग + आ)

**दोन सजातीय स्वर लागोपाठ आल्यास त्या दोघांबद्दल त्याच जातीतील एकच दीर्घ स्वर येतो याला सजातीय स्वरसंधी किंवा दिर्घत्वसंधी असे म्हणतात.**

नोट्स फुकट मिळत आहेत तर त्याचा उपयोग करून द्या धन्यवाद

## सजातीय स्वरसंधीची उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.

**अ + अ = आ**

१.र्सूय + अस्त = र्सूयास्त

२.कट + अक्ष = कटाक्ष

३.रूप + अंतर = रुपांतर

४.स्वभाव + अनुसार = स्वभावानुसार

५.मिष्ट + अन्न = मिष्टान्न

६.स + अभिनय = साभिनय

७.प्रथम + अध्याय = प्रथमाध्याय

८.सह + अध्यायी = सहाध्यायी

९.पुरुष + र्अथ = पुरुर्षाथ

१०.सह + अनुभूती = सहानुभूती

११.मंद + अंध = मंदांध

**अ + आ = आ**

१.देव + आलय = देवालय

२.हिम + आलय = हिमालय

३.फल + आहार = फलाहार

४.अनाथ + आश्रम = अनाथाश्रम

५.गोल + आकार = गोलाकार

६.मंत्र + आलय = मंत्रालय

७.शिशिर + आगमन = शिशिरागमन

८.प्रथम + अध्याय = प्रथमाध्याय

९.धन + आदेश = धनादेश

१०.जन + आदेश = जनादेश

११.दुख: + र्आत = दुर्खात

१२.नील + आकाश = नीलाकाश

१३.र्काय + आरंभ = र्कायारंभ

**आ + अ = आ**

१.विद्या + अर्थी = विद्यार्थी

२.विद्या + अमृत = विद्यामृत

३.भाषा + अंतर = भाषांतर

**आ + आ = आ**

१.महिला + आश्रम = महिलाश्रम

२.राजा + आश्रय = राजाश्रय

३.कला + आनंद = कलानंद

४.विद्या + आलय = विद्यालय

५.राजा + आज्ञा = राजाज्ञा

६.चिंता + आतुर = चिंतातुर

**इ + इ = ई**

१.मुनी + इच्छा = मुनीच्छा

२.कवि + इच्छा = कवीच्छा

३.अभि + इष्ट = अभीष्ट

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

**इ + ई = ई**

१.गिरि + ईश = गिरीश

२.कवि + ईश्वर = कवीश्वर

३.परि + ईक्षा = परीक्षा

**ई + इ = ई**

१.गोमती + इच्छा = गोमतीच्छा

२.रवी + इंद्र = रवींद्र

३.मही + इंद्र = महिंद्र

**ई + ई = ई**

१.मही + ईश = महीश

२.पार्वती + ईश = पार्वतीश

**उ + उ = ऊ**

१.गुरु + उपदेश = गुरुपदेश

२.भानु + उदय = भानुदय

**ऊ + उ = ऊ**

१.भू + उद्धार = भूद्धार

२.वधू + उत्कर्ष = वधूत्कर्ष

३.लघू + उत्तरी = लघूत्तरी

**ऋ + ऋ = ऋ**

मातृ + ऋण = मातृण

**संधी होताना एका वर्णाच्या जागी दुसरा वर्ण येणे म्हणजे बदल होणे याला आदेश असे म्हणतात.**

अ किंवा आ + इ किंवा ई = ए

अ किंवा आ + उ किंवा ऊ = ओ

अ किंवा आ + ऋ = अर

**वरील प्रकारे दोन वर्ण एकत्र येऊन ए, ओ, अर असे बदल झाल्यास याला गुणादेश असे म्हणतात.**

नोट्स फक्त विकत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

## गुणादेशाची उदाहरणे पुढीलप्रमाणे

१.ईश्वर + इच्छा = ईश्वरेच्छा
२.स्व + इच्छा = स्वेच्छा
३.लोक + इच्छा = लोकेच्छा
४.मनुष्य + इतर = मनुष्येत्तर
५.राष्ट्र + इतिहास = राष्ट्रेतिहास
६.गण + ईश = गणेश
७.राम + ईश्वर = रामेश्वर
८.गुण + ईश = गुणेश
९.महा + इंद्र = महेंद्र
१०.यथा + इष्ट = यथेष्ट
११.ज्ञान + ईश्वर = ज्ञानेश्वर
१२. रमा + ईश = रमेश
१३.उमा + ईश = उमेश
१४.महा + ईश = महेश
१५.अयोध्या + ईश = अयोध्येश
१६.राजा + ईश = राजेश
१७.लंका + ईश्वर = लंकेश्वर
१८.चंद्र + उदय = चंद्रोदय
१९.सूंय + उदय = सूर्योदय
२०.पुरुष + उत्तम = पुरुषोत्तम
२१.अन्य + उक्ती = अन्योक्ती
२२.निर्सग + उपचार = निसर्गोपचार
२३.गणेश + उत्सव = गणेशोत्सव
२४.प्रश्न + उत्तर = प्रश्नोत्तर
२५.दीघ + उत्तरी = दिर्घोत्तरी
२६.स्वभाव + उक्ती = स्वभावोक्ती
२७.अल्प + उपहार = अल्पोपहार
२८.राष्ट्र + उत्तेजक = राष्ट्रोत्तेजक
२९.उत्तम + उत्तम = उत्तमोत्तम
३०.सह + उदर = सहोदर
३१. पर + उपकार = परोपकार
३२.नर + उत्तम = नरोत्तम
३३.समुद्र + उर्मी = समुद्रोर्मी
३४.एक + ऊन = एकोन
३५.जल + उर्मी = जलोर्मी
३६.गंगा + उदक = गंगोदक
३७.महा + उत्सव = महोत्सव
३८.धारा + उष्ण = धारोष्ण
३९.गंगा + उर्मी = गांगोर्मी
४०.सप्त + ऋषी = सप्तर्षी
४१.देव + ऋषी = देवर्षी
४२.ब्रम्ह + ऋषी = ब्रम्हर्षी
४३.महा + ऋषी = महर्षी
४३.राजा + ऋषी = राजर्षी

**अ किंवा आ + ए किंवा ए = ए , अ किंवा आ + ओ किंवा औ = औ**
**वरील प्रकारे स्वर तयार झाल्यास यास वृद्धयादेश असे म्हणतात.**

**वृद्धयादेश याची उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.**

१.क्षण + एक = क्षणेक
२.एक + एक = एकेक
३.सदा + एव = सदेव
४.मत + ऐक्य = मतेक्य
५.जन + ऐक्य = जनेक्य
६.प्रजा + ऐक्य = प्रजेक्य
७.विद्या + ऐश्र्वय = विद्येश्र्वय
७.जल + औघ = जलौघ

८.गंगा + औघ = गंगौघ

९.यमुना + औघ = यमुनौघ

१०.वृक्ष + औदार्य = वृक्षोर्दाय

११.बाल + औत्सुक्य = बालोत्सुक्य

१२.वन + औषधी = वनौषधी

१३.महा + औदार्य = महौर्दाय

१४.क्षमा + औचित्य = क्षमौचित्य

**इ, उ, ऋ (ह्रस्व किंवा दीर्घ) यांच्या पुढे विजातीय स्वर आल्यास इ किंवा ई बद्दल य , उ किंवा ऊ बद्दल व , तर ऋ बद्दल र वर्ण येतात आणि त्यात पुढील स्वर मिसळून संधी होते अशा प्रकारे य, व, र असे बदल होतात त्याला यणादेश असे म्हणतात.**

**यणादेश याची उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.**

१.प्रीती + र्अथ = प्रीर्त्यथ

२.अति + अल्प = अत्यल्प

३.अति + अंत = अत्यंत

४.प्रती + अक्ष = प्रत्यक्ष

५.प्रती + अंतर = प्रत्यंतर

६.इति + आदी = इत्यादी

७.अति + आचार = अत्याचार

८.अति + आनंद = अत्यानंद

९.वि + आसंग = व्यासंग

१०.अति + उत्तम = अत्युतम

११.नदी + उद्गम = नदयुदगम

१२.प्रीती + एक = प्रत्येक

१३.किती + एक = कित्येक

१४.मनु + अंतर = मन्वंतर

१५.अनु + र्अथ = अर्न्वथ

१५.सु + अल्प = स्वल्प

१६.गुरु + आज्ञा = गुर्वाज्ञा

१७.हेतू + आभास = हेत्वाभास

१८.सु + आनंद = स्वानंद

१९.सु + आगत = स्वागत

२०.भानू + ईश्वर = भान्वीश्वर

२१.पितृ + आज्ञा = पित्राज्ञा

२२.पितृ + और्दाय = पित्रोर्दाय

**ए, ए, ओ, औ या स्वरांपुढे स्वर आला तर त्याबद्दल अनुक्रमे अय, आय, अव, आव असे आदेश होऊन पुढील स्वर त्यात मिसळतो.**

**या नियमाची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.ने + अन = नयन

२.गै + अन = गायन

३.गो + ईश्वर = गवीश्वर

४.नौ + इक = नाविक

५.पो + अन = पवन

६.पौ + अन = पावन

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

# <u>व्यंजनसंधी</u>

**प्रथम व्यंजन संधीची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.विपद + काल = विपत्काल
२.वाग + पति = वाक्पति
३.वाग + ताडन = वाक्ताडन
४.षड + शास्त्र = षटशास्त्र
५.क्षुध + पिपासा = क्षुत्पिपासा
६.आपद + काल = आपत्काल
७.शरद + काल = शरत्काल
८.क्षुद + पीडा = क्षुत्पीडा

**तृतीय व्यंजनसंधीची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.वाक + विहार = वाग्विहार
२.षट + रिपू = षड्रिपू
३.सत + आचार = सदाचार
४.उत + गम = उद्गम
५.उत + ध्वस्त = उदध्वस्त
६.सच्चित + आनंद = सच्चिदानंद
७.सत + वासना = सदवासना
८.विद्युत + दीप = विद्युदीप
९.भगवत + भक्ती = भगवदभक्ती
१०.अच + आदी = अजादी
११.अप + ज = अब्ज
१२.जगत + ईश्वर = जगदीश्वर
१३.षट + आनन = षडानन
१४.सत + भावना = सदभावना
१५.दिक + विजय = दिग्विजय
१६.भगवत + गीता = भगवद्गीता
१७.दिक + अंबर = दिगंबर
१८.दिक + गज = दिग्गज
१९.दिक + अंत = दिगंत

**अनुनासिक संधीची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.षट + मास = षण्मास
२.जगत + नाथ = जगन्नाथ
३.सत + मत = सन्मती
४.चित + मय = चिन्मय
५.मत + माता = मन्माता
६.तत + मय = तन्मय
७.सत + र्माग = सन्र्माग
८.भगवत + नाम = भगवन्नाम
९.षट + मुख = षण्मुख
१०.वाक + मय = वांग्मय
११.जगत + नियंता = जगन्नीयंता
१२.वाक + निरस = वांगनिरस
१३.वाक + निश्चय = वांगनिश्चय
१४.दिक + मूढ = दिंगमूढ

**त या व्यंजनापुढे ज किंवा झ आल्यास त बद्दल ज होतो व पुढील वर्णाबरोबर संधी होते. या नियमाची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.उत् + ज्वल = उज्ज्वल
२.सत + जन = सज्जन

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

३.जगत + जीवन = जगज्जीवन ४.यावत + जीवन = यावज्जीवन

५.शरत + झंझावत = शरज्झंझावत

**त या व्यंजनापुढे ट किंवा ठ आल्यास त बद्दल ट होतो.**

**या नियमाची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.तत + टीका = तटटीका

**त या व्यंजनापुढे ल आल्यास त बद्दल ल येतो.**

**या नियमाची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.उत + लंघन = उल्लंघन २.उत + लेख = उल्लेख

३.तत + लीन = तल्लीन ४.विद्युत + लता = विद्यूल्लता

**त या व्यंजनापुढे श आल्यास त बद्दल च होतो व पुढील श बद्दल छ होतो.**

**या नियमाची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.सत + शिष्य = सच्छीष्य २.सत + शील = सच्छिल

३.मृत + शकटिक = मूर्च्छकटिक ४.उत + शिष्ट = उच्छीष्ट

**त या व्यंजनापुढे ह आल्यास त बद्दल द होतो व पुढील व बद्दल ध होतो.**

उदाहरर्णाथ तत + हित = तद्धित

**म पुढे स्वर आल्यास तो म मध्ये मिसळतो परंतु व्यंजन आल्यास म चा लोप होतो व मागील अक्षरावर अनुस्वार येतो.**

**या नियमाची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.सम + आचार = समाचार २.सम + गती = संगती

३.सम + आलोचन = समालोचन ४.सम + ताप = संताप

५.सम + तोष = संतोष ६.सम + मती = संमती

७.सम + योग = संयोग ८.किम + कर = किंकर

९.सम + कल्प = संकल्प १०.सम + बंध = संबंध

११.सम + पूण = संपूण

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

**छ पूर्वी ह्रस्व स्वर आला तर त्या दोघांमध्ये च हा वर्ण येतो.**

**या नियमाची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.रत्न + छाया = रत्नचछाया

२.रंग + छटा = रंगचछटा

३.शब्द + छल = शब्दचछल

## विसर्ग संधी

**विसर्गाच्या मागे अ हा स्वर असून पुढे मृदू व्यंजन आल्यास विसर्गाचा उ होतो व तो मागील अ मध्ये मिसळून त्याचा ओ होतो याला विसर्ग उ कार संधी असे म्हणतात.**

**या नियमाची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.यश: + धन = यशोधन

२.तेज: + निधी = तेजोनिधी

३.मन: + राज्य = मनोराज्य

४.मन: + बल = मनोबल

५.मन: + रथ = मनोरथ

६.मन: + रंजन = मनोरंजन

७.रज: + गुण = रजोगुण

८.यश: + गिरी = यशोगिरी

९.मन: + वृत्ती = मनोवृत्ती

१०.अध: + वदन = अधोवदन

११.तप: + बल = तपोबल

**विसर्गाच्या मागे अ किंवा आ खेरीज कोणताही स्वर असून पुढे मृदू वर्ण आल्यास विसर्गाचा र होतो व पुढील वर्णाबरोबर संधी होते. याला विसर्ग र संधी असे म्हणतात.**

**या नियमाची उदाहरणे पुढीलप्रमाणे**

१.नि: + अंतर = निरंतर

२.दु: + जन = र्दुजन

३.बहि: + अंग = बहिरंग

४.दु: + आत्मा = दुरात्मा

५.नि: + विकार = निर्विकार

६.धनु: + विद्या = धनुर्विद्या

७.नि: + इच्छा = निरिच्छआ

८.नि: + लोभ = निर्लोभ

९.दु: + दैव = दुर्दैव

१०.नि: + उद्योग = निरूद्योग

११.दु: + वासन = दुर्वासन

१२.आशी: + वचन = आशीर्वचन

१३.दु: + गती = र्दुगती

१४.आयु: + वेद = आयुर्वेद

१५.धनु: + वात = धनुर्वात

**विसर्गाच्या मागे इ किंवा उ असून पुढे क, ख, प, फ हे वर्ण आले तर विसर्गाचा र होऊन संधी होते.**

१.नि: + र्कष = निर्ष्कष

२.दु: + काळ = दुष्काळ

३.नि: + कारण = निष्कारण

४.नि: + पाप = निष्पाप

५.नि: + फळ = निष्फळ

६.नि: + कपट = निष्कपट

७.दु: + कीर्ती = दुष्कीर्ती

८.बहि: + कृत = बहिष्कृत

९.दु: + परीणाम = दुष्परिणाम

१०.बहि: + कार = बहिष्कार

११.दु: + कर = दुष्कर

**विसर्गाच्या मागे अ हा स्वर असून पुढे क, ख, प, फ हि कठोर व्यंजने आली तर विसर्ग कायम राहतो परंतु पुढे स्वर आल्यास विसर्ग लोप पावतो.**

१.रज: + कण = रज:कण

२.प्रात: + काल = प्रात:काल

३.अध: + पात = अध:पात

४.इत: + पर = इत:पर

५.तेज: + पंज = तेज:पंज

६.इत: + उत्तर = इतउत्तर

७.अत + एव = अतएव

**पदाच्या शेवटी र येवून त्याच्यापुढे कठोर व्यंजन आल्यास र चा विसर्ग होतो.**

१.अंतर + करण = अंत:करण

२.चतुर + सूत्री = चतु:सूत्री

**पहिल्या पदाच्या शेवटी स येवून त्याच्या पुढे कोणतेही व्यंजन आल्यास स चा विसर्ग होतो.**

१.मनस + पटल = मन:पटल

२.तेजस + कण = तेज:कण

**विसर्गाच्या ऐवजी येणाऱ्या र च्या मागे अ व पढे मद वर्ण आल्यास तो र तसाच राहन संधी होते.**

१.पुनर + जन्म = पुर्नजन्म

२.अंतर + आत्मा = अंतरात्मा

३.अंतर + गत = अंर्तगत

४.पुनर + उक्ती = पुनरुक्ती

५.पुनर + उच्चार = पुनरुच्चार

**विसर्गाच्या पुढे च किंवा छ आल्यास विसर्गाचा श होतो. त किंवा थ आल्यास स होतो.**

१.नि: + चल = निश्चल

२.दु: + चिन्ह = दुश्चिन

३.मन: + ताप = मनस्ताप

४.नि: + तेज = निस्तेज

५.मन: + चक्षु = मनश्चक्षु

नोट्स फक्त मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

**विसर्गाच्या पुढे कृ धातूची रूपे असल्यास विसर्गाचा स होऊन संधी होते.**

१.नम: + कार = नमस्कार
२.पूर: + कार = पुरस्कार
३.वय: + कर = वयस्कर
४.भा: + कर = भास्कर
५.तिर: + कार = तिरस्कार

## मराठीतील विशेष संधी

**पूर्वरूपसंधी - कधी कधी शब्दांची संधी होत असताना एकत्र येणाऱ्या दोन स्वरांपैकी पहिला स्वर कायम राहतो व दुसरा स्वर लोप पावतो याला पूर्वरूपसंधी म्हणतात.**
**पूर्वरूपसंधीची उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.**

१.नाही + असा = नाहीसा
२.नदी + आत = नदीत
३.साजे + असा = साजेसा
४.आळी + आत = आळीत
५.खिडकी + आत = खिडकीत
६.चांगले + असे = चांगलेसे
७.लाडू + आत = लाडूत

**पररूपसंधी - काही मराठीतील शब्दांची संधी होताना एकत्र येणाऱ्या दोन स्वरांपैकी पहिल्या स्वराचा लोप होतो व दुसरा स्वर कायम राहतो अशा प्रकारच्या संधीला**
**पररूपसंधी असे म्हणतात.**
**पररूपसंधीची उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.**

१.हात + ऊन = हातून
२.घर + ई = घरी
३.न + उमजे = नुमजे
४.एक + एक = एकेक
५.भरड + ऊन = भरडून
६.चिंधी + ओटी = चिंधोटी
७.हर + एक = हरेक

**दीर्घ स्वरापुढे येणाऱ्या स्वराची मागील स्वराशी बहुतेककरून संधी होत नाही.उदाहरणार्थ**

१. जा + ऊन = जाऊन
२.हो + ऊ = होऊ
३. घे + ईल = घेईल

**'ही' हे शब्दयोगी अव्यय मागील संख्याविशेषणाबरोबर संधी होताना दोन प्रकारे लिहिले जाऊ शकते. उदाहणार्थ**

१.दोन + ही = दोन्ही / दोनी
२.चार + ही = चाऱ्ही / चारी

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

**अनुस्वार, अनुरूप या शब्दांबरोबर संधी होताना मागील शब्दाचे सामान्यरूप होते.**

१.पद्धत + अनुसार = पद्धतीनुसार २.गरज + अनुसार = गरजेनुसार

३.विषय + अनुरूप = विषयानुरूप

## मराठीतील काही इतर संधी

१.गेली + आहे = गेलीहे / गेलीय २.बसला + आहात = बसलात / बसलाआहात

३.येतो + आहे = येतोहे / येतोय

## शब्दविचार

वाक्यात वापरताना शब्दाच्या मूळ रुपात बदल करून त्या शब्दाचे जे रूप तयार होते त्यास पद असे म्हणतात.

व्याकरणात पदांनादेखील स्थूलमानाने शब्द असे म्हटले जाते.

मूळ शब्दाला व्याकरणात प्रकृती असे म्हणतात. विकृती म्हणजे शब्दाच्या मूळ रूपाचे बदललेले रूप. यालाच पद असे म्हणतात. उदाहरर्णाथ स्वातीने हे पद आहे. यात मूळ शब्द स्वाती आहे. म्हणजेच प्रकृती स्वाती आहे तर ने हा प्रत्यय लागून स्वातीने असे जे मूळ रूपाचे बदललेले रूप आहे त्याला विकृती असे म्हणतात. विकृतीलाच पद असे म्हणतात. वाक्य हे शब्दांचे किंवा पदांचे बनलेले असते.

## शब्दांच्या जाती

१.वाक्यात येणाऱ्या शब्दांपैकी जे शब्द प्रत्यक्षात असलेल्या किंवा काल्पनिक वस्तंची किंवा त्यांच्या गुणांची नावे असतात, त्यांना नामे असे म्हणतात. उदाहरर्णाथ फूल, हरी, गोडी इत्यादी

२.जे शब्द कोणत्याही प्रकारच्या नामांच्या ऐवजी येतात त्यांना सर्वनामे असे म्हणतात. उदाहरर्णाथ मी, तू, हा, जो, कोण इत्यादी

३.जे शब्द नामाबद्दल अधिक माहिती सांगतात व त्यांचे क्षेत्र मर्यादित करतात त्यांना विशेषणे असे म्हणतात. उदाहरर्णाथ कडू, गोड, दहा, त्याचा इत्यादी.

४.जे शब्द क्रिया दाखवून वाक्याचा अर्थ पूर्ण करतात त्यांना क्रियापदे असे म्हणतात. उदाहरर्णाथ बसतो, जाईल, आहे इत्यादी

नोट्स फुकट मिळत आहेत तर त्याचा उपयोग करून घ्या धन्यवाद

५.जे शब्द क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगतात त्यांना क्रियाविशेषणे असे म्हणतात. उदाहरर्णाथ आज, काल, तिथे, फार इत्यादी

६.जे शब्द नामांना किंवा सर्वनामांना जोडून येतात व वाक्यातील शब्दांचा संबंध दाखवतात त्यांना शब्दयोगी अव्यय असे म्हणतात. उदाहरर्णाथ झाडाखाली, तिच्याकरिता, त्यासाठी इत्यादी

७.जे शब्द दोन शब्द किंवा दोन वाक्ये जोडतात त्यांना उभयान्वयी अव्यय असे म्हणतात. उदाहरर्णाथ व, आणि, परंतु, म्हणून इत्यादी

८.जे शब्द आपल्या मनातील वृत्ती किंवा भावना व्यक्त करतात त्यांना केवलप्रयोगी अव्यय असे म्हणतात. उदाहरर्णाथ शाब्बास, अबब, अरेरे इत्यादी

**शब्दांचे असे आठ प्रकार आहेत त्यांनाच शब्दांच्या आठ जाती असे म्हणतात.**

बदल होणे याला व्याकरणात विकार असे म्हणतात.

शब्दांच्या आठ जातींपैकी नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद ही चार विकारी आहेत म्हणजेच त्यांच्यात लिंग, वचन, विभक्ती यामुळे बदल होतो.

क्रियाविशेषण, शब्दयोगी, उभयान्वयी व केवलप्रयोगी ही चार अविकारी आहेत म्हणजेच त्यांच्यात लिंग, वचन, विभक्ती यामुळे बदल होत नाही.

विकारी व अविकारी यांना अनुक्रमे सव्यय व अव्यय असे म्हणतात.

नोट्स फुकट मिळत आहेत म्हणून चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

## <u>नामे</u>

प्रत्यक्षात असणाऱ्या किंवा कल्पनेने जाणलेल्या वस्तूंना किंवा त्यांच्या गुणर्धमाना दिलेली जी नावे असतात त्यांना व्याकरणात नामे असे म्हणतात. उदाहरर्णाथ पुस्तक, चेंडू, कागद, मुलगा, हरी, वामन, साखर, देव, स्र्वग, अप्सरा, नंदनवन, गोडी, धैय, खरेपणा, और्दाय, विदवत्ता इत्यादी

**नामाचे मुख्य तीन प्रकार आहेत. १.सामान्यनाम २.विशेषनाम ३.भाववाचक नाम**

**१.सामान्यनाम** - एकाच जातीच्या पर्दाथातील समान गुणर्धमामुळे त्या वस्तूला सर्वसामान्य नाव दिले जाते त्याला सामान्यनाम असे म्हणतात. सामान्यनाम हे त्या वस्तूच्या जातीला दिलेले नाम आहे. उदाहरर्णाथ मुलगा, लेखणी, घर, शाळा इत्यादी

(कळप, र्वग, सैन्य, घड, समिती हि समूहाला दिलेली नामे आहेत यांना कोणी समुदायवाचक नामे असे म्हणतात. तसेच सोने, तांबे, दुध, साखर, कापड हे संख्येशिवाय इतर परिमानानी मोजण्याचे पर्दाथ म्हणून त्यांना कोणी पर्दाथवाचक नामे असे म्हणतात पण मराठीत या सर्वांची गणना सामान्यनामातच होते.)

**२.विशेषनाम** - ज्या नामाने जातीचा बोध होत नसून त्या जातीतील एका विशिष्ट व्यक्तीचा , प्राण्याचा किंवा वस्तूचा बोध होतो त्यास विशेषनाम असे म्हणतात.
उदाहरर्णाथ रामा, हरी, आशा, हिमालय, गंगा, भारत इत्यादी.

विशेषनाम हे व्यक्तिवाचक असते तर सामान्यनाम हे जातिवाचक असते.

**३.भाववाचक नाम** - ज्या नामाने प्राणी किंवा वस्तू यांच्यामध्ये असलेल्या गुण, र्धम, किंवा भाव यांचा बोध होतो त्याला भाववाचक नाम किंवा र्धमवाचक नाम असे म्हणतात.
उदाहरर्णाथ धैर्य, कीर्ती, चांगुलपणा, वात्सल्य, गुलामगिरी, आनंद इत्यादी
पर्दाथाच्या गुणाबरोबरच स्थिती किंवा क्रिया दाखविणाऱ्या नामांना भाववाचक नामे असेच म्हणतात. उदाहरर्णाथ र्वाधक्य, बाल्य, तारुण्य, मरण, धाव, हास्य, चोरी, उड्डाण, नृत्य इत्यादी

सामान्यनाम किंवा विशेषनाम यांनी प्रत्येक्ष किंवा काल्पनिक प्राणी किंवा वस्तू यांचा बोध होतो, भाववाचक नामाने प्राणी किंवा वस्तू यांचा बोध होत नसून त्यांच्यातील गुणांचा किंवा र्धमाचा बोध होतो.

सामान्यनामाचे अनेकवचन होऊ शकते, पण विशेषनामे व भाववाचक नामे ही एकवचनीच असतात.

सामान्यनामे आणि विशेषनामे यांना र्धमिवाचक नामे म्हणतात. धर्मी म्हणजे ज्यात र्धम किंवा गुण वास करतात ते.

नोटसफक्त मिळत आहेत तर त्याचा उपयोग करून घ्या धन्यवाद

## भाववाचक नामे साधण्याचे प्रकार

**सामान्यनामे व विशेषनामे यांना आई, ई, की, गिरी, ता, त्व, पण, पणा, य, वा यासारखे प्रत्यय लावून भाववाचक नामे तयार करता येतात.**

| शब्द | प्रत्यय | भाववाचक नाम | इतर उदाहरणे |
|---|---|---|---|
| नवल | आई | नवलाई | खोदाई, चपळाई, दांडगाई, धुलाई |
| श्रीमंत | ई | श्रीमंती | गरिबी, गोडी, लबाडी, वकिली |
| पाटील | की | पाटीलकी | आपुलकी, भिक्षुकी |
| गुलाम | गिरी | गुलामगिरी | फसवेगिरी, लुच्चेगिरी |
| शांत | ता | शांतता | क्रूरता, नम्रता, समता |
| मनुष्य | त्व | मनुष्यत्व | प्रौढत्व, मित्रत्व, शत्रुत्व |
| शहाणा | पण,<br>पणा | शहाणपण,<br>शहाणपणा | देवपण, प्रामाणिकपणा, मोठेपण |
| सुंदर | य | सौंदर्य | गांभीर्य, धैर्य, माधुर्य, शौर्य |
| गोड | वा | गोडवा | ओलावा, गारवा |

## नामाचे कार्य करणारे इतर शब्द

मुळच्या सामान्यनामांचा वापर विशेषनाम म्हणून पुढील वाक्यांप्रमाणे करता येतो.

१.मी आताच **नगरहून** आलो. २.शेजारची **तारा** यंदा बी.ए. झाली.

वरील वाक्यात नगर, तारा ही मुळची सामान्यनामे आहेत. पण ती वाक्यात विशेषनामे म्हणून वापरली आहेत.

मुळच्या विशेषनामांचा वापर सामान्यनाम म्हणून पुढील वाक्यांप्रमाणे करता येतो.

१.तुमचा मुलगा **कुंभकर्णच** दिसतो. २.आमचे वडील म्हणजे **जमदग्नी** आहेत.

३.आम्हाला आजच्या विद्यार्थ्यात **भीम** हवेत.

मुळच्या भाववाचक नामांचा वापर विशेषनाम म्हणून पुढील वाक्यांप्रमाणे करता येतो.

१.**शांती** हि माझ्या बहिणीची मुलगी. २.**विश्वास** परीक्षेत उत्तीर्ण झाला.

३.**माधुरी** उद्या मुंबईला जाईल.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

मुळची विशेषनामे अनेकवचनी पुढील वाक्यांप्रमाणे वापरता येतात.

१.आमच्या वर्गात तीन **पाटील** आहेत. २.या गावात बरेच **नारद** आहेत.

३.माझ्या आईने सोळा **सोमवार** केले.

मुळची विशेषणे नामांसारखी पुढील वाक्यांप्रमाणे वापरता येतात.

१.**शहाण्याला** शब्दाचा मार. २.**श्रीमंतांना** गर्व असतो.

३.जातीच्या **सुंदराना** काहीही शोभते. ४.जगात **गरिबांना** मान मिळत नाही.

मुळची अव्यये नामासारखी पुढील वाक्यांप्रमाणे वापरता येतात.

१.आमच्या क्रिकेटपटूनची **वाहवा** झाली. २.त्याच्या बोलण्यात **परंतुचा** वापर फार होतो

३. हरी नापास झाल्यामुळे त्याची **छी-थू** झाली.

मुळची धातुसाधिते नामांसारखी पुढील वाक्यांप्रमाणे वापरता येतात.

१.ज्याला **कर** नाही त्याला **डर** कसली. २.गुरुजींचे **वागणे** मोठे प्रेमळ असते.

३.ते ध्यान पाहून मला **हसू** आले. ४.**देणाऱ्याने** देत जावे.

## लिंगविचार

**लिंग, वचन व विभक्ती यांमुळे नामाच्या रुपात बदल होतो त्याला नामांचे विकरण असे म्हणतात.**

नामाच्या रूपावरून एखादी वस्तू वास्तविक अगर काल्पनिक पुरुषजातीची आहे कि स्त्रीजातीची कि दोन्हीपैकी कोणत्याही जातीची नाही असे ज्यावरून कळते त्याला त्या शब्दाचे लिंग असे म्हणतात.

**मराठीत तीन लिंगे मानतात. १.पुल्लिंग २.स्त्रीलिंग ३.नपुंसकलिंग**

प्राणीवाचक नामांतील पुरुष किंवा नरजातीचा बोध करून देणाऱ्या शब्दाला पुरुषलिंगी, पुंलिंगी किंवा पुल्लिंगी असे म्हणतात. उदाहरर्णाथ चुलता, शिक्षक, घोडा, चिमणा, मुंगळा इत्यादी.

स्त्री किंवा मादी जातीचा बोध करून देणाऱ्या शब्दांना स्त्रीलिंगी असे म्हणतात. उदाहरर्णाथ चुलती, शिक्षिका, घोडी, चिमणी, मुंगी इत्यादी.

निर्जीव वस्तुवाचक शब्दांवरून पुरुष किंवा स्त्री कोणत्याच जातीचा बोध होत नसेल तर त्या शब्दांना नपुंसकलिंगी असे म्हणतात. उदाहरर्णाथ घर, वरण, पेन, तेज

## मराठीतील लिंग ओखळण्याची पद्धत पुढीलप्रमाणे आहे.

**प्राणीमात्रांमधील पुरुष किंवा नर यांचा उल्लखे आपण तो या शब्दाने करतो तर स्त्री किंवा मादी जातीचा उल्लखे ती या शब्दाने करतो.** उदाहरर्णाथ तो बाप, ती आई, तो घोडा, ती घोडी, तो पोपट, ती मैना इत्यादी

**सजीव प्राण्यातील खएादा नर आहे किंवा मादी हे निश्चित सांगता येत तर त्याला नपुंसकलिंगी मानून त्याचा उल्लखे ते या शब्दाने करतात.** उदाहरर्णाथ ते कुत्रे, ते वासरू, ते पाखरू

**निर्जीव वस्तूंच्या बाबतीत काही वेळेस काल्पनिक पुरुषत्व व स्त्रीत्व लादून त्या वस्तूच्या मागे तो ती ते हे शब्द वापरून आपण लिंग ठरवतो.**

उदाहरर्णाथ तो वाडा, ती इमारत, ते घर, तो भात, ती भाकरी, ते वरण

तो टाक, ती लेखणी, ते पेन तो दिवा, ती पणती, ते तेज

## लिंगभेदामुळे नामांच्या रूपात होणारा बदल

**१.आकारांत पुल्लिंगी प्राणीवाचक नामाचे स्त्रीलिंगी रूप ईकारांत होते व त्याचे नपुंसकलिंगी रूप एकारांत होते. उदाहरणार्थ**

| पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|
| मुलगा | मुलगी | मुलगे |
| पोरगा | पोरगी | पोरगे |
| कुत्रा | कुत्री | कुत्रे |
| घोडा | घोडी | घोडे |

**२.काही प्राणीवाचक पुल्लिंगी शब्दांस ईण प्रत्यय लागून त्याची स्त्रीलिंगी रूपे होतात.**

| | | |
|---|---|---|
| सुतार - सुतारीण | माळी - माळीण | वाघ - वाघीण |
| कुंभार - कुंभारीण | पाटील - पाटलीण | तेली - तेलीण |

**३.काही प्राणीवाचक अकारांत पुल्लिंगी नामांची स्त्रीलिंगी रूपे ईकारांत होतात.**

| | | |
|---|---|---|
| हंस - हंसी | वानर - वानरी | गोप - गोपी |
| दास - दासी | बेडूक - बेडकी | तरुण - तरुणी |

**४.काही आकारांत पुल्लिंगी पदार्थवाचक नामांना ई प्रत्यय लागून त्याची लघुत्वदर्शक स्त्रीलिंगी रूपे बनतात. उदाहरणार्थ**

| | | |
|---|---|---|
| लोटा - लोटी | खडा - खडी | सुरा - सुरी |
| गाडा - गाडी | दांडा - दांडी | आरसा - आरशी |

**५.संस्कृत मधून मराठीत आलेल्या नामांची स्त्रीलिंगी रूपे ई प्रत्यय लागून होतात.**

| | | |
|---|---|---|
| राजा - राद्नी | श्रीमान - श्रीमती | भगवान - भगवती |
| युवा - युवती | विद्वान - विदुषी | ग्रंथर्कता - ग्रंथकर्ती |

**६.काही शब्दांची स्त्रीलिंगी रूपे स्वतंत्र रीतीने होतात.**

| | | |
|---|---|---|
| बाप - आई | नवरा - बायको | बोकड - शेळी |
| वर - वधु | मुलगा - सून | रेडा - म्हेस |
| राजा - राणी | दीर - जाऊ | मोर - लांडोर |
| पती - पत्नी | पुत्र - कन्या | बैल - गाय |
| भाऊ - बहीण | सासू - सासरा | बोका - भाटी |
| पिता - माता | पुरुष - स्त्री | खोंड - कालवड |

**७.मराठीतील काही शब्द निरनिराळ्या लिंगातही आढळतात.**

| पुल्लिंगी | स्त्रीलिंगी | नपुंसकलिंगी |
|---|---|---|
| बाग | बाग | ----------- |
| वेळ | वेळ | ----------- |
| वीणा | वीणा | ----------- |
| मजा | मजा | ----------- |
| ढेकर | ढेकर | ----------- |
| हरिण | हरिण | हरिण |
| तंबाखू | तंबाखू | ----------- |
| व्याधी | व्याधी | ----------- |
| पोर | पोर | पोर |
| संधी | संधी | ----------- |
| मूल | मूल | मूल |
| नेत्र | नेत्र | नेत्र |

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

**८.परभाषेतून आलेल्या शब्दांचे लिंग त्याच अर्थाच्या मराठी शब्दाच्या लिंगावरून ठरवितात. उदाहरणार्थ**

| | |
|---|---|
| बूट (जोडा) - पुल्लिंगी | पेन्सिल (लेखणी) - स्त्रीलिंग |
| क्लास (वर्ग) - पुल्लिंगी | बुक (पुस्तक) - नपुंसकलिंगी |
| कंपनी (मंडळी) - स्त्रीलिंगी | ट्रंक (पेटी) - स्त्रीलिंगी |

**९.सामासिक शब्दाचे लिंग हे शेवटच्या शब्दाच्या लिंगाप्रमाणे असते. उदाहरणार्थ**

| | | |
|---|---|---|
| साखरभात - पुल्लिंगी | मीठभाकरी - स्त्रीलिंगी | गायरान - नपुंसकलिंगी |
| भाजीपाला - पुल्लिंगी | भाऊबहीण - स्त्रीलिंगी | देवघर - नपुंसकलिंगी |

**१०. गरुड, टोळ, पोपट, मासा, साप, सुरवंट, हे शब्द पुल्लिंगी व स्त्रीलिंगी असूनही त्यांचा उल्लखे पुल्लिंगीच करतात. तर ऊ, घार, घूस, जळू, पिसू, मैना, सुसर हे शब्दखदील पुल्लिंगी व स्त्रीलिंगी असूनही त्यांचा उल्लखे केवल स्त्रीलिंगीच करतात.**

## वचनविचार

नामाच्या ठिकाणी संख्या सुचविण्याचा जो एक धर्म आहे त्याला वचन असे म्हणतात.

मराठीत दोन वचनें मानतात. १.एकवचन २.अनेकवचन

वचनभेदामुळे नामांच्या रुपात होणारा बदल

## पुल्लिंगी नामांची अनेकवचने

**१.आकारांत पुल्लिंगी नामाचे अनेकवचन एकारांत होते.**

| एकवचन - अनेकवचन | एकवचन - अनेकवचन | एकवचन - अनेकवचन |
|---|---|---|
| कुत्रा - कुत्रे | आंबा - आंबे | घोडा - घोडे |
| ससा - ससे | रस्ता - रस्ते | लांडगा - लांडगे |
| मुलगा - मुलगे | फळा - फळे | राजा - राजे |

**२.आकारांतशिवाय इतर सर्व पुल्लिंगी नामांची रूपे दोन्ही वचनात सारखीच असतात.**

| | | |
|---|---|---|
| देव - देव | शत्रू - शत्रू | तेली - तेली |
| उंदीर - उंदीर | लाडू - लाडू | गहू - गहू |
| कवी - कवी | कागद - कागद | मध - मध |

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

# स्त्रीलिंगी नामांची अनेकवचने

**१.आकारांत स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन कधी आकारांत होते तर कधी ईकारांत होते.**

| | | |
|---|---|---|
| वेळ - वेळा | केळ - केळी | विहीर - विहिरी |
| वीट - विटा | भिंत - भिंती | म्हेस - म्हशी |
| चूक - चुका | तारीख - तारखा | सून - सुना |

**२.य नंतर ई आल्यास उच्चारात य चा लोप होतो.**

उदाहरर्णाथ गाय - गायी - गाई,  सोय - सोयी - सोई इत्यादी

**३.आकारांत स्त्रीलिंगी तत्सम नामाचे अनेकवचन एकवचनासारखेच राहते.**

| | | |
|---|---|---|
| भाषा - भाषा | पूजा - पूजा | सभा - सभा |
| दिशा - दिशा | आज्ञा - आज्ञा | विद्या - विद्या |

**४.ईकारांत नामाचे अनेकवचन याकारांत होते .**

**( अपवाद - दासी, दृष्टी इत्यादी )**

| | | |
|---|---|---|
| नदी - नद्या | बी - बिया | स्त्री - स्त्रिया |
| काठी - काठ्या | भाकरी - भाकऱ्या | लेखणी - लेखण्या |

**५.उकारांत स्त्रीलिंगी नामाचे अनेकवचन वाकारांत होते**

**( अपवाद - वाळू, वस्तू, बाजू )**

| | | |
|---|---|---|
| सासू- सासवा | जाऊ - जावा | पिसू - पिसवा |
| जळू - जळवा | ऊ - ऊवा | |

**६.एकारांत आणि एकारांत स्त्रीलिंगी शब्दांची रूपे आ - या कारांत होतात.**

उदाहरर्णाथ पै - पया

**७.प्रचारात असलेला ओकारांत स्त्रीलिंगी शब्द बायको असून त्याचे अनेकवचन बायका असे होते.**

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

# <u>नपुंसकलिंगी नामांची अनेकवचने</u>

**१.अकारांत नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन एकारांत होते.**

| | | |
|---|---|---|
| घर - घरे | फुल - फुले | माणूस- माणसे |
| दार - दारे | शेत - शेते | घड्याळ - घड्याळे |

**२.ईकारांत नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन एकारांत होते व विकल्पाने य हा आदेश होतो. ( अपवाद - पाणी, लोणी, दही, अस्थी )**

| | |
|---|---|
| मोती - मोत्ये | मिरी - मिर्ये |

**३.उकारांत आणि ऊकारांत नपुंसकलिंगी नामाचे अनेकवचन एकारांत होते क्वचित प्रसंगी ते वेकारांत होते.**

| | | |
|---|---|---|
| पाखरू - पाखरे | लिंबू - लिंबे | गळू - गळवे |
| वासरू - वासरे | पिलू - पिले | आसू - आसवे |

**४.एकारांत नपुसकलिंगी नामाचे अनेकवचन ईकारांत होते. ( अपवाद - सोने, रूपे, तांबे, शिसे यांची अनेकवचने एकवचनाप्रमाणे राहतात.)**

| | | |
|---|---|---|
| केळे - केळी | गाणे - गाणी | मडके - मडकी |
| कुत्रे - कुत्री | खेडे - खेडी | रताळे - रताळी |

**आकारांत , एकारांत, व ओकारांत नपुंसकलिंगी नामे मराठीत नाहीत.**

## <u>वचनासंबंधी विशेष गोष्टी</u>

१.नामांच्या तीन प्रकारांपैकी सामान्यनामांची अनेकवचने होतात. विशेषनामांची व भाववाचक नामांची अनेकवचने होत नाहीत.

२.कधी कधी व्यक्ती एक असूनही त्या व्यक्तीबद्दल आदर दाखविण्यासाठी आपण त्या व्यक्तीबद्दल अनेकवचनी प्रयोग करतो. उदाहरर्णाथ गुरुजी आताच शाळेत आले. मुख्यमंत्री शाळेस भेट देणार आहेत. अशा वेळी त्यास आदरार्थी अनेकवचन किंवा आदरार्थी बहुवचन असे म्हणतात. असा आदर दाखविण्यासाठी राव, जी , पंत, साहेब, महाराज यासारखे शब्द

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

जोडतात. उदाहरर्णाथ गोविंदराव, विष्णुपंत, गोखलेसाहेब इत्यादी. स्त्रियांच्या नावासमोर बाई, ताई , माई, आई, काकू इत्यादी शब्द येतात उदाहरर्णाथ राधाबाई, शांताबाई, जानकीकाकू इत्यादी

३.काही नामे नेहमी अनेकवचनी आढळतात. उदाहरर्णाथ डोहाळे, कांजिण्या, शहारे , क्लेश, हाल, रोमांच इत्यादी.

४.विपुलता दाखविण्यासाठी काही शब्दांचे एकवचन वापरतात. उदाहरर्णाथ यंदा खूप आंबा पिकला, ----शेटजींच्या जवळ खूप पैसा आहे, ----पंढरपुरात यंदा लाख माणूस जमले होते.

५.जोडपे, त्रिकुट, आठवडा, पंचक, डझन, शत, सहस्त्र, लक्ष, कोटी या शब्दांमधून अनेकत्वाचा बोध होतो, तरीही तेवढ्या संख्येचा एक गट मानन ते एकवचनी वापरले जातात. अनेक गट मानले तर मात्र अनेकवचनी वापरतात. तसेच ढीग, रास, समिती, मंडळ, सैन्य वगेरे शब्दांतील समूह हा एकच मानला जात असल्यामुळे ती एकवचनी ठरतात. मात्र समूह अनेकवचनी मानले तर ते अनेकवचनी ठरतात.

६.अधिक सलगी किंवा जवळीक दाखवायची असेल तेंव्हा मोठ्या व्यक्तींबाबतही एकवचन वापरण्यात येते. उदाहरर्णाथ दादा शाळेतून आला. -----वाहिनी उद्या येणार आहे. ------- बाबा गावाला गेला.

## <u>विभक्तीविचार</u>

वाक्यातील शब्दांचा त्यातील मुख्य शब्दांशी म्हणजे क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी काही ना काही संबंध असतो या संबंधाला व्याकरणात कारक असे म्हणतात.

वाक्यातील शब्दांचा संबंध दाखविण्यासाठी नाम किंवा सर्वनाम यांच्या स्वरुपात जो बदल किंवा विकार होतो त्याला व्याकरणात विभक्ती असे म्हणतात.

नोट्स फुकट मिळत असेल तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

नामे व सर्वनामे यांचे वाक्यातील क्रियापदाशी किंवा इतर शब्दांशी येणारे संबंध ज्या विकारांनी दाखविले जातात त्या विकारांना विभक्ती असे म्हणतात.

नामाचे किंवा सर्वनामाचे विभक्तीचे रूप तयार करण्यास त्याला जी अक्षरे जोडतात त्यास प्रत्यय असे म्हणतात.

विभक्ती प्रत्यय लावण्यापूर्वी नामाच्या किंवा सर्वनामाच्या स्वरूपात जो बदल होतो त्याला सामान्यरूप असे म्हणतात.

## <u>सामान्यरूप</u>

**विभक्ती प्रत्यय लावण्यापूर्वी नामाच्या किंवा सर्वनामाच्या स्वरूपात जो बदल होतो त्याला सामान्यरूप असे म्हणतात.**

**हा बदल पदाच्या शेवटच्या अक्षरातील स्वरात होतो. उदाहरणार्थ बाळ - बाळाला,**

**घोडा - घोड्याचा, तळे - तळ्यात, पाणी - पाण्यात, फडके - फडक्यांचा इत्यादी**

**१.मूळ शब्दातील अंत्य स्वर ह्रस्व असला तर सामान्यरूपाच्या वेळी तो दीर्घ होतो**.

उदाहरर्णाथ कवि - कवीस, कवीने,  गुरु - गुरूचा

**२.अनेकवचनी शब्दांच्या सामान्यरूपावर नेहमी अनुस्वार येतो.**

उदाहरर्णाथ मुलांना,पशुंत,घोड्यांना, शहरांतून इत्यादी.

**३.विभक्तीप्रत्यय लागण्यापूर्वी जसे शब्दाचे सामान्यरूप होते तसेच शब्दयोगी अव्यय लागण्यापूर्वीही सामान्यरूप होते.** उदाहरर्णाथ घर - घराजवळ, घरापुढे  तळे - तळ्यामध्ये , घोडा - घोड्यासाठी, शाळा - शाळेविषयी,

नोट्स पुढे मिळत असेल तर जागेत उपयोग करून द्या धन्यवाद

## सामान्यरूपाचे विविध प्रकार

## पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप

**१.अकारांत पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप आकारांत होते.**

उदाहरर्णाथ खांब-खांबास, र्निणय-र्निणयास, काळ-काळाने, र्वग-र्वगात

**२.आकारांत पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप याकारांत होते.**

उदाहरर्णाथ घोडा-घोड्याला, कोयता-कोयत्याने, दोरा-दोऱ्याचा

( अपवाद - आजोबा, दादा, काका, मामा, नाना, चहा, राजा इत्यादी )

**३.ईकारांत पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप याकारांत होते.**

उदाहरर्णाथ धोबी-धोब्याला, तेली-तेल्याने, माळी-माळ्याचा

( अपवाद - हत्ती, नंदी, काजी, पंतोजी, मुनी, ऋषी, भटजी इत्यादी )

**४.इकारांत व उकारांत तत्सम शब्द दीर्घान्त लिहावयाचे असल्यामुळे त्यांचे सामान्यरूप दीर्घान्तच राहते.**

उदाहरर्णाथ कवी-कवीला, गुरु-गुरूला, साधू-साधूचा, नीती-नीतीला

**५.ऊकारांत पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप वाकारांत होते.**

उदाहरर्णाथ भाऊ-भावांनी, विंचू-विंचवांनी, नातू-नातवांचा

( अपवाद - पेरू, चाकू, खडू, शत्रू, खेळाडू, पशु)

**६.एकारांत पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप याकारांत होते.**

उदाहरर्णाथ फडके-फडक्यांचा, गोखले-गोखल्यांचा, पोरे-पोर्यांनी

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

**७.ओकारांत पुल्लिंगी नामांचे सामान्यरूप ओकारांतच राहते.**

उदाहरर्णाथ किलो-किलोस, धनको-धनकोचा, बिटको-बिटकोने

## स्त्रीलिंगी नामांचे सामान्यरूप

**१.अकारांत स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकवचनात एकारांत व अनेकवचनात आकारांत होते.**

उदाहरर्णाथ वीट-विटेचा, विटांचा   जीभ-जिभेला, जिभांनी

**२.काही अकारांत स्त्रीलिंगी नामांची सामान्यरूपे ईकारांत होतात.**

उदाहरर्णाथ भिंत-भिंतीला, विहीर-विहिरीत

**३.आकारांत स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकारांत होते.**

उदाहरर्णाथ शाळा-शाळेत, भाषा-भाषेचा, माता-मातेला, विद्या-विद्येने

**४.ईकारांत स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकवचनात ईकारांत व अनेकवचनात ईकारांत किंवा याकारांत होते.**

उदाहरर्णाथ भक्ती-भक्तीने, नदी-नदीचा,नद्यांचा, बी-बियांचा, पेटी-पेटीत, दासी-दासीला, दासींचा, स्त्री-स्त्रियांना

**५.ऊकारांत स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप होत नाही क्वचित ते वाकारांत होते.**

उदाहरर्णाथ काकू-काकूला, वधू-वधूचा, सासू-सासूला, सासवांना

**६.ओकारांत स्त्रीलिंगी नामाचे सामान्यरूप एकवचनात होत नाही अ अनेकवचनात आकारांत होते.**

उदाहरर्णाथ बायको-बायकोला, बायकांना

## <u>नपुंसकलिंगी नामांचे सामान्यरूप</u>

**१.अकारांत नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप आकारांत होते.**

उदाहरर्णाथ मूल-मूलाने, पान-पानाचा, दुकान-दुकानात, फुल-फुलात

**२.ईकारांत नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप याकारांत होते.**

उदाहरर्णाथ पाणी-पाण्यात, मोती-मोत्याचा, लोणी-लोण्याचा

**३.ऊकारांत नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप आकारांत होते.**

उदाहरर्णाथ लिंबू-लिंबाचे, कोकरू-कोकराने, लेकरू-लेकराला

**४.काही ऊकारांत नपुंसकलिंगी नामांचे सामान्यरूप वाकारांत होते.**

उदाहरर्णाथ कुंकू-कुंकवाचा, गळू-गळवाचा, आसू-आसवाने

**५.एकारांत नपुंसकलिंगी नामाचे सामान्यरूप याकारांत होते.**

उदाहरर्णाथ तळे-तळ्यात, केळे-केळ्यांची, खोके-खोक्यात, नाणे-नाण्यात

## <u>सामान्यरूप कधी होत नाही ?</u>

**१.एकाक्षरी शब्दाचे सामान्यरूप होत नाही.**
उदाहरर्णाथ अ ने ब ला मारले.

**२.परकीय भाषेतील शब्दांचे सामान्यरूप कधी कधी होत नाही.**

उदाहरर्णाथ **शेक्सपिअरची** नाटके अद्यापही लोकांना आवडतात.

**३.ग्राम किंवा देशवाचक विशेषनामांचे सामान्यरूप कधी कधी होत नाही.**

मी **बनारसला** शिक्षणासाठी गेलो. ही वस्तू मी **इंग्लंडहून** आणली.

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

पण चतुर्थीचा स आणि सप्तमीचा त प्रत्यय लागताना सामान्यरूप होते. जसे नागपूर-नागपुरास, हिंदुस्थान-हिंदुस्थानात, पंजाब-पंजाबात इत्यादी

## विशेषणांचे सामान्यरूप

**१.अकारांत, ईकारांत, व ऊकारांत विशेषणांचे सामान्यरूप होत नाही.**

जसे जगात **गरीब** माणसाला कोणी विचारात नाही.

त्याचे **लोकरी** कपड्यांचे दुकान आहे.

मला **कडू** कारल्याची भाजी आवडते.

**२.विभक्तीप्रत्यय लागलेल्या नामांच्या आकारांत विशेषणांचे सामान्यरूप याकारांत होते.**

जसे **भल्या** माणसाने, **ह्या** मुलांचा, **वेड्या** मुलीने, **खऱ्या** गोष्टीस

## सर्वनामे

नामाऐवजी येणाऱ्या शब्दाला सर्वनाम असे म्हणतात.

सर्वनाम म्हणजे वाक्यात नामाऐवजी येणारा शब्द.

नामांचा पुनरुच्चार किंवा पुनर्वापर टाळण्यासाठी सर्व प्रकारच्या नामांच्या जागी येणाऱ्या विकारी शब्दाला सर्वनाम असे म्हणतात.

**सर्वनामांचे पुढीलप्रमाणे एकूण सहा प्रकार मानतात.**

**१.पुरुषवाचक सर्वनाम**

**२.दर्शक सर्वनाम**

**३.संबंधी सर्वनाम**

**४.प्रश्नार्थक सर्वनाम**

**५.सामान्य सर्वनाम किंवा अनिश्चित सर्वनाम**

**६.आत्मवाचक सर्वनाम**

**१.पुरुषवाचक सर्वनामे -** बोलणाऱ्याच्या किंवा लिहर्नायाच्या दृष्टीने जगातील सर्व वस्तूंचे तीन गट पडतात. पहिला बोलर्णायाचा दुसरा ज्याच्याशी आपण बोलतो किंवा लिहितो त्याचा आणि तिसरा ज्याच्याविषयी आपण बोलतो किंवा लिहितो त्या व्यक्तींचा व वस्तूंचा, व्याकरणात यांना पुरुष असे म्हणतात. या तिन्ही वेगातील नामांबद्दल येणाऱ्या सर्वनामांना पुरुषवाचक सर्वनामे असे म्हणतात.

बोलणारा स्वतःचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो ती प्रथम पुरुषवाचक सर्वनामे उदाहरर्णाथ मी, आम्ही, आपण, स्वतः इत्यादी

ज्याच्याशी बोलायचे त्याचा उल्लेख करताना जी सर्वनामे आपण वापरतो ती द्वितीय पुरुषवाचक सर्वनामे उदाहरर्णाथ तू, तुम्ही, आपण, स्वतः

ज्याच्याविषयी बोलायचे त्या व्यक्ती किंवा वस्तू यांचा उल्लेख करताना जी सर्वनामे वापरतो ती तृतीय पुरुषवाचक सर्वनामे उदाहरर्णाथ तो, ती, ते, त्या.

**२.दर्शक सर्वनामे -** जवळची किंवा दूरची वस्तू दाखविण्यासाठी जे सर्वनाम येते त्यास र्दशक सर्वनाम असे म्हणतात. उदाहरर्णाथ हा, ही, हे, तो, ती, ते

**३.संबंधी सर्वनामे -** वाक्यात पुढे येणाऱ्या र्दशक सर्वनामांशी संबंध दाखविणाऱ्या सर्वनामांना संबंधी सर्वनामे असे म्हणतात. उदाहरर्णाथ जो-जी-जे, जे-ज्या

**४.प्रश्नार्थक सर्वनामे** - ज्या सर्वनामांचा उपयोग वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी होतो त्यांना प्रर्श्नाथक सर्वनामे म्हणतात. उदाहरर्णाथ कोण, काय, कोणास, कोणाला, कोणी इत्यादी

**कोण** रे तू? तुला **काय** हवे?

**५.सामान्य सर्वनामे किंवा अनिश्चित सर्वनामे** - कोण, काय ही सर्वनामे वाक्यात प्रश्न विचारण्यासाठी न येता ती कोणत्या नामांबद्दल आली आहेत हे निश्चितपणे सांगता येत नाही तेंव्हा त्यांना अनिश्चित सर्वनामे असे म्हणतात. उदाहरर्णाथ कोणी कोणास हसू नये.

त्या पेटीत काय आहे ते सांगा. या सर्वनामांना सामान्य सर्वनामे असेही म्हणतात.

तिकडे **कोण** आहे, ते मला माहित नाही.

त्या दुकानात **काय** वाटेल ते मिळते.

गुणेश म्हणजे सर्वज्ञ. त्याला **काय** माहित नसते!

**६.आत्मवाचक सर्वनामे** - जेंव्हा आपण या सर्वनामाचा र्अथ स्वतः असा होतो तेंव्हा ते आत्मवाचक सर्वनाम असते यालाच कोणी स्वतःवाचक सर्वनाम असेही म्हणतात.

उदाहरर्णाथ मी आपणहून सहलीला जाण्याची तयारी दाखवली.

नागरिकाने आपणाला राष्ट्रभक्त मानले पाहिजे.

स्वतः हे आत्मवाचक सर्वनाम नामाच्या किंवा सर्वनामाच्या सोबतीशिवाय सहसा वापरले जात नाही.

( अपवाद - स्वतः मेल्याशिवाय र्स्वग दिसत नाही.)

आपण हे सर्वनाम आत्मवाचक म्हणून वापरले तर ते देखील नामाच्या किंवा सर्वनामाच्या आधाराने येते.

'आपण' या आत्मवाचक सर्वनामाचा पुरुषवाचक सर्वनाम म्हणूनही उपयोग केला जातो आणि ते तीनही पुरुषात व दोन्ही वचनात चालते. उदाहरर्णाथ ----

१.तुझ्या सांगण्यावरून आपण त्याच्याशी भांडणार नाही.

( आपण = मी, प्रथम पुरुष, एकवचन )

२.आम्ही ठरवले आहे कि आपण सहलीला जाऊ.

( आपण = आम्ही, प्रथम पुरुष, अनेकवचन )

३.शिक्षक विद्यार्थिनीला उपरोधाने म्हणाले, " आपण रडणे थांबवून बोलाल का?"

( आपण = तू, द्वितीय पुरुष, एकवचन )

४.मी देवळात गेलो तेंव्हा आपण इकडे घरी आलात का ?

( आपण = तुम्ही, द्वितीय पुरुष, अनेकवचन )

५.सुरेशने मला शाळेत बोलवले व आपण आलाच नाही.

( आपण = तो, तृतीय पुरुष, एकवचन )

६.नेत्यांनी कामगारांना बाहेर थांबवले आणि आपण चर्चेसाठी मालकांकडे गेले.

( आपण = ते, तृतीय पुरुष, अनेकवचन )

मराठीत मूळ सर्वनामे नऊ आहेत ती पुढीलप्रमाणे मी, तू, तो, हा, जो, कोण, काय, आपण, स्वतः इत्यादी

यातील लिंगानुसार बदलणारी तीन सर्वनामे आहेत. तो, हा, जो

याशिवाय इतर सर्व सर्वनामांची तिन्ही लिंगातील रूप सारखीच राहतात ती बदलत नाहीत.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

मराठीतील मूळ नऊ सर्वनामांपैकी मी, तू, तो, हा, जो हि पाच सर्वनामे वचनभेदाप्रमाणे बदलतात. उदाहरर्णाथ मी-आम्ही, तू-तुम्ही

सर्वनामांची संबोधन विभक्ती नसते कारण सर्वनामे हि प्राणी किंवा वस्तू नसल्यामुळे त्यांची हाक मारण्यासाठी योजना होत नाही.

मूळ शब्द व प्रत्यय यांच्यामध्ये आणखी एक अक्षर येऊन तुझ्याने, तुमच्यांशी, तुझ्याहून, तुमच्याहून, तुझ्यात, तुमच्यात अशी जी रूपे तयार होतात त्यास विकरण असे म्हणतात. हि शुद्ध विभक्तीची रूपे नसून यांना सविकारणी विभक्ती असे म्हणतात.

## विशेषणे

नामाबद्ल विशेष माहिती सांगून नामाची व्याप्ती र्मयादित करणाऱ्या शब्दास विशेषण असे म्हणतात.
विशेषणाचे वैशिष्ट्य हे की , ते नामाबद्ल अधिक माहिती सांगते व नामाची व्याप्ती र्मयादित करते व साधारणपणे नामापुर्वी येते.

## विशेषण आणि विशेष्य

ज्या नामाबद्दल विशेषण अधिक माहिती सांगते त्या नामाला विशेष्य असे म्हणतात.

विशेषणाचे मुख्य तीन प्रकार आहेत.
१.गुणविशेषण २.संख्याविशेषण ३.सार्वनामिक विशेषण

**१.गुणविशेषण** - ज्या विशेषणाच्या योगाने नामाचा कोणत्याही प्रकारचा गुण किंवा विशेष दाखविला जातो त्यास गुणविशेषण असे म्हणतात. जसे मोठी मुले, आंबट बोरे, शूर सरदार, रेखीव चित्र, निळासावळा झरा

**२.संख्याविशेषण** - ज्या विशेषणाच्या योगाने नामाची संख्या दाखविली जाते त्यास संख्याविशेषण असे म्हणतात.

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

संख्याविशेषणाचे पुढील प्रकार पडतात.

---- गणनावाचक संख्याविशेषण

---- क्रमवाचक संख्याविशेषण

---- आवृत्तीवाचक संख्याविशेषण

---- पृथककत्ववाचक संख्याविशेषण

---- अनिश्चित संख्याविशेषण

## गणनावाचक संख्याविशेषण ----

दहा मुली, चौदा भाषा, साठ रुपये, सहस्त्र किरणे, अर्धा तास दोघे मुलगे इत्यादी
वरील शब्दातील दहा, चौदा, साठ, सहस्त्र, अर्धा, दोघे या विशेषणांचा उपयोग केवळ गणती किंवा गणना करण्यासाठी होतो त्यास गणनावाचक संख्याविशेषणे असे म्हणतात.
गणनावाचक संख्याविशेषणे अक्षरांनी व अंकांनी लिहितात.

## गणनावाचक संख्याविशेषणाचे तीन उपप्रकार पडतात.

**अ.पूर्णांक वाचक ----** एक,दोन,शंभर १,२,१००

**ब.अपूर्णांक वाचक ----** पाव, अर्धा, पाऊन १/४, १/२, ३/४

**क.साकल्यवाचक ----** तितक्या वस्तूंपैकी सर्व --- दोन्ही भाऊ, पाची पांडव, चारी बहिणी

## क्रमवाचक संख्याविशेषण ----

पहिला, चौथा, आठवी, साठावे हि विशेषणे वस्तूंचा क्रम दाखवितात अशा विशेषणांना क्रमवाचक संख्याविशेषणे असे म्हणतात.

## आवृत्तीवाचक संख्याविशेषणे ----

चौपट, दसपट, दुहेरी, द्विगुणीत यासारखी विशेषणे संख्येची किती वेळा आवृत्ती झाली हे दाखवितात त्यांना आवृत्तीवाचक संख्याविशेषणे असे म्हणतात.

## पृथककत्ववाचक संख्याविशेषण ----

एकेक, दहादहा यासारखी विशेषणे वेगवेगळा किंवा पृथक असा बोध करून देतात अशा विशेषणांना पृथकत्ववाचक संख्याविशेषणे असे म्हणतात.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

## अनिश्चित संख्याविशेषण ----

सर्व रस्ते, थोडी मुले, काही पक्षी, इतर लोक, इत्यादी देश

वरील शब्दातील सर्व, थोडी, काही, इतर इत्यादी हि संख्याविशेषणे निश्चित अशी संख्या दाखवत नाहीत म्हणून त्यांना अनिश्चित संख्याविशेषणे असे म्हणतात. जसे - अन्य, अल्प

## ३.सार्वनामिक विशेषण ---

सर्वनामांपासून बनलेल्या विशेषणांना सार्वनामिक विशेषणे किंवा सर्वनामसाधित विशेषणे असे म्हणतात. उदाहरर्णाथ **हा** मनुष्य, **तो** पक्षी, **माझे** पुस्तक, **तिच्या** साड्या, **असल्या** झोपड्या

## नामे, सर्वनामे धातुसाधिते, व अव्ययसाधिते यांचा विशेषणासारखा उपयोग

**१.नामसाधित विशेषणे ----** नामापासून तयार केलेल्या विशेषणांना नामसाधित विशेषण असे म्हणतात.

उदाहरर्णाथ अ.माझ्या भावाचे **कापड**-दुकान आहे.
ब.मी आज **खसार**-काकडी खाल्ली.

क.त्याचा मित्र-**पुस्तक** विक्रेता होता.

ड.रामाला फळ-**भाजी** फार आवडते.

**२.सार्वनामिक विशेषणे -----** याची माहिती वरती घेतली आहे.

**३.धातूसाधित विशेषणे ----** धातूपासून बनलेल्या विशेषणांना धातुसाधित विशेषणे असे म्हणतात. उदाहरर्णाथ **पिकलेला** आंबा, **रांगणारे** मूळ, **वाहती** नदी, **हसरी** मुलगी, **बोलकी** बाहुली, **पेटती** ज्योत.

**४.अव्ययसाधित विशेषणे ----** अव्ययापासून बनलेल्या विशेषणांना अव्ययसाधित विशेषणे असे म्हणतात. उदाहरर्णाथ **वरचा** मजला, **खालची** माडी, **मागील** दार, **पुढची** गल्ली.

## अधिविशेषण व विधीविशेषण

विशेषण हे सामान्यतः विशेष्याच्या पूर्वी येते. जसे चांगला मुलगा सर्वांना आवडतो. इथे चांगला हे अधिविशेषण किंवा पूर्वविशेषण होय. पण कधी-कधी विशेषण विशेष्याच्या नंतर येऊन वाक्यात विशेष्याबद्दलचे विधान पूण करते जसे तो मुलगा आहे चांगला. अशा विशेषणाला विधीविशेषण किंवा उत्तरविशेषण असे म्हणतात.

**नामापुर्वी येणाऱ्या विशेषणाला अधिविशेषण म्हणतात तर नामानंतर येणाऱ्या विशेषणाला विधीविशेषण असे म्हणतात.**

## क्रियाविशेषण

मुलगा चांगला खेळतो. मुलगी चांगली खेळते. ते चांगले खेळतात.
वरील वाक्यातील चांगला, चांगली, चांगले हे शब्द विशेषण आहेत. परंतु ती विशेषणे क्रियापदाबद्दल अधिक माहिती देणारी आहेत. क्रियाविशेषण हे विकारी असते. त्यामुळे हि क्रियाविशेषणे आहेत पण क्रियाविशेषण अव्यय नाहीत.

## विशेषणाचे कार्य व उपयोग

**१.नामसदृश विशेषणे** - श्रीमंत माणसांना गर्व असतो. ( विशेषण )

- श्रीमंतांना गर्व असतो. ( नाम )

**२.दर्शक विशेषणे** - ही मुलगी चलाख आहे.

**३.संबंधी विशेषणे** - जो मुलगा व्यायाम करतो, तो सशक्त होतो.

**४.प्रश्नार्थक विशेषणे** - कोण मनुष्य येवून गेला ? त्याने काय पर्दाथ आणले?

**५.सार्वनामिक विशेषणे** - आम्हां मुलांना कोण विचारतो ?

## क्रियापदविचार

क्रियापद म्हणजे वाक्याचा र्अथ पूंण करणारा क्रियावाचक शब्द.
क्रियापदातील प्रत्ययरहित मूळ शब्दाला धातू असे म्हणतात.
देणे, करणे हि क्रियापदे नसून क्रियावाचक नामे आहेत.

**धातूला विविध प्रत्यय लागून क्रिया अपुरी खदाविणाऱ्या शब्दांना धातुसाधिते किंवा कृदंते असे म्हणतात.**

**अस या धातूने क्रिया दर्शवली जाते तर हो या धातूने स्थित्यंतर खदाविले जाते, अशा शब्दांनाही व्याकरणात क्रियापद असे म्हणतात.**

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

वाक्यात क्रियापदाने दाखविलेली क्रिया करणारा जो कोणी असतो, त्यास र्कता असे म्हणतात. वाक्यातील क्रियापदाने दाखविलेली क्रिया र्कत्यापासून निघते व ती दुसऱ्या कोणावर तरी किंवा कशावर तरी घडते. त्या क्रियेचा परीणाम ज्याच्यावर घडतो किंवा ज्याच्याकडे त्या क्रियेचा रोख किंवा कल असतो ते त्याचे र्कम.

## वाक्यातील कर्ता व कर्म कसे शोधतात?

र्कता शोधताना प्रथम वाक्यातील क्रियापदाचा मूळ धातू शोधून काढावा व त्याला -'णारा' हा प्रत्यय लावून "कोण ?"  असा प्रश्न करावा म्हणजे र्कता मिळतो.
उदाहरर्णाथ राम आंबा खातो.      या वाक्यातील मूळ धातू खा आहे. त्याला णारा हा प्रत्यय लावल्यास खाणारा असा शब्द तयार होतो, तर राम आंबा खातो या वाक्याला खाणारा कोण ? असा प्रश्न केल्यास राम हे उत्तर मिळते म्हणून या वाक्याचा र्कता राम आहे. तर खाण्याची क्रिया हि आंब्यावर झालेली आहे म्हणून आंबा हे या वाक्याचे र्कम होय.

मी बैलाला मारतो. या वाक्यातील मूळ धातू मार, त्याला णारा प्रत्यय लावल्यास मारणारा हा शब्द तयार होतो तर मारणारा कोण?  असा प्रश्न वाक्याला केल्यास उत्तर मी येते म्हणून या वाक्याचा र्कता मी तर मारण्याची क्रिया बैलावर घडत असल्यामुळे या वाक्याचे र्कम बैल.

विद्यार्थी प्रामाणिक आहे. या वाक्यातील मूळ धातू अस. वाक्याला असणारा कोण? असा प्रश्न केल्यास उत्तर विद्यार्थी येते म्हणून या वाक्याचा र्कता विद्यार्थी तर असण्याची क्रिया विद्यार्थ्यावरच घडते म्हणजेच क्रिया र्कत्यापासून पुढे जात नाही म्हणून या वाक्यात र्कम नाही. आहे हे क्रियापद अर्कमक आहे.

मला दुध आवडते. या वाक्यातील मूळ धातू आवड, आवडणारा कोण ? असा प्रश्न या वाक्यात करण्याऐवजी आवडणारे काय? असा प्रश्न या वाक्यासाठी करावा लागतो कारण दुध हा पर्दाथ आहे. आवडणारे काय ? असा प्रश्न केल्यास उत्तर दुध मिळते म्हणून या वाक्यात दुध हा र्कता आहे.

त्याला थंडी वाजते. वाजणारी कोण? थंडी . थंडी हा र्कता.
राजाला मुकुट शोभतो. शोभणारा कोण ? मुकुट . मुकुट हा र्कता.
मला चंद्र दिसतो. दिसणारा कोण ? चंद्र  चंद्र हा र्कता.

**क्रिया करणारा तो कर्ता व ती क्रिया भोगणारे किंवा सोसणारे ते कर्म.**

## क्रियापदाचे प्रकार

१.सर्कमक क्रियापद २.अर्कमक क्रियापद

## सकर्मक क्रियापद ----

ज्या क्रियापदाचा अंथ पूंण होण्यास कंमाची जरुरी असते, त्यास सर्कमक क्रियापद असे म्हणतात. उदाहरर्णाथ

१.गवळी दार काढतो.

२.अनुराग निबंध लिहितो.

३.आरोही लाडू खाते.

## अकर्मक क्रियापदे ----

कर्त्यापासून निघालेली क्रिया कर्त्यापाशीच थांबत असेल किंवा कर्त्याच्या ठिकाणी लय पावत असेल तर ते क्रियापद अर्कमक असते. उदाहरर्णाथ

१.मी रस्त्यात पडलो.

२.आज भाऊबीज आहे.

३.सुनील उद्या पुण्याला जाईल.

## द्विकर्मक क्रियापदे -----

उदाहरर्णाथ १.गुरुजी विध्यार्थ्यांना व्याकरण शिकवितात. २.आजीने नातीला गोष्ट सांगितली. ३.तिने भिकाऱ्याला पैसा दिला.

वरील वाक्यांमध्ये शिकवितात, सांगितली, दिला हि क्रियापदे सर्कमक असून त्यांना दोन कर्मे आहेत. पहिल्या वाक्यात गुरुजी हा र्कता तर शिकविण्याची क्रिया व्याकरण व विद्यार्थी या दोघांवर घडते. तीच गोष्ट सांगितली व दिला या क्रियापदांच्या बाबतीतही आहे. या क्रियापदांना दोन कर्मे लागतात. अशा क्रियापदाना द्विर्कमक क्रियापदे असे म्हणतात. यातील वस्तुवाचक कर्मांना प्रत्येक्ष र्कम असे म्हणतात आणि व्यक्तिवाचक कर्मांना अप्रतेक्ष र्कम असे म्हणतात. वरील वाक्यातील व्याकरण, गोष्ट, पैसा हि प्रत्येक्ष र्कम व विद्यार्थ्यांना, नातीला व भिकाऱ्याला हि अप्रत्येक्ष र्कम होत.

प्रत्यक्ष र्कमाची विभक्ती द्वितिया असते तर अप्रत्यक्ष र्कमाची विभक्ती संप्रदानी चतुर्थी असते.

तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## <u>उभयविध क्रियापदे ----</u>

एकच क्रियापद दोन वेगवेगळ्या वाक्यात सर्कमक व अर्कमक अशा दोन्ही पद्धतीने वापरता येते अशा क्रियापदाना उभयविध क्रियापदे असे म्हणतात. काप, आठव, स्मर, लोट हे धातू या प्रकारचे होत. उदाहरर्णाथ

१.त्याने घराचे दार उघडले.    त्याच्या घराचे दार उघडले.

२.रामाने धनुष्य मोडले.        ते लाकडी धनुष्य मोडले.

## <u>विधानपूरक ----</u>

काही अर्कमक धातू असे आहेत कि र्कता व क्रियापद असूनही त्यांचा वाक्यर्थ अपुरा असतो. उदाहरर्णाथ १.राम झाला. २.मुलगा आहे. ३.आंबा निघाला. ४.गुरुजी दिसतात.

झाला, आहे, निघाला, दिसतात हि क्रियापदे अपुऱ्या विधानांची आहेत. अशा प्रकारच्या क्रियापदाना अर्पूण विधान क्रियापदे म्हणतात. ती विधाने र्पूण करण्यासाठी काही शब्दांची

जरुरी असते जसे १.राम राजा झाला. २.आंबा नासका निघाला. ३.मुलगा हुशार आहे. ४.गुरुजी रागावलेले दिसतात.

वरील वाक्यांमधील राजा, हुशार, नासका, रागावलेले हे शब्द अपुरी विधाने र्पूण करतात अशा शब्दांना विधानपूरक किंवा पूरक असे म्हणतात.

## <u>काही अकर्मक धातू ----</u>

स्थितीवाचक , गतीवाचक , वस्तूस्थितीर्दशक , स्थित्यंतरवाचक धातू अर्कमक असतात तर कृतीवाचक धातू सर्कमक असतात.

## <u>काही अकर्मक धातू पुढीलप्रमाणे</u>

अस, नस, हो, नहो, उठ, बस, नीज, झोप, थरथर, कुडकुड, रड, पड, सड, मर, सर, उड, धाव, थांब, शक, थक, जाग, झीज, वाढ, झड, जळ, किंचाळ, तुट, सुट, पहुड, उजळ, प्रकाश, ओरड, घोर, सळसळ, धडपड, चुरचुर, भुकेज, कीड, राह, वाह, फुल, उमल, उपज, निपज, जन्म, पिक, लोळ, वाज, भीज, शीज, सुज, वीझ, रूज, बिघड इत्यादी.

## <u>क्रियापदाचे अन्य प्रकार</u>

धातूपासून बनलेल्या धातूपासून साधलेल्या अशा रूपांना धातुसाधिते असे म्हणतात.

## संयुक्त व सहायक क्रियापदे

धातुसाधित व सहायक क्रियापद यांच्या संयोगाने बनलेल्या क्रियापदाना संयुक्त क्रियापद असे म्हणतात.

संयुक्त क्रियापद बनण्यासाठी एकच अट असते ती म्हणजे संयुक्त क्रियापदाने दर्शवलेली क्रिया एकच असायला हवी.

उदाहरर्णाथ १.क्रीडांगणावर मुले खेळू लागली. २.बाळ, एवढा लाडू खाऊन जा.

पहिल्या वाक्यात खेळू लागली तर दुसऱ्या वाक्यात खाऊन जा हि संयुक्त क्रियापदे आहेत कारण खेळू लागली या क्रियापदातून खेळण्याची एकच क्रिया दर्शवली जाते त्याचप्रमाणे खाऊन जा या या क्रियापदातून खाण्याची एकच क्रिया दर्शवली जाते.

पहिल्या वाक्यात खेळू हे धातुसाधित असून लागली हे मुख्य क्रियापद आहे तर दुसऱ्या

वाक्यात खाऊन हे धातुसाधित असून जा हे मुख्य क्रियापद आहे.

संयुक्त क्रियापदातील धातुसाधितावरून मुख्य क्रियेचा बोध होतो तर विधानाला केवळ पूतता आणण्याचे काम सहायक क्रियापद करते. जेंव्हा धातुसाधित व मुख्य क्रियापद हे दोन्ही मिळून एकाच क्रियाचा बोध होतो तेंव्हा धातूसाधितला मदत करणाऱ्या क्रियापदाला सहायक क्रियापद असे म्हणतात.

वरील दोन वाक्यात लागली व जा हि दोन सहायक क्रियापदे आहेत.

संयुक्त क्रियापदे = धातुसाधित + सहायक क्रियापद

अस, नस, हो, ये, जा, दे, लाग, टाक, शक, शक, पाहिजे, नको वगेरे ठराविक धातूवरून सहायक क्रियापदे बनतात. यातील अस, हो, नस, हे धातू काळाचे प्रकार दाखवितात. पाहिजे , नको, नये, नलगे हे अंथाचे प्रकार दाखवितात.

सहायक क्रियापदे सर्व काळी, सर्व पुरुषी चालत नाहीत म्हणून त्यांना गौण क्रियापदे असेही म्हणतात.

## सिद्ध व साधित क्रियापदे

विविध प्रकारच्या शब्दांपासून तयार होणाऱ्या धातूंना साधित धातू असे म्हणतात व साधित धातूंपासून बनलेल्या क्रियापदाना साधित क्रियापदे असे म्हणतात. जा, ये, कर, ऊठ, बस,

असे जे मुळचे धातू आहेत. त्यांना सिद्ध धातू असे म्हणतात व या सिद्ध धातूंना प्रत्यय लावून बनविलेल्या क्रियापदाना सिद्ध क्रियापदे असे म्हणतात.

उदाहरर्णाथ १.माझ्या कपाटातील पुस्तके तो नेहमी हाताळतो.

२.आईच्या आठवणीने त्याचे डोळे पाणावले.

३.तो शिक्षकाच्या व्यवसायात स्थिरावला.

४.आम्ही हि पुस्तके मुंबईहून आणवली.

५.खेड्यातील माणसे आता बरीच पुढारली.

हाताळतो, पाणावले, स्थिरावला, आणवली, पुढारली, हि क्रियापदे हाताळ, पानाव, स्थिराव, आणव, पुढार या धातूंपासून बनली आहेत या धातूंना साधित धातू असे म्हणतात.
तर या साधित धातूंना प्रत्यय लागून हाताळतो, पाणावले, स्थिरावला, आणवली, पुढारली, हि क्रियापदे बनली आहेत त्यांना सिद्ध क्रियापदे असे म्हणतात.

## <u>प्रयोजक व शक्य क्रियापदे</u>

साधित धातूवरून प्रायोजक व शक्य क्रियापदे बनतात.
मूळ धातूच्या क्रियेचा र्कता क्रिया स्वतः करीत नसून ती क्रिया तो दुसऱ्या कोणाला तरी करावयास लावत आहे असा र्अथ व्यक्त होत असेल तर त्या क्रियापदाला प्रयोजक क्रियापद असे म्हणतात. उदाहरर्णाथ १.आई त्या मुलाला हसविते.

२.झाड पाडले.

३.आई मुलाला खेळवते.

४.आई मुलाला चालवते.

५.बाईनी शिपायाकडून वह्या र्वगात आणवल्या.

**प्रयोजक म्हणजे प्रेरणा देणारा, र्कता मूळ धातूतील क्रिया स्वतः करीत नसून ती क्रिया करण्यासाठी दुसऱ्याला प्रवृत्त करतो.**

## <u>प्रायोजक क्रियापद दोन प्रकारांनी तयार होतात.</u>

**१.मूळ धातूला व हा प्रत्यय लागून   उदाहणार्थ**

हसतो - हसवतो - हसवितो

बसतो - बसवतो - बसवितो

चालतो - चालवतो - चालवितो

निजतो - निजवतो - निजवितो.

वरील शब्दात व च्या पुढे इ हा आगम म्हणजे नवीन र्वण येतो याला इडागम असे म्हणतात.
खातो - खाववितो, देतो - देववितो, घेतो - घेववितो

**२.मूळ धातूतील आद्याक्षरात वृद्धी किंवा गुण होतो.**

उदाहरणार्थ गळणे-गाळणे, चरणे-चारणे, मरणे - मारणे, फिटने-फेडणे, तुटणे-तोडणे, फुटणे-फोडणे

## <u>शक्य क्रियापदे</u>

जे साधित धातू कर्त्याला ती क्रिया करण्याची शक्यता किंवा सामर्थ्य आहे असे दाखवितात त्यांना शक्य क्रियापदे असे म्हणतात.

उदाहरणार्थ १.मला आता काम करवते.

२.त्या आजारी माणसाला आता थोडे बसवते.

३.मला दररोज वीस किलोमीटर चालवते.

४.आजारानंतर आता मला खेळवते.

५.बाईना वह्या र्वगात आणवतात.

## <u>अनियमित क्रियापदे</u>

मराठीत काही धातू असे आहेत कि त्यांना काळांचे व र्अथाचे सर्व प्रत्यय न लागता ते थोड्या वेगळ्याच प्रकारे चालतात त्यांना गौण क्रियापदे किंवा अनियमित क्रियापदे असे म्हणतात. आहे, नाही, नव्हे, पाहिजे, नको, नलगे, नये या क्रियापदांची रूपे अशा प्रकारची आहेत. त्यांची मूळ रूपे क्रियापदेच असून त्यात अमुक एक धातू आहे असे निश्चितपणे सांगता येत नाही.

उदाहरणार्थ १.मुलांनी सतत खेळू नये.

२.सुज्ञास अधिक सांगणे नलगे.

३.या दरवाजाने जाऊ नको.

४.परमेश्वर सर्वत्र आहे.

५.मला कॉफी पाहिजे.

६.असे वागणे बरे नव्हे.

७.आई घरी नाही.

## <u>भावकर्तृक क्रियापदे</u>

ज्या शब्दातील क्रियेचा मूळ र्अथ किंवा भाव हाच र्कता मानावा लागतो अशा क्रियापदाना भावर्कतूक क्रियापदे असे म्हणतात. या क्रियापदांचा र्कता वाक्यात स्पष्ट नसतो म्हणून काही व्याकरणकार त्यांना अर्कतृक क्रियापदे असे म्हणतात.

उदाहरणार्थ १.मी घरी पोहोचण्यापूर्वीच सांजावले.

२.पित्त झाल्यामुळे त्याला आता मळमळते.
३.उजाडले तेंव्हा सकाळचे सहा वाजले होते.
४.आज दिवसभर सारखे गडगडते.

## करणरूप आणि अकरणरूप

वाक्यातील क्रियापदाने केलेले विधान होकारार्थी असते तेंव्हा क्रियापदाच्या रुपाला करणरूप असे म्हणतात व हे विधान जेंव्हा नकारार्थी असते तेंव्हा क्रियापदाच्या त्या रुपाला अकरणरूप असे म्हणतात.

उदाहरर्णाथ १.मुलांनी खरे बोलावे. ( करणरूप )
२.मुलांनी खोटे बोलू नये. ( अकरणरूप )

## धातूसाधिते ( कृदन्ते )

धातूपासून तयार झालेल्या शब्दांना धातुसाधिते किंवा कृदन्ते असे म्हणतात.

धातूंना जोडल्या जाणाऱ्या प्रत्ययाना संस्कृतात कृत प्रत्यय असे म्हणतात.
कृदंत म्हणजे ज्याच्या अंती केवळ क्रियार्दशक प्रत्यय आहे असा शब्द.

## क्रियापदविचार - काळ

काळ - वाक्यात दिलेल्या क्रियापदावरून जसा क्रियेचा बोध होतो तसेच ती क्रिया कोणत्या वेळी घडत आहे याचा जो बोध होतो त्याला काळ असे म्हणतात.

मुख्य काळ तीन आहेत.

१.क्रियापदाच्या रूपावरून क्रिया आता घडते असे जेंव्हा समजते तेंव्हा तो र्वतमानकाळ असतो
उदाहरर्णाथ मी अभ्यास करतो.

२.क्रियापदाच्या रूपावरून क्रिया पूर्वी घडली असे जेंव्हा समजते तेंव्हा तो भूतकाळ असतो.
उदाहरर्णाथ मी अभ्यास केला.

३.क्रियापदाच्या रूपावरून क्रिया पुढे घडेल असे जेंव्हा समजते तेंव्हा तो भविष्यकाळ असतो.
उदाहरर्णाथ मी अभ्यास करीन.

तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## <u>काळांचे उपप्रकार</u>

### <u>अपूर्ण काळ</u>

१.तो मुलगा खेळत आहे. ---- अपूर्ण वर्तमानकाळ

२.तो मुलगा खेळत होता. ---- अपूर्ण भूतकाळ

३.तो मुलगा खेळत असेल. ---- अपूर्ण भविष्यकाळ

### <u>पूर्ण काळ</u>

१.मधूने लाडू खाल्ला आहे. ---- पूर्ण वर्तमानकाळ

२.मधूने लाडू खाल्ला होता. ---- पूर्ण भूतकाळ

३.मधूने लाडू खाल्ला असेल. ---- पूर्ण भविष्यकाळ

### <u>रीती काळ</u>

१.मुलगा पुस्तक वाचत असतो. ---- रीती वर्तमानकाळ

२.मुलगा पुस्तक वाचत असे किंवा वाची. - रीती भूतकाळ

३.मुलगा पुस्तक वाचत जाईल. ---- रीती भविष्यकाळ

## <u>काळाचे उपयोग</u>

### <u>अ.वर्तमानकाळ</u>

१.सर्व काळी व सर्वत्र सत्य असलेले विधान करताना उदाहरणार्थ सूर्य पूर्वेस उगवतो. पृथ्वी सूर्याभोवती फिरते.

२.भूतकाळातील घटना वर्तमानात सांगताना उदाहरणार्थ अर्जुन श्रीकृष्णास म्हणतो.( म्हणाला )

३.लवकरच सुरु होणारी क्रिया दर्शवताना (संनिहित भविष्यकाळ )

उदाहरणार्थ तुम्ही पुढे चला, मी येतोच. ( मी येईन )

४.अवतरण देताना. उदाहरणार्थ समर्थ रामदास म्हणतात, ‘जगी सर्व सुखी असा कोण आहे ?’

५.लगतचा भूतकाळ सांगताना ( संनिहित भूतकाळ )

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

उदाहरर्णाथ मी बसतो ( बसलो ), तोच तुम्ही हजर !

६.एखादी क्रिया सतत घडते अशा अर्थी. ( रीती र्वतमानकाळ )

उदाहरर्णाथ तो नेहमीच उशिरा येतो. ( येत असतो. )

## आ.भूतकाळ

१.ताबडतोब घडणाऱ्या क्रियेबाबत ( संनिहित भविष्यकाळ )

उदाहरर्णाथ तुम्ही पुढे व्हा, मी आलोच (येईन)

२.एखादी क्रिया भविष्यकाळी खात्रीने होणार या अर्थी

उदाहरर्णाथ जवळ ये, कि मार बसलाच म्हणून समज.

३.संकेर्ताथ असल्यास

उदाहरर्णाथ पाउस आला, तर ठीक.

४.र्वतमानकाळातील अर्पूण क्रिया संपण्याच्या बेतात आहे अशा अर्थी

उदाहरर्णाथ तो पहा तुझा मित्र आला.

## भविष्यकाळ

१.संकेर्ताथ असल्यास - तू मदत देशील, तर मी आभारी होईन.

२.अशक्यता र्दशवताना - सगळेच र्मख कसे असतील ?

३.संभव असताना - गुरुजी आत शाळेत असतील.

४.इच्छा व्यक्त करताना - मला दोन रुपये हवे होते.

## क्रियापदाचे अर्थ व त्याचे उपयोग

### १.स्वार्थ

र्स्वाथ म्हणजे स्वतःचा किंवा मुळचा र्अथ होय. क्रियेचे विधान तोच त्याचा र्अथ होय. ज्या वाक्यातील क्रियापदावरून केवळ काळाचा बोध होतो व आज्ञा, विधी, किंवा संकेत वगेरे

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

र्अथाचा बोध न होता क्रियापदाचा केवळ स्वतःचा र्अथ तेवढाच समजतो तेंव्हा त्याला स्वार्थी क्रियापद असे म्हणतात. क्रियापदाची सर्व काळातील रूपे हि स्वार्थी होत जसे

--मुले अभ्यास करतात.

--तो घरी गेला.

--मी खात्रीने पास होईल.

## २.विध्यर्थ

जेंव्हा वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून विधी म्हणजे र्कतव्य, शक्यता, योग्यता, इच्छा यांचा बोध होतो तेंव्हा त्यास विध्यर्थी क्रियापद असे म्हणतात. जसे

मुलांनी आईवडिलांची आज्ञा पाळावी. ( र्कतव्य )

अंगी र्धैय असणार्यांनीच हे र्काय करावे. ( योग्यता )

परीक्षेत मला पहिला र्वग मिळावा. ( शक्यता )

आता पाउस थांबवा. ( इच्छा )

कृपया उत्तर पाठवावे. ( विनंती )

तो बहुधा घरी असावा. ( शक्यता )

## ३.आज्ञार्थ

क्रियापदाच्या रूपावरून आज्ञा करणे किंवा मागणे, आशीर्वाद देणे, र्प्राथना, विनंती किंवा उपदेश करणे या गोष्टीचा बोध होतो तेंव्हा त्यास आज्ञार्थी क्रियापद असे म्हणतात.

मुलांनो, सर्वजण रांगेत उभे राहा. ( आज्ञा )

देवा, सर्वांना सुखी ठेव. ( र्प्राथना )

एवढे आमचे काम कराच. ( विनंती )

मी हे काम करू ? ( अनुमोदन प्रश्न )

तेवढी खिडकी लाव पाहू. ( सौम्य आज्ञा )

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## **४.संकेतार्थ**

संकेत म्हणजे अट. जेंव्हा वाक्यातील क्रियापदावरून संकेताचा अ॑थ निघतो म्हणजे अमुक केले असते तर अमुक झाले असते असे समजते, तेंव्हा त्यास संकेतार्थी क्रियापद असे म्हणतात. जसे

मला जर बरे असते, तर मी भाग घेतला असता.

निमंत्रण आले, तर मी येईन.

पाऊस आला , तरी सहल जाणाराच.

तू आला नसतास, तरी चालले असते.

## **आख्यातविकार**

संस्कृतात क्रियापदाला आख्यात असे म्हणतात. क्रियापदांना म्हणजेच आख्याताना तो, ला, ई, ईल, ऊ, वा वगेरे प्रत्यय लागून विविध काळ व अ॑थ यांची रूपे तयार होतात. त्यांना आख्यात प्रत्यय असे म्हणतात. काळ व अ॑थ क्रियापदाना होणारे हे विकार असल्यामुळे त्यांनाच अख्यातविकार असे म्हणतात. आख्यात या शब्दाऐवजी काळ व अर्थ हे शब्द अधिक सोपे व रूढ आहेत.

## **क्रियाविशेषण अव्यये**

शब्दांच्या आठ प्रकारांपैकी नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद या प्रकारांना विकारी असे म्हणतात.

क्रियाविशेषण अव्यय, शब्दयोगी अव्यय, उभयान्वयी अव्यय आणि केवलप्रयोगी अव्यय या शब्दप्रकारांना अविकारी असे म्हणतात.

नोटस फक्त मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## **क्रियाविशेषण**

क्रियापदाबद्दल अधिक महिती देणाऱ्या शब्दाला क्रियाविशेषण असे म्हणतात. क्रियापदाने जी क्रिया दॅशवली जाते ती केंव्हा घडली, कोठे घडली, कशी घडली, किती वेळा किंवा किती प्रमाणात घडली अशा प्रकारची अधिक माहिती देणारे शब्द वाक्यात येतात त्यांना आपण क्रियाविशेषण असे म्हणतात.

मुलगी जलद चालते. मुलगा जलद चालतो. मुली जलद चालतात.

वरील वाक्यातील जलद हे क्रियाविशेषण चालणे या क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगते तसेच लिंग, वचन यांमध्ये बदल केला तरी जलद या क्रियाविशेषणावर काही परिणाम होत नाही. त्यात बदल होत नाही. ते तसेच राहते म्हणून त्याला क्रियाविशेषण अव्यय असे

म्हणतात.

**क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगून जी अविकारी राहतात त्यांना क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.**

## क्रियाविशेषण अव्ययांचे प्रकार

## अर्थमूलक प्रकार

### १.कालवाचक क्रियाविशेषण अव्यय

वाक्यातील क्रिया केंव्हा, किती वेळ किंवा किती वेळा घडली हे दाखविणाऱ्या शब्दांना कालवाचक क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

उदाहरर्णाथ काल, दररोज, पूर्वी, वारंवार इत्यादी

### कालवाचक क्रियाविशेषण अव्यायाचे प्रकार

**अ.कालदर्शक ----** आता, आधी, सध्या, तूर्त, हल्ली, सांप्रत, उद्या, परवा, लगेच, केंव्हा, जेंव्हा, पूर्वी, मागे दिवसाचा रात्रीस इत्यादी.

**ब.सातत्यदर्शक ----** नित्य, सदा, सर्वदा, सतत, नेहमी, अद्यापि, दिवसभर, आजकाल इत्यादी.

**क.आवृत्तीदर्शक ----** वारंवार, फिरून, पुन्हापुन्हा, दररोज, सालोसाल, क्षणोक्षणी इत्यादी.

### २.स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय

वाक्यातील क्रिया घडण्याचे स्थळ किंवा ठिकाण दाखविणाऱ्या शब्दांना स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

उदाहरर्णाथ सर्वत्र, समोरून, तिथे, येथून इत्यादी.

नोटस फुकट मिळत असेल तरी चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## स्थलवाचक क्रियाविशेषण अव्ययाचे प्रकार

**अ.स्थितीदर्शक ----** इथे, तिथे, जिथे, खाली, वर, कोठे, मध्ये, अलीकडे, पलीकडे, मागे, पुढे, जिकडे , तिकडे, सभोवार इत्यादी.

**आ.गतीदर्शक ----** इकडून, तिकडून, दूर, लांब, तिथून, मागून, पुढून, वरून, खालून इत्यादी.

## ३.रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय

क्रिया घडण्याची रीत किंवा क्रिया कशी घडते हे दाखविणाऱ्या शब्दांना रीतीवाचक क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

उदाहरर्णाथ सावकाश, गटागटा, जपून, उभ्याने

## रीतिवाचक क्रियाविशेषण अव्ययाचे प्रकार

**अ.प्रकारदर्शक ----** असे, तसे, जसे, कसे, उगीच, व्यर्थ, फुकट, आपोआप, मुद्दाम, जेवी, तेवी, हळू, सावकाश, जलद इत्यादी.

**आ.अनुकरणदर्शक ----** झटकन, पटकन, पटपट, टपटप, चमचम, बदाबद इत्यादी.

**इ.निश्चयार्थक ----** खचित, खरोखर इत्यादी.

## ४.संख्यावाचक किंवा परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यये

क्रिया किती वेळा घडली हे किंवा क्रियेचे परिमाण दाखविणाऱ्या शब्दांना संख्यावाचक किंवा परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

उदाहरर्णाथ अनेकदा, नेहमी, भरपूर, किंचित, जरा, काहीसा, थोडा, क्वचित, अत्यंत, अगदी, बिलकुल, मुळीच, भरपूर, बहुत, अतिशय, मोजके, पूर्ण

नोटस फुकट मिळत आहेत त्या चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## ५.प्रश्नार्थक क्रियाविशेषण अव्यय

उदाहरर्णाथ तुम्ही आमच्याकडे याल का ?  आपण मला आपल्या घरी न्याल ना ?

वरील वाक्यातील का, ना, हे शब्द त्या त्या वाक्यातील विधानांना प्रश्नाचे स्वरूप देतात अशा

शब्दांना प्रश्र्नाथक क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

## ६.निषेधार्थक क्रियाविशेषण अव्यय

उदाहरर्णाथ तो न चुकता येतो.   तो तोंड उघडेल तर ना.

वरील वाक्यातील न, ना हे शब्द त्या-त्या वाक्यातील क्रियेचा नकार किंवा निषेध र्दशवितात अशा शब्दांना निषेर्धाथक क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

## स्वरूपमूलक प्रकार

## १.सिद्ध क्रियाविशेषण अव्यय

इथे, तिथे, आज, पुढे, मागे इत्यादी शब्द मुलतः क्रियाविशेषण अव्ययेच आहेत त्यांना सिद्ध क्रियाविशेषण अव्यये असे म्हणतात.

## २.साधित क्रियाविशेषण अव्यय

मोठ्याने, वस्तुतः, एकदा, हसताना, कोठून यासारखे शब्द मूळ शब्दांना प्रत्यय लागून बनलेले आहेत अशाना साधित क्रियाविशेषण अव्यय असे म्हणतात.

## अ.प्रत्यय साधित

**१.नामसाधित -** दिवसा, रात्री, वस्तुतः, व्यक्तिः, र्अथात

**२.सर्वनामसाधित -** त्यामुळे, ह्यावरून, कित्येकदा
**३.विशेषणसाधित -** मोठ्याने, एकदा, इतक्यात, एकत्र.

**४.धातुसाधित -** हसू, हसत, हसता, हसताना, हसून.

**५.अव्ययसाधित -** कोठून, इकडून, खालून, वरून, येथपर्यंत

**६.प्रत्ययसाधित -** शास्त्रदुष्टया, मन:पूर्वक, कालानुसार, बुद्धीपरस्पर

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

## सामासिक

संस्कृत किंवा फारशी उपर्सग, शब्दांच्या द्विरुकीतीने होणारे काही जोडशब्द किंवा सामासिक शब्द क्रियाविशेषणांचे र्काय करीत असतात. जसे आजन्म, यथाशक्ती, नि:संशय, यावज्जीव, प्रतिदिन, घरोघर, गावोगाव, गल्लोगल्ली, दररोज, समोरासमोर, हरघडी, गैरहजर

## ३.स्थानिक क्रियाविशेषण अव्यय

ती काय माती गाते ! ( नाम ), तो इंग्रजी चांगले बोलतो. ( विशेषण )

तो हसत बोलतो. ( कृदंत ) तू जिन्यावर ये. ( शब्दयोगी )

मी तर गरीब. ( उभयान्वयी ) दहा रुपये तरी लागतील. ( उभयान्वयी )

वरील वाक्यातील माती, चांगले, हसत, वर, तर ( खरोखर या अर्थाने ),तरी(निदान या अर्थी )

हे इतर प्रकारचे शब्द आहेत यांना कोणी स्थानिक क्रियाविशेषण अव्यय असेही म्हणतात.

## शब्दयोगी अव्यय

नामांना जोडून येणाऱ्या अव्ययाना शब्दयोगी अव्यय असे म्हणतात.

शब्दयोगी अव्यय सामान्यतः नामांना जोडून येतात असे असले तरी शब्दयोगी अव्यय क्रियापद आणि क्रियाविशेषण यांनाही कधी कधी जोडून येतात. जसे येईपर्यंत, बसल्यावर, जाण्यापेक्षा, बोलण्यामुळे, परवापासून, यंदापेक्षा, केंव्हाच, थोडासुद्धा इत्यादी.

## शब्दयोगी अव्ययाचे प्रकार

**१.कालवाचक -** आता, पूर्वी, पुढे, आधी, नंतर, पर्यंत, पावतो, गतीवाचक - आतून, खालून, मधून, पर्यंत, पासून.

**२.स्थलवाचक** - आत, बाहेर, मागे, पुढे, मध्ये, अलीकडे, समोर, जवळ, ठायी, पाशी, नजीक, समीप, समक्ष

**३.करणवाचक** - मुळे, योगे, करून, कडून, द्वारा, करवी, हाती

**४.व्यतिरेकवाचक** - शिवाय, खेरीज, विना, वाचून, व्यतिरिक्त, परता

**५.हेतुवाचक** - साठी, कारणे, करिता, अर्थी, प्रीत्यर्थ, निमित्त, स्थव

**६.तुलनावाचक** - पेक्षा, तर, तम, मध्ये, परीस

**७.योग्यतावाचक** - योग्य, सारखा, जोगा, सम, समान, प्रमाणे, बरहुकूम

**८.कैवल्यवाचक** - च, मात्र, ना, पण, फक्त, केवळ

**९.संग्रहवाचक** - सुद्धा, देखील, हि, पण, बरिक, केवळ, फक्त
**१०.संबंधवाचक** - विशी, विषयी, संबंधी.

**११.साहचर्यवाचक** - बरोबर, सह, संगे, सकट, सहित, सवे, निशी, समवेत.

**१२.भागवाचक** - पैकी, पोटी, आतून

**१३.विनिमयवाचक** - बद्दल, ऐवजी, जागी, बदली.

**१४.दिक्वाचक** - प्रत, प्रती, कडे, लागी.

**१५.विरोधवाचक** - विरुद्ध, वीण, उलटे, उलट

**१६.परिमाणवाचक** - भर

**नामसाधित शब्दयोगी अव्यय** - कडे, मध्ये, प्रमाणे, पूर्वी, अंती, मुळे, विषयी

**विशेषणसाधित शब्दयोगी अव्यय** - सम, सारखा, सहित, समान, योग्य, विरुद्ध

**धातुसाधित शब्दयोगी अव्यय** - करीता, देखील, पावेतो, लागी, लागून.

**क्रियाविशेषणसाधित शब्दयोगी अव्यय** - खालून, मागून, वरून, आतून, जवळून

**संस्कृत शब्दसाधित** - पर्यंत, विना, समक्ष, समीप, परोक्ष

शब्दयोगी अव्यय जोडताना मागील शब्दाचे सामान्यरूप होते. जसे

मांडव-मांडवाखाली, घरटे-घरटेबाहेर, घर-घरापुढे, कोल्हापूर-कोल्हापूरपासून, कोल्हापुरापासून

**शुद्ध शब्दयोगी अव्यय** - च, देखील, ना, पण, मात्र, सुद्धा, हि - अशी शब्दयोगी अव्यय आहेत कि ती शब्दाला जोडून येताना मागील शब्दांची सामान्यरूपे, होत नाहीत, अशा शब्दयोगी

अव्ययांना शुद्ध शब्दयोगी अव्यये असे म्हणतात. या शुद्ध शब्दयोगी अव्ययामुळे, मागील शब्दांच्या अर्थास विशेष जोर येतो.

**विभक्तीप्रत्ययांची कार्य करणाऱ्या शब्दयोगी अव्ययाना विभक्ती प्रतिरूपक अव्यये असे म्हणतात.**

| **विभक्ती** | **विभक्ती प्रतिरूपक अव्यये** |
|---|---|
| द्वितिया | प्रत, लागी |
| तृतीया | कडून, करवी, द्वारा, मुळे, योगे, प्रमाणे, सह, बरोबर, वतीने |
| चतुर्थी | करिता, साठी, कडे, प्रत, प्रीत्यर्थ, बद्दल, प्रती, ऐवजी, स्तव |
| पंचमी | पासून, पेक्षा, शिवाय, खेरीज, कडून, वाचून |
| षष्ठी | संबंधी, विषयी |
| सप्तमी | आत, मध्ये, खाली, ठायी, विषयी, समोर, भोवती, ऐवजी |

## <u>उभयान्वयी अव्यये</u>

दोन किंवा अधिक शब्द अथवा दोन किंवा अधिक वाक्ये यांना जोडणाऱ्या अविकारी शब्दांना उभयान्वयी अव्यय असे म्हणतात.

( उभय म्हणजे दोन, तर अव्यय म्हणजे संबंध असा उभयान्वयी या शब्दाचा अर्थ आहे. )

### <u>उभयान्वयी अव्ययाचे प्रकार</u>

### <u>१.प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्यय</u>

### <u>२.गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यय</u>

उभयान्वयी अव्ययांनी जोडली गेलेली वाक्ये स्वतंत्र किंवा एकमेकांवर अवलंबून नसणारी म्हणजे ती सारख्या दर्जाची असतील तर अशा प्रकारच्या उभयान्वयी अव्ययांना प्रधानात्वसूचक उभयान्वयी अव्यय असे म्हणतात. पण हीच अव्यये जेंव्हा एक प्रधान वाक्य व दुसरे गौण वाक्य ( म्हणजे अर्थाच्या दृष्टीने प्रधान वाक्यावर अवलंबून असलेले वाक्य ) असेल, तर अशी असमान दर्जाची वाक्ये जोडतात तेंव्हा त्यांना गौणत्वसूचक उभयान्वयी अव्यय असे म्हणतात.

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

## प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययाचे पोटप्रकार

### १.समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यये.

### ( समुच्चय म्हणजे बेरीज )

उदाहरर्णाथ आणि, व, शिवाय, अन, आणखी, आणिक, न, नि, व, ही

विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरवात झाली.

पिलाने घरट्याबाहेर मान काढली  व किलबिलाट केला.

भिकाऱ्याला मी एक सदरा दिला शिवाय त्याला जेवू घातले.

### २.विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये

( विकल्प म्हणजे दोहोंतील एकाची निवड )
उदाहरर्णाथ अथवा, वा, की, किंवा

देव जावो अथवा राहो, पांडुरंगी दृढ भावो.

पाउस पडो वा न पडो, तुला आज गावी गेलेच पाहिजे.

तुला ज्ञान हवे कि धन हवे?

तू ये किंवा न ये, मी जाणारच.

---

### ३.न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय ( न्यूनत्व म्हणजे कमीपणा ) यांना विरोधदर्शक असेही म्हणतात.

उदाहरर्णाथ किंवा, पण, परंतु, बाकी, तरी

शेतकर्यांनी शेते नांगरली पण पाऊस पडलाच नाही.

पुष्कळ मुले उत्तीर्ण झाली परंतु पहिल्या र्वगात कोणीच आले नाही.

मरावे परी कीर्तिरूपे उरावे.

आईला थोडे बरे नाही बाकी सर्व ठीक.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## ४.परिमाणबोधक उभयान्वयी अव्यय

उदाहरर्णाथ म्हणून, सबब, याकरिता, अतएव, तस्मात, त्यामुळे, म्हणून, यास्तव, सबब

मधूने उत्तम भाषण केले म्हणून त्याला बक्षीस मिळाले.

सायकल वाटेत नादुरस्त झाली सबब मला उशीर झाला.
तुम्ही त्याचा अपमान केला याकरिता तो तुमच्याकडे येत नाही.

## गौणत्वदर्शक उभयान्वयी अव्ययाचे प्रकार

## १.स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय

ज्या उभयान्वयी अव्ययांमुळे प्रधान वाक्याचे स्वरूप किंवा खुलासा गौण वाक्याने कळतो त्यास स्वरूपबोधक उभयान्वयी अव्यय असे म्हणतात.

उदाहरर्णाथ एक रुपये म्हणजे शंभर पैसे.

तो म्हणाला कि मी हरलो.

दशरथ म्हणून एक राजा होऊन गेला.

विनंती अर्ज ऐसा जे -

## २.उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय

म्हणून, सबब, यास्तव, कारण, की यासारख्या अव्ययांनी जेंव्हा गौण वाक्य हे प्रधानवाक्याचा उद्देश किंवा हेतू आहे असे दर्शविले जाते तेंव्हा त्यास उद्देशबोधक उभयान्वयी अव्यय असे

म्हणतात.
उदाहरर्णाथ चांगला औषधोपचार मिळावा म्हणून तो मुंबईस गेला.

विजेतेपद मिळावे यास्तव त्याने खूप प्रयत्न केले.

## ३.कारणबोधक उभयान्वयी अव्यय

कारण का, की, कारण की , की अशा प्रकारच्या कारण दाखविणाऱ्या अव्ययांना कारणबोधक उभयान्वयी अव्यय असे म्हणतात.

उदाहरर्णाथ त्याला बढती मिळाली, कारण त्याने चोख कामगिरी बजावली.

आम्हाला हेच कापड आवडते, का की ते आपल्या देशात तयार झाले आहे.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## ४.संकेतबोधक उभयान्वयी अव्यय

जर-तर, जरी-तरी, म्हणजे, की, तर हि अव्यये संकेत किंवा अट दाखवितात अशा अव्ययांना संकेतबोधक उभयान्वयी अव्यय असे म्हणतात.

उदाहरर्णाथ जर शाळेस सुट्टी मिळाली , तर मी तुमच्याकडे येईन.

जरी त्याला समजावून सांगितले तरी त्याने ऐकले नाही.

तू लवकर घरी आलास म्हणजे आपण बागेत जाऊ.

तू माझ्याकडे आलास कि मी येईन.

प्रयत्न केला तर फायदाच होईल.

## केवलप्रयोगी अव्यय

केवलप्रयोग अव्ययांचे वर्गीकरण त्यांच्या स्वरूपावरून न ठरवता ती अव्यये कोणती भावना व्यक्त करतात त्यावरून ठरते.

### केवलप्रयोगी अव्ययाचे पुढील प्रकार पडतात.

(१) **हर्षदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- वा, वावा, आहा, ओहो, आ-हा, अहाहा.

(२) **शोकदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- ऊं, अँः, अरेरे, अयाई, अगाई, हायहाय, हाय.

(३) **आश्चर्यकारक केवलप्रयोगी अव्यये** :- आँ, ओहो, अबब, बापरे, अहाहां, चक्‌चक्, अरेच्या.

(४) **प्रशंसादर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- शाबास, भले, वाहवा, यंव, छान, ठीक, फक्कड, खाशी.

(५) **संमतिदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- हां, जी, जीहां, ठीक, बराय, हाँ, अच्छा.

(६) **विरोधीदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- छे, छट्, हॅट, ऊः, उंह्, च, अंहं, छे छे.

(७) **तिरस्कारदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- धिक्, थुः, शीऽ, इश्श, हुडुत, हुड, फुस्, हत्, छत, छी.

(८) **संबोधनदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- अगे, अरे, अहो, ए, अगा, अगो, बा, रे.

(९) **मौनदर्शक केवलप्रयोगी अव्यये** :- चुप, चिंप, गप, गुपचित.

## व्यर्थ उद्‌गारवाची अव्यय

केवलप्रयोगी अव्यये सामान्यतः वाक्याच्या आरंभी येतात व भावना व्यक्त करतात पण काहीसे उद्‌गारासारखे वाटणारे शब्द वाक्याच्या मध्येही येतात. उदाहरर्णाथ

१.पण बेटे मन स्वस्थ राहीना.
२.मी आपला काय बोलणार ?

३.काल म्हणे मुलांनी गडबड केली.

४.येणार असेल तर येईन बापडा !

वरील वाक्यातील बेटे, आपला, म्हणे, बापडा हे शब्द कोणत्याही भावना व्यक्त करत नाहीत किंवा त्यांच्यामुळे अर्थातदेखील विशेष भर पडत नाही उलट वाक्याच्या अर्थाच्या दृष्टीने निर्रथक किंवा व्यर्थ हे शब्द येत असल्यामळे अशा शब्दांना व्यर्थ उद्गारवाची अव्यय असे म्हणतात.

बोलताना केवळ लकब म्हणून किंवा आठवनासे झाले म्हणून काही व्यक्तींच्या बोलण्यात पालूपदासारखे काही शब्द पुन्हापुन्हा येताना आढळतात जसे आता, बर का, जळल मेल, आणखीन, कळल इतक, जेहेते, बरिक वगेरे अशा शब्दांना पादपूर्णार्थक केवलप्रयोगी अव्यये किंवा पालुपदे असे म्हणतात.

## **<u>विभक्तीचे अर्थ</u>**

वाक्यात नामाचा किंवा सर्वनामाचा क्रियापदाशी जो संबंध असतो त्याला कारकसंबंध असे म्हणतात आणि त्या विभक्तीला कारकविभक्ती असे म्हणतात.

वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशी जे संबंध असतात, त्यांना कारर्कार्थ असे म्हणतात आणि क्रियापदाशिवाय इतर शब्दांशी असेलेले जे संबंध असतात त्या संबंधांना उपपर्दाथ असे म्हणतात.

## **<u>विभक्तीचे अर्थ</u>**

क्रियापदाने र्दशवलेली क्रिया करणारा वाक्यात कोणीतरी असतो त्याला र्कता असे म्हणतात. र्कत्याची विभक्ती कधी कधी प्रथमा असते. प्रथमेचा प्रमुख कारर्कार्थ र्कता होय.

र्कत्याने केलेली क्रिया कोणावर घडली हे सांगणारा शब्द म्हणजे र्कम. र्कमाची विभक्ती द्वितिया म्हणजेच द्वितीयेचा कारर्कार्थ र्कम होय.

वाक्यातील क्रिया ज्या साधनाने घडते किंवा ज्याच्या साधनाने घडते त्याला करण असे म्हणतात. ‘करण’ म्हणजे साधन. मी सुरीने सफरचंद कापले या वाक्यात कापण्याची क्रिया सुरी या साधनाने केली म्हणून सुरीने या शब्दाची विभक्ती तृतीया असून तृतीयेचा मुख्य कारर्कार्थ करण आहे.

जेंव्हा क्रिया दानाचा अर्थ व्यक्त करते तेंव्हा ते दान ज्याला करण्यात येते त्याच्या वाचक शब्दाला किंवा देणे, बोलणे, सांगणे इत्यादी अर्थाच्या क्रिया ज्याला उद्देशून घडतात त्या वस्तूला वा स्थानाला संप्रदान असे म्हणतात. ‘मी गुरुजीना दक्षिणा दिली’ या वाक्यात गुरुजीना याची विभक्ती चतुर्थी व चतुर्थीचा मुख्य कारकार्थ संप्रदान आहे. ( संप्रदान = दान )

क्रिया जिथून सुरु होते, तिथून ती व्यक्ती वा वस्तू दूर जाते म्हणजे क्रियेच्या संबंधाने ज्याच्यापासून एख्याद्या वस्तूचा वियोग दाखवावयाचा असतो त्यास अपादान असे म्हणतात. उदाहरणार्थ मी शाळेतून आताच घरी आलो या वाक्यातील शाळेतून या शब्दाची विभक्ती पंचमी व पंचमीच्या मुख्य कारकार्थ अपादान आहे. ( अपादान = वियोग )

वाक्यातील क्रिया कोठे घडली किंवा केंव्हा घडली हे सांगणाऱ्या म्हणजेच क्रियेचे स्थान किंवा काळ दर्शविणाऱ्या शब्दाच्या संबंधास अधिकरण असे म्हणतात. दररोज सकाळी मी शाळेत जातो या वाक्यातील सकाळी व शाळेत हे शब्द अनुक्रमे क्रियेचा काळ व स्थल दाखवितात त्यांची विभक्ती सप्तमी व सप्तमीचा मुख्य कारकार्थ अधिकरण आहे. ( अधिकरण = आश्रय, स्थान )

संबोधनाचा उपयोग हाक मारताना करतात. जे नाम संबोधन म्हणून वापरले जाते त्याला विकार होतो व प्रत्ययहि लागतात म्हणून संबोधन हि आठवी विभक्ती मानतात.

| **विभक्ती** | **प्रत्यय** | **कारकार्थ** |
|---|---|---|
| प्रथमा | प्रत्यय नाहीत | कर्ता |
| द्वितिया | स, ला, ना, ते | कर्म |
| तृतीया | ने, ए, शी, नी, ई, हि | करण |
| चतुर्थी | स, ला, ना, ते | संप्रदान |
| पंचमी | ऊन, हून | अपादान |
| षष्ठी | चा, ची, चे, च्या, ची | संबंध |
| सप्तमी | त, ई, आ | अधिकरण |
| संबोधन | -, नो | हाक |

विभक्ती हि कारकार्थवरून मानण्यापेक्षा प्रत्ययावरून मानवी.

काही शब्दयोगी अव्यये विभक्तीप्रत्ययाची कामे करतात. निरनिराळ्या विभक्तीच्या अर्थाने निरनिराळी शब्दयोगी अव्यय नामास लागतात व ती लागण्यापूर्वी बहुधा त्यांचे सामान्यरूप

नोट्स फुकट मिळत आहेत तर त्यांचा उपयोग करून घ्या धन्यवाद

होते. त्यांना विभक्तीप्रतीरूपक अव्यये असे म्हणतात. हि अव्यये विभक्तीचा अर्थही दर्शवितात.

## **<u>प्रयोग</u>**

वाक्यातील कर्ता, कर्म, क्रियापद यांच्या परस्परसंबंधाला प्रयोग असे म्हणतात.

कर्त्याची किंवा कर्माची क्रियापदाशी जी जुळणी, ठेवण किंवा रचना असते तिलाच व्याकरणात प्रयोग असे म्हणतात.

कर्ता शोधताना प्रथम वाक्यातील क्रियापदाचा मूळ धातू शोधून काढावा व त्याला ‘णारा’ प्रत्यय लावून कोण? असा प्रश्न करावा म्हणजे कर्ता मिळतो.

वाक्यातील क्रियापदाने दाखविलेली क्रिया कर्त्यापासून निघते व ती दुसऱ्या कोणावर किंवा कशावर तरी घडते. त्या क्रियेचा परीणाम ज्याच्यावर घडतो किंवा ज्याच्याकडे क्रियेचा रोख

किंवा कल असतो ते त्या क्रियेचे कर्म असते.

ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरुरी लागते त्यास सर्कमक क्रियापद असे म्हणतात. ज्या क्रियापदाचा अर्थ पूर्ण होण्यास कर्माची जरुरी लागत नाही, त्यास अर्कमक क्रियापद असे म्हणतात.

## **<u>प्रयोगाचे प्रकार</u>**

### **<u>प्रयोगाचे मुख्य तीन प्रकार आहेत.</u>**

**<u>१.कर्तरी प्रयोग</u>**

**<u>२.कर्मणी प्रयोग</u>**

**<u>३.भावे प्रयोग</u>**

कर्तरी प्रयोगात कर्ता हा धातुरुपेश ( क्रियापदाच्या रूपावर अधिकार चालविणारा ) असतो. कर्तरी प्रयोगातील क्रियापद सर्कमक असले तर त्यास सर्कमक कर्तरी प्रयोग व क्रियापद हे अर्कमक असल्यास त्यास अर्कमक कर्तरी प्रयोग असे म्हणतात. उदाहरर्णाथ

ती गाणे गाते. ( सर्कमक कर्तरी प्रयोग )

ती घरी जाते. ( अर्कमक कर्तरी प्रयोग )

नोटस उपयुक्त मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## <u>कर्तरी प्रयोगाची खूण</u>

र्कतरी प्रयोगात र्कता हा नेहमी प्रथमांत असतो व र्कम हे प्रथमांत किंवा द्वितीयांत असते. उदाहरर्णाथ मी शाळेतून आताच आलो.

पोपट पेरू खातो.

शिक्षक मुलांना शिकवितात.

## <u>कर्मणी प्रयोग</u>

र्कमणी प्रयोगात र्कम प्रथमात असते. र्कता प्रथमात कधीच नसतो. र्कता तृतीयांत, चतुर्थंत, सविकरणी तृतीयांत किंवा शब्दयोगी अव्ययंत असतो.उदाहरर्णाथ

तिने गाणे म्हटले.

मला हा डोंगर चढवतो.

रामाच्याने काम करवते.

मांजराकडून उंदीर मारला गेला.

## <u>कर्मणी प्रयोगाचे प्रकार</u>

**<u>१.प्रधानकर्तूक कर्मणी प्रयोग ----</u>** या प्रयोगात क्रियापद लिंगवचनानुसार बदलत असले तरी बहुतेक र्कताच प्रधान असतो, त्यास प्रधानर्कतूक र्कमणी प्रयोग असे म्हणतात.

उदाहरर्णाथ

तिने गाणे म्हटले.        मला हा डोंगर चढवतो.

**<u>२.शक्य कर्मणी प्रयोग ----</u>** रामाच्याने काम करवते या वाक्यात शक्यता सुचविलेली आहे

यातील क्रियापद शक्य क्रियापद आहे त्यास शक्य र्कमणी प्रयोग असे म्हणतात.

३.प्राचीन मराठी काव्यात सर्कमक धातूला ज हा प्रत्यय लावून करिजे, बोलिजे, कीजे, देईजे, अशी र्कमणी प्रयोगाची उदाहरणे पहावयास मिळतात. या प्रकारच्या प्रयोगास प्राचीन किंवा पुराण र्कमणी असे म्हणतात. उदाहरर्णाथ

त्वा काय र्कम करिजे लघु लेकराने

नळे इंद्रासी असे बोलिजेले

जो जो कीजे परर्माथ लाहो

द्विजी निशिधापासाव म्हणीजेलो

नोट्स फुकट मिळत असेल तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

४.त्याची गोष्ट लिहून झाली या प्रकारच्या वाक्यात त्याची हा र्कता षष्ठी विभक्तीत आहे. लिहून झाली या संयुक्त क्रियापदाने क्रियापदाच्या समाप्तीचा र्अथ सूचित केलेला असतो अशा प्रकारच्या प्रयोगाला समापन र्कमणी असे म्हणतात.

५.र्कमणी प्रयोगातील र्कत्याला कडून हे शब्दयोगी अव्यय लावून इंग्रजी भाषेतील पद्धतीप्रमाणे रचना करण्याचा जो नवीन प्रकार आहे त्यास नवीन र्कमणी किंवा र्कमर्कतरी असे म्हणतात. उदाहरर्णाथ शिपायाकडून चोर पकडला गेला.

इंग्रजीतील passive voice ला मराठीत र्कमर्कतरी असे म्हणतात. सर्कमक धातूच्या भूतकालवाचक कृदंताला जा या सहाय धातूची मदत देऊन हा प्रयोग करतात. र्कमर्कतरी ला काहीजण नवीन र्कमणी असे म्हणतात. जेंव्हा वाक्यातील र्कमाला प्राधान्य देऊन विधान करावयाचे असते किंवा र्कता स्पष्ट नसतो किंवा र्कत्याचा उल्लेख टाळावयाचा असतो त्यावेळी हा प्रयोग सोयीचा असतो. उदाहरर्णाथ

गाय गुराख्याकडून बांधिली जाते.
न्यायाधीशाकडून दंड आकारण्यात आला.
सभेत पत्रके वाटली गेली. सर्वांना समज दिली जाईल.

## भावे प्रयोग

जेंव्हा क्रियापदाचे रूप र्कत्याच्या किंवा र्कमाच्या लिंगवचनाप्रमाणे बदलत नसून ते नेहमी तृतीयपुरुषी, नपुंसकलिंगी, एकवचनी असून स्वतंत्र असते, तेंव्हा अशा प्रकारच्या वाक्यरचनेस भावे प्रयोग असे म्हणतात.
भावे प्रयोगात क्रियापदाचा जो भाव किंवा आशय असतो त्याला प्राधान्य असते व त्या मानाने र्कता किंवा र्कम दोन्ही गौण असतात.

## भावे प्रयोगाची खुण ----

१.र्कता तृतीयांत किंवा चतुर्थंत असतो.
उदाहरर्णाथ रामाने रावणास मारले.

२.र्कम असल्यास त्याची सप्रत्ययी द्वितिया विभक्ती असते.
उदाहरर्णाथ शिक्षकांनी विद्यार्थांना शिकवावे.
३.अर्कमक भावे प्रयोगात क्रियापद विद्यर्थी असते.
उदाहरर्णाथ त्याने आता घरी जावे.

नोट्स फुकट मिळत असेल तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

४.शर्क्यार्थक क्रियापदाचा नेहमीच भावे प्रयोग होतो.
उदाहरर्णार्थ त्याला घरी जाववते.

## भावकर्तरी प्रयोग

उदाहरर्णार्थ १.मला आज मळमळते.
२.तो घरी पोहचण्यापूर्वीच सांजावले.
३.आज सतत गडगडते.
४.सहलीस जाताना कात्रजजवळ उजाडले.
वरील वाक्यातील क्रियापदांना कर्ते असे नाहीत. सर्वच वाक्यातील क्रियापदे तृतीयपुरुषी नपुंसकलिंगी एकवचनी आहेत म्हणजे ती भावेप्रयोगी आहेत पण त्यांना कर्ते नसल्यामुळे हा अर्कतुक भावे प्रयोग होय. अशा वाक्यात क्रियेचा भाव किंवा र्अथ हाच वाक्यातील र्कता असल्यामुळे यास भावर्कतरी प्रयोग असेही म्हणतात.

## मिश्र किंवा संकर प्रयोग

र्कतरी व र्कमणी या दोन्ही प्रयोगाच्या छटा आढळणाऱ्या वाक्यातील प्रयोगास र्कतु-र्कमसंकर प्रयोग असे म्हणतात. उदाहरर्णार्थ
१.तू मला पुस्तक दिलेस.
२.तू कविता म्हटलीस.
३.तुम्ही कामे केलीत.
४.तू लाडू खाल्लास.

## कर्म भाव संकर प्रयोग

र्कमणी व भावे प्रयोगाच्या छटा असणाऱ्या वाक्यातील प्रयोगास र्कम भाव संकर भाव संकर प्रयोग असे म्हणतात. उदाहर्णार्थ
१.आईने मुलीला निजवले.
२.मी त्याला मुंबईस धाडले.

## कर्तु भाव संकर प्रयोग

र्कतरी व भावे प्रयोगाच्या छटा असणाऱ्या वाक्यातील प्रयोगास र्कतु भाव संकर प्रयोग असे म्हणतात. उदाहरर्णार्थ
१.तू गाईला घालविलेस.        २.तू मला वाचविलेस.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला प्रयोग करून द्या धन्यवाद

## समास

शब्दांच्या एकत्रीकरनास समास असे म्हणतात.

शब्दांच्या एकत्रीकरणाने जो एक जोडशब्द तयार होतो त्याला सामासिक शब्द असे म्हणतात. फोड करून दाखविण्याच्या पद्धतीला विग्रह असे म्हणतात. विग्रह म्हणजे कमीत कमी शब्दात

सामासिक शब्दाचे केलेले स्पष्टीकरण होय. उदाहरर्णाथ वनभोजन हा सामासिक शब्द असून 'वनातील भोजन' हा त्याचा विग्रह होय.

## समासाचे प्रकार

समासात कमीत कमी दोन पदे किंवा शब्द एकत्र येतात. दोन शब्दांपैकी कोणत्या पदाला वाक्यात अधिक महत्व म्हणजे कोणत्या पदाबद्दल आपल्याला अधिक बोलावयाचे असते यावरून समासाचे पुढील प्रकार पडतात.

**१.अव्ययीभाव समास ------ पहिले पद प्रमुख**

**२.तत्पुरुष समास ----- दुसरे पद प्रमुख**

**३.द्वंद्व समास ---- दोन्ही पदे महत्वाची**

**४.बहुव्रीहि समास ----- दोन्ही पदे महत्वाची नसून त्यावरून तिसऱ्याच पदाचा बोध**

**<u>अव्ययीभाव समास</u>** **<u>या सामासालाच प्रथमपदप्रधान समास असे म्हणतात.</u>**

जेंव्हा समासातील पहिले पद बहुधा महत्त्वाचे असते व या सामासिक शब्दाचा वापर क्रियाविशेषणासारखा केलेला असतो तेंव्हा अव्ययीभाव समास होतो.

उदाहरर्णाथ आजन्म - जन्मापासून, यथाशक्ती - शक्तीप्रमाणे, प्रतिदिन - प्रत्येक दिवशी, प्रतिक्षण - प्रत्येक क्षणाला

या समासाची आणखी उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत.
दररोज, हरहमेश, बिनधोक, बेलाशक, गैरशिस्त, बरहुकूम, दरमजल, बिनशर्त, बेमालुम, गैरहजर, गावोगाव, जागोजाग, गल्लोगल्ली, पदोपदी, घरोघर, दारोदार, रस्तोरस्ती, दिवसेंदिवस, पावलोपावली इत्यादी.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## तत्पुरुष समास

ज्या समासातील दुसरे पद महत्वाचे असते व अंथाच्या दृष्टीने गाळलेला शब्द किंवा विभक्तीप्रत्यय विग्रह करताना घालावा लागतो त्यास तत्पुरुष समास असे म्हणतात.

उदाहरर्णाथ तोंडपाठ - तोंडाने पाठ, कंबरपट्टा - कंबरेसाठी पट्टा, महादेव - महान असा देव, अनिष्ट - नाही इष्ट ते

तत्पुरुष समासातील दोन्ही पदे कधी कधी विग्रहाच्या वेळी एकाच विभक्तीत असतात यास सामानाधीकरण तत्पुरुष समास असे म्हणतात.
उदाहरर्णाथ काळमांजर - काळे असे मांजर

तत्पुरुष समासातील दोन्ही पदे भिन्न अशा विभक्तीत असतात यास व्याधीकरण तत्पुरुष समास असे म्हणतात.
उदाहरर्णाथ देवपूजा - देवाची पूजा

## <u>तत्पुरुष समासाचे प्रकार -----</u>

## <u>अ.विभक्ती तत्पुरुष समास</u>

ज्या तत्पुरुष समासात कोणत्यातरी विभक्तीचा किंवा विभक्तीचा अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दयोगी अव्ययाचा लोप करून दोन्ही पदे जोडली जातात त्यास विभक्ती तत्पुरुष समास असे म्हणतात. या समासाचा विग्रह करताना एका पदाचा दुसऱ्या पदाशी असलेला संबंध ज्या विभक्तीप्रत्ययाने दाखविला जातो त्याच विभक्तीचे नाव त्या समासाला दिले जाते.

| सामासिक शब्द | विग्रह | समास | आणखी उदाहरणे |
|---|---|---|---|
| दुख:प्राप्त | दु:खाला प्राप्त | द्वितिया तत्पुरुष | कृष्णाश्रित, देशगत |
| भक्तीवश | भक्तीने वश | तृतीया तत्पुरुष | तोंडपाठ, दयाद्र, गुणहीन, चौपट, ईश्वरनिंमित, बुद्धीजड |
| क्रीडांगण | क्रीडेसाठी अंगण | चतुर्थी तत्पुरुष | गायरान, पोळपाट, वाटर्खच, मेंढवाडा, पूजाद्रव्य, बाइलवेडा, व्याहीभोजन |
| ऋणमुक्त | ऋणातून मुक्त | पंचमी तत्पुरुष | सेवानिवृत्त, गंभश्रीमंत, जातीभ्रष्ट, चोरभय, जन्मखोड, लंगोटीमित्र |
| राजपुत्र | राजाचा पुत्र | षष्ठी तत्पुरुष | देवपूजा, राजवाडा, घोडदौड, लक्ष्मीकांत, धंमवेड, आंबराई, भूपती, विद्याभ्यास |
| घरजावई | घरातील जावई | सप्तमी तत्पुरुष | स्वंगवास, पोटशूळ, वनभोजन, कूपमंडूक, घरधंदा, कलाकुशल, पाणकोंबडा |
| | | | |

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

## आ.अलुक तत्पुरुष समास

ज्या विभक्ती तत्पुरुष समासात पूर्वपदाच्या विभक्तीप्रत्ययाचा लोप होत नाही त्यास अलुक तत्पुरुष समास असे म्हणतात. या समासाचे मराठी भाषेतील एकमेव उदाहरण म्हणजे तोंडीलावणे. या समासाची संस्कृत भाषेतील उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत - अग्रेसर, युधिष्ठिर,

पंकेरूह, सरसिज इत्यादी.

## इ.उपपद तत्पुरुष समास

ज्या तत्पुरुष समासातील दुसरी पदे हि धातुसाधिते किंवा कृदन्ते आहेत व ती अशी आहेत कि त्यांचा वाक्यात स्वतंत्रपणे उपयोग करता येत नाही अशा समासास उपपद किंवा कृदंत तत्पुरुष समास असे म्हणतात.
उदाहरर्णाथ ग्रंथकार, कुंभकार, पांथस्थ, र्मागस्थ, द्विज, विहग, शेषशायी, देशस्थ, मनुज, नृप, सुखद, पयोद, खग, नग, सुज्ञ, कृतघ्न, शेतकरी, कामकरी, आगलाव्या, भाजीविक्या, वाटसरू इत्यादी,

पंकेरूह, सरसिज यासारखे संस्कृत सामासिक शब्द व मळेकरी, पहारेकरी, पाखरेविक्या, गळेकापू यासारखे मराठी सामासिक शब्द हे अलुक व उपपद तत्पुरुष अशा दोन्ही प्रकारची उदाहरणे आहेत. यातील पहिल्या पदातील विभक्तीचा लोप झाला नाही म्हणून ते अलुक व त्यातील दुसरी पदे धातूसाधिते आहेत म्हणून ते उपपद तत्पुरुष अशा समासांना उभय-तत्पुरुष असेही म्हणतात.

## ई.नत्र तत्पुरुष समास

ज्या तत्पुरुष समासातील पहिले पद नकारार्थी असते त्यास नत्र तत्पुरुष समास असे म्हणतात.
उदाहरर्णाथ अपुरा, नास्तिक, अयोग्य, अनादर, नापसंत, अनाचार, अन्याय, अहिंसा, निरोगी, नाइलाज, नाउमेद, बेडर, गैरहजर इत्यादी

## उ.कर्मधारय समास

ज्या तत्पुरुष समासातील दोन्ही पदे एकाच विभक्तीत म्हणजे प्रथमा विभक्तीत असतात तेंव्हा त्यास र्कमधारय समास असे म्हणतात.
उदाहरर्णाथ महादेव, घनश्याम, रक्तचंदन, मुखकमल.

नोट्स फुकट मिळत आहेत तर यांचा उपयोग करून घ्या धन्यवाद

## कर्मधारय समासाचे पोटप्रकार

१.विशेषण पूर्वपद ---- रक्तचंदन, नीलकमल, पितांबर

२.विशेषण उत्तरपद ---- घननील, पुरुषोत्तम, भाषांतर, वेषांतर

३.विशेषण उभयपद ---- पांढराशुभ्र, श्यामसुंदर, लालभडक, हिरवागार, काळाभोर

४.उपमान पूर्वपद ---- कमलनयन, मेघश्याम, चंद्रमुख
५.उपमान उत्तरपद ---- मुखचंद्र, चरणकमल, नरसिंह

६.रूपक उभयपद ---- विद्याधन, काव्यामृत, भवसागर, विद्दुलता, चरणकमल

## ऊ.द्विगु समास

ज्या र्कमधारय समासातील पहिले पद संख्याविशेषण असते व सामासिक शब्दावरून एका समूच्ययाचा र्अथ र्दशविला जातो तेंव्हा त्यास द्विगु समास असे म्हणतात.

उदाहरर्णाथ पंचवटी, नवरात्र, चार्तुमास, त्रिभुवन, सप्ताह, त्रिदल, पंचपाळे, चौघडी, त्रैलोक्य, बारभाई, पंचारती इत्यादी.

द्विगु समासाला संख्यापूर्वपद र्कमधारय समास असेही म्हणतात.

## ए.मध्यमपदलोपी समास

ज्या सामासिक शब्दातील पाहिल्या पदाचा दुसऱ्या पदाशी संबंध दाखविणारी मधली काही पदे लोप करावी लागतात त्यांना मध्यमपदलोपी समास असे म्हणतात.

उदाहरर्णाथ कांदेपोहे, साखरभात, चुलतसासरा

या पदाला लुप्तपद र्कमधारेय समास असेही म्हणतात.

आणखी उदाहरणे पुढीलप्रमाणे डाळवांगे, पुरणपोळी, लंगोटीमित्र, भोजनभाऊ, घोडेस्वार,

मावसभाऊ, बालमित्र, गुळांबा, मामेभाऊ, बटाटेभात, नातसून इत्यादी

## द्वंद्व समास

ज्या समासातील दोन्ही पदे अर्थदृष्ट्या प्रधान म्हणजे समान र्दजाची असतात त्यास द्वंदव समास असे म्हणतात. आणि, व, अथवा, किंवा या उभयान्वयी अव्ययांनी हि पडे जोडलेली असतात. उदाहरर्णाथ रामलक्ष्मण, पापपुण्य, विटीदांडू

## द्वंद्व समासाचे प्रकार

## १.इतरेतर द्वंद्व समास

आणि, व या सुमच्चयबोधक उभयान्वयी अव्ययांचा वापर

उदाहरर्णाथ आईबाप, हरिहर, स्त्रीपुरुष, अहिनकुल, एकवीस, कृष्णार्जुन, बहीणभाऊ इत्यादी

## २.वैकल्पिक द्वंद्व समास

किंवा, अथवा, वा या विकल्प दाखविणाऱ्या उभयान्वयी अव्ययांचा वापर

उदाहरर्णाथ खरेखोटे, तीनचार, बरेवाईट, पासनापास, पापपुण्य, धर्माधर्म, न्यायान्याय, सत्यासत्य इत्यादी

## ३.समाहार द्वंद्व समास

ज्या समासातील पदाचा विग्रह करताना त्यातील पदांच्या अर्थाशिवाय त्याच जातीच्या इतर पदार्थांचा त्यात समावेश म्हणजेच समाहार केलेला असतो त्यास समाहार द्वंद्व समास असे म्हणतात. उदाहरर्णाथ

मीठभाकर, चहापाणी, भाजीपाला, अंथरूनपांघरून

## बहुव्रीही समास

बहुव्रीही या सामासिक शब्दातील दोन्ही पदे महत्वाची नसून या दोन पदांशिवाय तिसऱ्याच पदाचा बोध होतो, हा सामासिक शब्द त्या तिसऱ्या पदाचे विशेषण असते.

## बहुव्रीही समासाचे प्रकार

### १.विभक्ती बहुव्रीही समास

| प्रकार | सामासिक शब्द | विग्रह | इतर उदाहरणे |
|---|---|---|---|
| द्वितिया | प्राप्तधन | प्राप्त आहे धन ज्यास तो | प्राप्तोदक, लब्धदृष्टी |
| ततीया | कतकार्य | कत आहे कार्य ज्याने तो | जितेंद्रिय, कतकत्य, दत्तधन |
| चतुर्थी | चौकोन | चार आहेत कोण ज्याला तो | दशमुख, गजानन, दुतोंडा |
| पंचमी | निर्धन | निर्गत आहे धन ज्याच्यापासून तो | निर्बल, गलितर्पण, गतवैभव |
| षष्ठी | लंबोदर | लंब आहे उदर ज्याचे तो | चक्रपाणी, चंद्रशेखर, मूषकवाहन, गरुडध्वज, लक्ष्मीकांत |
| सप्तमी | भिमादी | भीम आदी आहे ज्यात तो | कृपादी, नाक, पूर्णजल |

नोट्स फुकट मिळत आहेत तर त्यांचा उपयोग करून घ्या धन्यवाद

## <u>विभक्ती बहुव्रीही समासाचे प्रकार</u>

**<u>अ.समानाधीकरण बहुव्रीही समास ----</u>** बहुव्रीही समासाचा विग्रह करताना दोन्ही पदे एकाच विभक्तीत

उदाहरर्णाथ भक्तप्रिय, जितेंद्रिय

**<u>आ.व्याधीकरण बहुव्रीही समास ----</u>** बहुव्रीही समासाचा विग्रह करताना दोन्ही पदे भिन्न विभक्तीत

उदाहरर्णाथ पद्मनाभ, चक्रपाणी

**<u>२.नत्र बहुव्रीही समास</u>**

बहुव्रीही समासाचे पहिले पद अ, अन, न, नि असे नकारर्दशक असेल तर त्यास नत्रबहुव्रीही समास असे म्हणतात. उदाहरर्णाथ

अव्यय, अनेक, नपुंसक, अनादी, र्निधन, नि:शब्द, निरोगी, अनंत, निरस

**<u>३.सहबहुव्रीही समास</u>**

बहुव्रीही समासाचे पहिले पद सह असे असून तो सामासिक शब्द विशेषण असल्यास त्याला सहबहुव्रीही समास असे म्हणतात.

**<u>४.प्रादीपबहुव्रीही समास</u>**

बहुव्रीही समासाचे पहिले पडे जर प्र, परा, अप, दूर, सु, वि अशा उपर्सगानि युक्त असेल तर त्यास प्रादीपबहुव्रीही समास असे म्हणतात. उदाहरर्णाथ

सुलोचना, र्निधन, विरागी, र्दुगुणी, प्राज्ञ इत्यादी

**<u>समासाविषयी काही महत्वाचे</u>**

१.द्वंद्व व तत्पुरुष समस्त असलेले शब्द नामे किंवा विशेषण असतात.

२.अव्ययीभाव असलेला शब्द क्रियाविशेषण असतो.

३.बहुव्रीही समास असलेला शब्द विशेषण असतो.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

# <u>शब्दसिद्धी</u>

शब्द कसा बनतो म्हणजेच सिद्ध होतो याला शब्दसिद्धी असे म्हणतात.

**<u>१.तत्सम शब्द -----</u>** संस्कृत भाषेतून जसाच तसे मराठी भाषेत आलेले शब्द \

उदाहरर्णाथ कवि, मधु, गुरु, पिता, पुत्र, कन्या, वृक्ष, पुरुष, र्धम, सत्कार, सर्मथन, उत्सव, पुष्प, जल, प्रीती, कर, ग्रंथ, पृथ्वी, भूगोल, विद्यवान, भगवान, परंतु, यद्यपि, यथामती, र्कण, र्पण, अरण्य, हस्त, मस्तक, र्कम, अग्नी, नदी, कमल इत्यादी

**<u>२.तदभव शब्द -----</u>** संस्कृत शब्दांच्या मूळ रुपात बदल होऊन मराठीत आलेले शब्द

उदाहरर्णाथ कान, चाक, आग, पान, विनंती, घर, पाय, भाऊ, सासू, सासरा, गाव, दुध, घास, कोवळा, ओठ, घाम, काम, इत्यादी

**<u>३.देशी किंवा देशज शब्द -----</u>** या शब्दांनाच देशी, देश्य, किंवा देशज शब्द असे म्हणतात.

उदाहरर्णाथ झाड, दगड, धोंडा, घोडा, डोळा, डोके, हाड, पोट, गुडघा, बोका, रेडा, बाजरी, वांगे, लुगडे, झोप, खुळा, चिमणी, ढेकुण, कंबर इत्यादी.

**<u>४.परभाषीय शब्द ------</u>** याचे दोन उपप्रकार पडतात.

अ.परकीय किंवा विदेशी शब्द

ब.स्वदेशी शब्द (परप्रांतीय भारतीय शब्द)

## <u>अ.परकीय किंवा विदेशी शब्द</u>

**<u>इंग्रजी ------</u>** टेबल, पेपर, मार्क, नंबर, टीचर, सर, म्याडम, ऑफीस, ट्रेन, रेल्वे, बस, टिकीट, ड्रायव्हर, मोटर, कडक्टर, स्टेशन, पोस्ट, र्काड, र्पासल, र्नस, डॉक्टर, पेशंट, इंजेक्शन, हॉस्पिटल, र्शट, पैंट, बटन, बट, बॉल, ड्रेस, ग्लास इत्यादी.

**<u>पोर्तुगीज -----</u>** बटाटा, तंबाखू, पगार, बिजागरे, कोबी, हापूस, फणस इत्यादी.

**<u>फारसी -----</u>** खाना, सामान, हकीकत, अत्तर, अब्रू, पेशवा, सौदागर, कामगार, गुन्हेगार, फडणवीस इत्यादी.

**<u>अरबी -----</u>** र्अज, इनाम, हुकुम, मेहनत, जाहीर, मंजूर, शाहीर, साहेब, मालक इत्यादी.

## ब.स्वदेशी शब्द ( परप्रांतीय भारतीय शब्द )

**कानडी -----** अन्नम अक्का, ताई, अडकित्ता, भाकरी, तूप, कुंची, कांबळे, खलबत्ता, विळी, गुढी, किल्ली, गुंडी, शिकेकाई इत्यादी

**गुजराती -----** घी, दादर, शेट, दलाल, डबा, रिकामटेकडा इत्यादी

**तामिळी -----** चिल्लीपिल्ली, सार, मठ्ठा इत्यादी

**तेलगु -----** ताळा, अनारसा, किडूकमिडूक इत्यादी

**हिंदी -----** भाई, बेटा, बच्चा, मिलाप, तपास, दिल, और, बात, दाम, करोड इत्यादी.

## सिद्ध, साधित, उपसर्ग, प्रत्यय

जा, ये, कर, बस, बोल, पी यासारखे मूळ धातू किंवा शब्द भाषेत असतात त्यांना सिद्ध शब्द असे म्हणतात. कर यासारख्या सिद्ध धातूपासून करू, करून, र्कता, करणारा, होकार, प्रतिकार, यासारखे शब्द बनवितात त्यांना साधित शब्द असे म्हणतात.

मूळ शब्दाच्या मागे एक किंवा अधिक अक्षरे लावून काही साधित शब्द बनवितात. या अक्षरांना उपर्सग असे म्हणतात.

उदाहरर्णाथ आ + हार = आहार, याचप्रमाणे विहार, परिहार, विहार, अपहार, संहार, उपहार, प्रहार, उपाहार इत्यादी

## साधित शब्दांचे प्रकार

### १.उपसर्गघटीत शब्द

शब्दांच्या पूर्वी उपर्सग लागून जे शब्द तयार होतात त्यांना उपर्सगघटीत शब्द असे म्हणतात.

### २.प्रत्ययघटीत शब्द

शब्दांच्या किंवा धातूच्या पुढे एक किंवा अधिक अक्षरे लावून काही शब्द तयार होतात अशा अक्षरांना प्रत्यय असे म्हणतात. जन या धातूला प्रत्यय लागून जनन, जननी, जनता, जन्य यासारखे शब्द बनतात. या शब्दात न,क,ता,नी,य हे प्रत्यय होत. अशा तऱ्हेचे प्रत्यय लागून बनलेल्या शब्दांना प्रत्ययघटीत शब्द असे म्हणतात.

### ३.सामासिक शब्द

नाम मुक्त मिळत आहेत ता चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

**४.अभ्यस्त शब्द -----** साधित शब्दाचा चौथा प्रकार म्हणजे अभ्यस्त शब्द. घरघर, हळूहळू, शेजारीपाजारी, दगडबीगड, यासारख्या शब्दात एकाच शब्दाचा किंवा काही अक्षरांची पुनरावृत्ती किंवा द्‌वित्व होऊन हे शब्द बनलेले असतात.
अभ्यस्त म्हणजे द्‌वित्व किंवा दुप्पट करणे.

## अभ्यस्त शब्दाचे तीन प्रकार असतात.

**अ.पुर्नाभ्यस्त शब्द -----** एक पूॅण शब्द पुन्हा पुन्हा येवून एक जोडशब्द बनतो तेव्हा त्याला पुॅनाभ्यस्त शब्द असे म्हणतात.
उदाहरर्णाथ जे जे ते ते, लाललाल, घेईघेई, मधूनमधून, समोरासमोर, वा वा , तीळतीळ, हालहाल, तुकडेतुकडे, कोणीकोणी, एकेक, हळूहळू, पुढेपुढे, मागोमाग, हायहाय

**ब.अंशाभ्यस्त शब्द ----**

उदाहरर्णाथ शेजारीपाजारी, झाडबीड, बारीकसारीक, उरलासुरला, आडवातिडवा, अॅधामुॅधा, अघळपघळ, दगडबिगड, गोडधोड, किडूकमिडूक, घरबीर, उद्‌याबिद्‌या इत्यादी
कधी कधी पहिल्या नामाच्या अॅथाचेच नाम जोडून द्‌विरुक्ती होते. उदाहरर्णाथ कागदपत्र, कामगाज, कपडालत्ता, बाजारहाट, साजशृंगार, बाडबिस्तरा
फारसी + फारसी = अक्कलहुशारी, डावपेच, जुलूमजबरी
फारसी + मराठी = अंमलबजावणी, कागदपत्र, र्खचवेच, मेवामिठाई, बाजारहाट इत्यादी
मराठी + फारसी = दंगामस्ती, थटामस्करी, धनदौलत, मानमरातब, रीतरिवाज,

**क.अनुकरणवाचक शब्द ----**
काही शब्दात एखाद्‌या ध्वनीवाचक शब्दाची पुनुरुक्ती साधलेली असते. उदाहरर्णाथ बडबड, किरकिर, गुटगुटीत, कडकडाट, गडगडाट, फडफड, खदखदून, तुरुतुरु, चूटचूट, गडगड, वटवट अशा शब्दांना अनुकरणवाचक शब्द असे म्हणतात.

## वाक्यपृथकरण

बोलणारा ज्याच्याविषयी बोलतो त्याला उद्देश्य असे म्हणतात व उद्देशाविषयी तो जो बोलतो त्याला विधेय असे म्हणतात.

वाक्याचे दोन भाग पडतात. १. उद्देश्य विभाग व २.विधेय विभाग यांना उद्देशांग व विधेयांग असेही म्हणतात.

## वाक्यांचे प्रकार

१.ज्या वाक्यात केवळ विधान केलेले असते त्यास विधानार्थी वाक्य असे म्हणतात. उदाहरणार्थ माझे वडील आज परगावी गेले.

२.ज्या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो त्यास प्रश्नार्थी वाक्य असे म्हणतात. उदाहरणार्थ तू मुंबईला कैंव्हा जाणार आहेस ?

३.ज्या वाक्यात भावनेचा उद्गार काढलेला असतो त्यास उद्गारार्थी वाक्य असे म्हणतात. उदाहरणार्थ अबब ! केवढी प्रचंड आग ही !

४.वाक्यातील विधाने हि कधी कधी होकारार्थी असतात जसे गोविंदा अभ्यास करतो पण काही विधानात नकार असतो जसे त्याचा मुलगा मुळीच अभ्यास करत नाही. अशा वाक्यांना नकारार्थी वाक्य असे म्हणतात. या होकारार्थी व नकारार्थी वाक्यानाच करणरुपी व अकरणरुपी वाक्ये असे म्हणतात.

## क्रियापदाच्या रूपावरून वाक्याचेख ालील प्रकार पडतात.

१.वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून नुसताच काळाचा बोध होत असेल तर त्यास स्वार्थी वाक्य असे म्हणतात. उदाहरणार्थ मुले घरी गेली - जातात - गेली - जातील.

२.वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून विधी म्हणजे र्कतव्य, शक्यता, योग्यता, इच्छा या गोष्टींचा बोध होत असेल तर त्यास विध्यर्थी वाक्य असे म्हणतात. उदाहरणार्थ मुलांनी वडिलांची आज्ञा पाळावी. मला परीक्षेत पहिला र्वग मिळावा.

३.वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून आज्ञा, आशीर्वाद, र्प्राथना, विनंती किंवा उपदेश या गोष्टींचा बोध होत असेल तर त्यास आज्ञार्थी वाक्य असे म्हणतात. उदाहरणार्थ मुलांनो, चांगला अभ्यास करा. परमेश्वरा मला चांगली बुद्धी दे.

४.वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून अमुक केले असते तर अमुक झाले असते अशी अट किंवा संकेत असा र्अथ निघत असेल तर त्यास संकेतार्थी वाक्य असे म्हणतात. उदाहरणार्थ पाऊस पडला असता तर हवेत गारवा आला असता.

नोट्स फुकट मिळत आहेत तर त्यांचा उपयोग करून घ्या धन्यवाद

**<u>एका वाक्यात किती विधाने असतात त्यावरून वाक्यांचे आणखी तीन प्रकार पडतात.</u>**

## १.केवलवाक्य

ज्या वाक्यात एकच उद्देश्य व एकच विधेय असते त्यास केवल किंवा शुद्ध वाक्य म्हणतात.

उदाहरर्णाथ आम्ही जातो आमुच्या गावा.
तानाजी लढता लढता मेला.
अलीकडे मी तुम्हाला एकही पत्र लिहिले नाही.
एकदा बागेत खेळताना आमचा कुत्रा काळूराम हौदात पडला.
पांढरे स्वछ दात मुखास शोभा देतात.
शरदाच्या चांदण्यात गुलमोहर मोहक दिसतो.
एके दिवशी युद्ध बंद झाल्याची बातमी येऊन धडकली.

## २.मिश्रवाक्य

एक प्रधानवाक्य व एक किंवा अधिक गौणवाक्ये गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडून जे एक समिश्र वाक्य तयार होते त्यास मिश्र वाक्य असे म्हणतात. उदाहरर्णाथ
जे चकाकते, ते सोने नसते.
गुरुजी म्हणाले, की प्रत्येकाने नियमितपणे शाळेत यावे.
आकाशात जेव्हा ढग जमतात, तेंव्हा मोर नाचू लागतो.
गुरुजी म्हणाले कि एकी हेच बळ.
जे चकाकते ते सारे सोने नसते.
दिव्यत्वाची जेथे प्रचीती, तेथे कर माझे जुळती.

## ३.संयुक्तवाक्य

दोन किंवा अधिक केवलवाक्ये प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली असता जे एक जोडवाक्य तयार होते त्यास संयुक्त वाक्य असे म्हणतात. उदाहरर्णाथ
मी रोज सकाळी पहाटे लवकर उठतो व एक तासभर शाळेचा अभ्यास करतो.
सायंकाळी मी क्रीडांगणावर खेळतो किंवा मित्रांसोबत फिरावयास जातो.

मिश्रवाक्यात एकच वाक्य प्रधान असते, बाकीची सर्व गौण असतात.
संयुक्त वाक्यात दोन किंवा अधिक प्रधानवाक्ये असतात.

फक्त मिळत असेल तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

## गौणवाक्यांचे प्रकार

**१.नामाचे कार्य करणाऱ्या गौणवाक्याला नामवाक्य म्हणतात.** उदाहर्णाथ

तो उत्तीर्ण झाला, फार चांगले झाले.

गुरुजी म्हणाले कि मुलांनी नेहमी खरे बोलावे.

प्रश्न असा आहे कि त्याच्याजवळ पुरेसे पैसे नाहीत.
आम्ही स्पर्धत हरलो हि वार्ता खरी आहे.

## २.विशेषणवाक्ये

जो आवडतो सर्वांना तोची आवडे देवाला.

जी आपणाला काही शिकवितात अशी पुस्तके मुलांनी वाचावी.

## ३.क्रियाविशेषणवाक्ये

जेंव्हा घाम गाळावा तेंव्हाच खायला भाकरी मिळते. कालर्दशक

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती. स्थलर्दशक

तुला जसे वाटेल तसे वाग. रीतीर्दशक

जर प्रामाणिकपणे अभ्यास केला असशील तर उत्तीर्ण होशील. संकेतर्दशक

पावसाळा असला तरी मुले अलीकडे छत्र्या वापरत नाहीत. विरोधर्दशक

तो इतका मोठ्याने बोलला कि त्याचा आवाज बसला. कारणर्दशक

शरीर घाटदार व्हावे म्हणून आम्ही व्यायाम करतो. उद्देशर्दशक

## वाक्यसंश्लेषण

वाक्यसंश्लेषण यालाच वाक्यसंकलन असेही म्हणतात. एकमेकांशी संबंध असलेली दोन किंवा अधिक केवलवाक्ये दिली असता ती एकत्र करून त्याचे एक वाक्य बनविणे यालाच वाक्यसंश्लेषण असे म्हणतात.

## दोन किंवा अधिक केवलवाक्यांचे एक केवलवाक्ये बनविणे.

१.तो फारशीवरून चालत होता. त्याचा पाय घसरला. तो पडला.

फारशीवरून चालत असताना पाय घसरून तो पडला.

२.माझ्या आजीने मला एक डब्बा पाठविला. त्यात खाण्याचे गोड पर्दाथ होते.

माझ्या आजीने मला गोड खाऊचा एक डब्बा पाठविला.

नोटस फुकट मिळत आहेत तर त्याचा उपयोग करून द्या धन्यवाद

३.मी चहा पितो. माझ्या वडिलांना ते आवडत नाही.
माझे चहा पिणे माझ्या वडिलांना आवडत नाही.

४.रवीन्द्रनाथ टागोर हे थोर कवी होते. रवीन्द्रनाथानी गीतांजली हे काव्य लिहिले.
गीतांजलीचे लेखक , रवीन्द्रनाथ टागोर हे थोर कवी होते.

५.अर्जुनाने फिरत्या मत्स्याच्या डोळ्याचा नेम धरला.
अर्जुनाने बाण मारला.
अर्जुनाने फिरत्या मत्स्याच्या डोळ्याचा नेम धरून बाण मारला.

६.हे आधुनिक लोकशाहीचे युग आहे.
या युगात समाजाने वेळीच जागृत व्हावे.
समाजाने आपला योग्य र्माग सुधारावा.
या आधुनिक लोकशाहीच्या युगात समाजाने जागृत होवून आपला योग्य र्माग सुधारावा.

७.हा श्रीमंताचा पोर आहे.
तो आहे खुळा.
आमची स्थिती तशीच आहे.
आमची स्थिती ह्या श्रीमंताच्या खुळ्या पोरासारखीच आहे.

एखाद्या नामचे स्पष्टीकरण करणाऱ्या त्याच अर्थाच्या शब्दास समानाधिकरण असे म्हणतात.

## **संयुक्त वाक्य बनविणे.**

१.विजा चमकू लागल्या. पावसाला सुरवात झाली.
विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरवात झाली.

२.लोक आपली स्तुती करोत. लोक आपली निंदा करोत.
लोक आपली स्तुती करोत किंवा निंदा करोत.

३.आपण मरावयास हरकत नाही. आपण कीर्तीरुपाने उरावे.
मरावे परी कीर्तीरूपे उरावे.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

४.वाटेत मोटर नादुरस्त झाली. मला यावयास उशीर झाला.
वाटेत मोटर नादुरुस्त झाली म्हणून मला यावयास उशीर झाला.

५.एकाने माणसे मोजून पहिली.
ती नउच भरली.
एकाने माणसे मोजून पहिली, पण ती मोजून नउच भरली.

६.आम्हाला नेण्यासाठी जहाज आले.
आम्ही बचावलो.
आम्हाला नेण्यासाठी जहाज आले म्हणून आम्ही बचावलो.

नोटस पुढे मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

**मिश्र वाक्य बनविणे.**

१.गुरुजी म्हणाले, पृथ्वी सूर्याभोवती फिरते.
गुरुजी म्हणाले कि, पृथ्वी सूर्याभोवती फिरते.

२.विठ्ठल परीक्षेत उत्तीर्ण झाला. त्याने प्रामाणिकपणे अभ्यास केला होता.
विठ्ठल परीक्षेत उत्तीर्ण झाला कारण त्याने प्रामाणिकपणे अभ्यास केला होता.

३.आमचे शरीर सुदृढ व्हावे. आम्ही योगासने करतो.
आमचे शरीर सुदृढ व्हावे म्हणून आम्ही योगासने करतो.

४.उद्या सुट्टी मिळेल. मी तुझ्या घरी येईन.
उद्या सुट्टी मिळाली तर मी तुझ्या घरी येईन.

५.भगवान विष्णू ध्रुवाला म्हणाले.
“मी तुझ्यावर प्रसन्न आहे”
भगवान विष्णू ध्रुवाला म्हणाले की, मी तुझ्यावर प्रसन्न आहे.

**एकाच वाक्याचे केवल, मिश्र व संयुक्त वाक्यात रुपांतर पुढीलप्रमाणे करता येईल.**

आरती सुरु झाली. घंटानाद सुरु झाला.
केवलवाक्य - आरती सुरु झाल्यावर घंटानाद सुरु झाला.
संयुक्तवाक्य - आरती सुरु झाली आणि घंटानाद सुरु झाला.
मिश्रवाक्य - जेंव्हा आरती सुरु झाली तेंव्हा घंटानाद सुरु झाला.

## वाक्यरुपांतर

**वाक्यार्थाला बाधा न आणता रचनेत केलेला बदल म्हणजे वाक्यरुपांतर होय.**

### १.प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्याचे परस्पररुपांतर

जगी सर्वसुखी असा कोण आहे ?
जगात सर्वसुखी असा कोणी नाही.

अपमान केल्यास कुणाला राग येत नाही ?
अपमान केल्यास प्रत्येकाला राग येतोच.

फुकट दिले तर कोण नको म्हणेल ?
फुकट दिले तर कोणी नको म्हणणार नाही.

आम्ही तुमचे उपकार कसे विसरू?
आम्ही तुमचे उपकार मुळीच विसरणार नाही.

कुणी कोडे माझे उकलील का ?
माझे कोडे कुणी उकलणार नाही.

आपण त्यांच्याकडे जायला नको का ?
आपण त्यांच्याकडे अवश्य जायला हवे.

मुलांच्या अभ्यासाची काळजी नको का ?
मुलांच्या अभ्यासाची जरूर काळजी घ्यायला हवी.

### २.उद्गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पररुपांतर

केवढी उंच इमारत हि !

नोट्स फक्त मिळत असेल तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

हि इमारत खूप उंच आहे.

काय उकडले हो काल रात्री !
काल रात्री खूपच उकडले.

आज गाडीत कोण गर्दी !
आज गाडीत अतोनात गर्दी होती.

काय अक्षर आहे त्याचे !
त्याचे अक्षर अतिशय सुंदर आहे.

मला लाख रुपये मिळाले तर !
मला लाख रुपये मिळावेत अशी तीव्र इच्छा आहे.

मी राज्याच्या मुख्यमंत्री असतो तर !
मला राज्याचा मुख्यमंत्री होण्याची फार इच्छा आहे.

## **३.होकारार्थी व नकारार्थी वाक्याचे परस्पररुपांतर**

पाचशे रुपये हि देखील मोठी रक्कम आहे. होकारार्थी
पाचशे रुपये हि लहान रक्कम नव्हे. नकारार्थी

हि काही वाईट कल्पना नाही. नकारार्थी
हि कल्पना बऱ्यापैकी आहे. होकारार्थी

हे आम्हाला सोयीचे नाही.
हे आम्हाला गैरसोयीचे आहे.

तो कोठे न थांबता बोलला.
तो अस्खलित बोलला.

त्याला इथे थांबवा.
त्याला पुढे जाऊ देऊ नका.

नोट्स फक्त मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

त्याचा अंर्ज फेटाळण्यात आला.
त्याचा अंर्ज स्वीकारण्यात आला नाही.

## ४.प्रयोगांचे परस्पर रुपांतर

मांजर उंदीर पकडते. कंर्तरी
उंदीर मांजराकडून पकडला जातो. कंर्मकंर्तरी

मी चहा घेतला. कंर्मणी
माझ्याकडून चहा घेतला गेला. कंर्मकंर्तरी

रामाने रावणास मारले. भावे
रावण रामाकडून मारला गेला. कंर्मकंर्तरी

## ५.मुख्य व गौण वाक्यांचे परस्पररुपांतर

जेंव्हा शाळेची घंटा झाली, तेंव्हा मी वंर्गात जावून पोहोचलो होतो.
जेंव्हा मी वंर्गात जाऊन पोहोचलो, तेंव्हा शाळेची घंटा अद्याप व्हायची होती.

घड्याळात नऊ वाजताच, तोच नळाचे पाणी गेले.
जेंव्हा नळाचे पाणी गेले, तेंव्हा घड्याळात बरोबर नऊ वाजले होते.

जे जे चकाकते ते ते सोने नव्हे.
जे जे सोने नसते तेदेखील कधी कधी चकाकते.

## ६.केवल, संयुक्त व मिश्र वाक्यांचे परस्पररुपांतर

मला ताप आला आहे. मी शाळेस येणार नाही.

केवल वाक्य - मला ताप आल्यामुळे मी शाळेस जाणार नाही.
संयुक्त वाक्य - मला ताप आला आहे, म्हणून मी शाळेस जाणार नाही.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

मिश्रवाक्य - मी शाळेस जाणार नाही, कारण मला ताप आला आहे.

## **७.शब्दांची जात बदलून वाक्यरचना करणे.**

श्रीमंत माणसांना गर्व असतो. विशेषण
श्रीमंतांना गर्व असतो. नाम

त्याच्या डोळ्यात पाणी आले. नाम
त्याचे डोळे पाणावले. क्रियापद

मी कागद टरकावून फेकून दिला. क्रियाविशेषण
मी कागद तरकावला व फेकून दिला. क्रियापद

हा मलगा हशार आहे. विशेषण
हा हुशार मुलगा आहे. सर्वनाम

## **८.अनेक शब्दांएवजी एक शब्द योजने.**

पंधरा दिवसातून भरणारी अशी आमची बैठक असते.
आमची पाक्षिक बैठक असते.

त्याच्यासारखा दुसरा कोणीच नाही असा तो योद्धा होता.

तो आदिवितीय योद्धा होता.

निराश्रित मुलांना आश्रय देणारी अशी एक संस्था त्यांनी काढली.
त्यांनी एक अनाथालय काढले.

जिचा नवरा वारला आहे अशी ती स्त्री आहे.
ती विधवा आहे.

त्या बाईला आता कोणतीही इच्छा राहिली नाही.

ती बाई निरीच्छ आहे.

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

या पुस्तकाच्या छपाईत कोणत्याच प्रकारचे दोष राहिले नाहीत.

या पुस्तकाची छपाई निर्दोष आहे.

## वाक्यरुपांतर प्रकारची काही महत्वाची उदाहरणे.

१.ताजमहाल खूप सुंदर आहे. विधानार्थी

किती सुंदर आहे ताजमहाल ! उद्‌गारार्थी

२.तुझ्या भेटीने खूप आनंद झाला. विधानार्थी

तुझ्या भेटीने किती आनंद झाला. उद्‌गारार्थी

३.पांढरा रंग सर्वाना आवडतो. विधानार्थी

पांढरा रंग सर्वाना कोणाला आवडत नाही ? प्रश्नार्थक

४.शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी सारे काही केले. विधानार्थी

शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काय केले नाही ?

शाळेच्या भल्यासाठी मुख्याध्यापकांनी काही करावयाचे बाकी ठेवले नाही. नकारार्थी

५.तुझे असे खराब अक्षर पाहून डोळे मिटावेसे वाटतात. होकारार्थी

तुझे असे खराब अक्षर अगदी बघवत नाही. नकारार्थी

६.सहलीत खूप मजा आली. होकारार्थी

काय मजा आली सहलीत !

७.किती सुंदर मूर्ती आहे हि ! उद्‌गारार्थी

हि मूर्ती खूप सुंदर आहे. होकारार्थी

८.गणेशचे हे चित्र खराब आहे. होकारार्थी

गणेशचे हे चित्र चांगले नाही. नकारार्थी

९.फक्त भारतीय संघच अजिंक्य आहे. होकारार्थी

भारतीय संघाशिवाय दुसरा कोणता संघ अजिंक्य आहे ?

१०.लोकांचे अज्ञान पाहून महात्म्याला दुख होते. होकारार्थी

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

लोकांचे दुख पाहून महात्म्याला सुख होत नाही. नकारार्थी

## भाषेचे अलंकार

भाषेला ज्या गुणधर्मांमुळे शोभा येते त्या गुणधर्मांना भाषेचे अलंकार असे म्हणतात.

भाषेच्या अलंकाराचे दोन प्रकार पडतात.
**१.शब्दालंकार २.अर्थालंकार**

## शब्दालंकार

**१.अनुप्रास -----** एखाद्या वाक्यात किंवा कवितेच्या चरणात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे जेंव्हा त्याला सौंर्दय प्राप्त होते तेंव्हा अनुप्रास हा अलंकार होतो.
उदाहरर्णाथ
गडद गडद निळे जलद भरुनी आले,
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले.

रजतनील, ताम्रनील
स्थिर पल जल पल सलील
हिरव्या तटी माळांचा कृष्ण मेळ खेळे

संत म्हणती, सप्त पदे सहवासे सख्य साधुंशी घडते

पेटविले पाषाण पठारावरती शिवबांनी
गळयामध्ये गरीबाच्या गाजे संताची वाणी

**२.यमक -----** कवितेच्या चरणाच्या शेवटी, मध्ये किंवा ठराविक ठिकाणी एक किंवा अनेक अक्षरे वेगळ्या अथाने आल्यास यमक या अलंकार होतो.
उदाहरर्णाथ
जाणावा तो ज्ञानी , पूण समाधानी , निसंदेह मनी, सर्वकाळ

राज्य गोदावरी, काढी तुझ्या आठवणी
फळा आली माय, मायेची आठवणी

पुष्पयमक या यमकाचे उदाहरण

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

सुसंगती सदा घडो, सृजनवाक्य कानी पडो,
कलंक मातीचा झडो, विषय सर्वथा नावडो

दामयमक या यमकाचे उदाहरण
आला वसंत कवीकोकील हाही आला,
आलापितो सुचवितो अरुणोदयाला

**<u>३.श्लेष -----</u>** एकच शब्द वाक्यात दोन अर्थांनी वापरल्यामुळे जेंव्हा शब्दचमत्कृती साधते तेंव्हा श्लेष हा अलंकार होतो. उदाहरर्णाथ

**मित्राच्या** उद्याने कोणाला आनंद होत नाही. **अभंग श्लेष**

हे मेघा, तू सर्वांना **जीवन** देतोस. **अभंग श्लेष**

ते शीतललोपचारे जागी झाले हळूच मग बोले **अभंग श्लेष**
औषध **नलगे** मजला, परिसुनी माता बरे म्हणुनी डोले

श्रीकृष्ण नवरा मी **नवरी** **सभंग श्लेष**
शिशुपाल नवरा मी **न-वरी**

कुस्करु नका हि **सुमने** **सभंग श्लेष**
जरी वास नसे तीळ यास, तरी तुम्हास आपिली **सु-मने**

वरील ओळींमधील नवरी, न-वरी, सुमने, सु-मने, नलगे, न-लगे अशा रीतीने त्या त्या शब्दांची फोड केल्यानंतर दोन अथ कळून येतात या प्रकारच्या श्लेषाला सभंग श्लेष व एकच शब्द जसाच तसा ठेवून त्याचे दोन अथ संभवतात त्यास अभंग श्लेष म्हणतात.

श्लेष हा शब्दालंकार आहे आणि अथालंकारहि आहे.

## <u>अर्थालंकार</u>

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

## १.उपमा

दोन वस्तूतील साम्य चमत्कृतीर्पूणरीतीने जिथे र्वणन केलेले असते तिथे उपमा हा अलंकार होतो. उदाहरर्णाथ

मुंबईची घरे मात्र लहान, क्बुतराच्या खुराड्यासारखी

सावळाच रंग तुझा पावसाळी नभापरी
आभाळागत माया तुझी आम्हावरी राहू दे

## २.उत्प्रेक्षा

उत्प्रेक्षा म्हणजे कल्पना. ज्या दोन वस्तूंची आपण तुलना करतो त्यातील एक म्हणजेच उपमेय हि जणू काही दुसरी वस्तूच म्हणजेच उपमानच आहे, अशी कल्पना करणे यालाच उत्प्रेक्षा म्हणतात. उदाहरर्णाथ

ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू.

अत्रीच्या आश्रमी, नेले मज वाटे, माहेरची वाटे, खरेखुरे

किती माझा कोंबडा मजेदार, मान त्याची कितीतरी मजेदार
शिरोभागी तांबडा तुरा हाले, जणू जास्वंदी फुल उमललेले
र्अधपायी पंढरीशी विजार, गमे विहंगातील बडा फौजदार

## ३.अपन्हुती

उपमेयाचा निषेध करून ते उपमानच आहे असे जेंव्हा सांगितले जाते तेंव्हा अपन्हुती अलंकार होतो. उदाहरर्णाथ

आई म्हणोनी कोणी, आईस हाक मारी
ती हाक येई कानी, मज होय शोककारी
नोहेच हाक माते, मारी कुणी कुठारी

ओठ कशाचे ? देठची फुलले पारिजातकाचे

हे ह्रद्य नसे, परी स्थंडिल धगधगलेले

मानेला उचलीतो, बाळ मानेला उचलितो

नाही ग बाई, फणा काढुनी नाग हो डोलतो

## ४.रूपक

नोट्स फुकट मिळत आहेत तर त्यांचा उपयोग करून द्या धन्यवाद

उपमेय व उपमान यात एकरूपता आहे, ती भिन्न नाहीत असे जेथे र्वणन असते तिथे रूपक अलंकार होतो. उदाहरर्णाथ

लहान मूल म्हणजे मातीचा गोळा, आकार दयावा तशी मूर्ती घडते.

उठ पुरुषोत्तमा, वाट पाहे रमा

दावी मुखचंद्रमा सकळीकांसी

बाई काय सांगो, स्वामीची ती दृष्टी

अमृताची वृष्टी, मज होय.

## **५.व्यतिरेक**

उपमेय हे उपमानापेक्षा श्रेष्ठ आहे असे र्वणन केले असेल तर व्यतिरेक हा अलंकार होतो. उदाहरर्णाथ अमृताहून गोड, नाम तुझे देवा

कामधेनुच्या दुग्धाहुनही ओज हीच बलवान

तू माउलीहून मयाळ, चंदाहून शीतळ,
पानियाहुनी पातळ, कल्लोळ प्रेमाचा

सावळा ग रामचंद्र, रत्नमंचकी झोपतो,
त्याला पाहता लाजून, चंद्र आभाळी लोपतो

## **६.अनन्वय**

उपमेयाला दुसऱ्या कशाचीच उपमा देता येत नसेल म्हणजे जेंव्हा उपमेयाला उपमेयाचीच उपमा दिली जाते तेंव्हा अनन्वय अलंकार होतो. अन्वय = संबंध  उदाहरर्णाथ

झाले बहु, होतील बहु, आहेताही बहु, परंतु यासम हा

आहे ताजमहाल एक जगती तो तोच त्याच्यापरी

या दानासी या दानाहुन अन्य नसे उपमान

## **७.भ्रांतीमान**

उपमानाच्या जागी उपमेयच आहे असा भ्रम र्निमाण होऊन तशी काही कृती घडली तर तिथे भ्रांतीमान अलंकार असतो. उदाहरर्णाथ

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

हसा विलोकुनी सुधाकर अष्टमीचा,
म्या मनिला नितीलदेश तिचाच साचा
शंख द्वयी धरुनी कुंकुम किरवाणी
लावाक्या तिलक लांबविला स्वपाणी

भृंगे विराजित नवी अरविंदपत्रे,
पाहुनी मानुनी तिचीच विशाल नेत्रे
घालीन अंजन अशा मातीने तटाकी
कांते वृथा उतरलो, भिजलो विलोकी

## ८.संसदेह

उपमेय कोणते किंवा उपमान कोणते असा संदेह किंवा संशय र्निमाण होऊन मनाची जी द्विधा अवस्था होते त्या वेळी संसदेह हा अलंकार असतो. उदाहर्णाथ

चंद्र काय असे, किंवा पद्य या संशयान्तरी,
वाणी मधूर ऐकोनी कळले मुख ते असे

चांदण्या रात्री गच्चीवर पत्नीच्या मुखाकडे पाहताना पतीला वाटले -
कोणता मानू चंद्रमा ? भूवरीचा कि नभीचा ?
चंद्र कोणता ? वदन कोणते ?
शशांक मुख कि मुख शशांक ते ?
निवडतील निवडोत जाणते
मानी परी मन सुखद सभ्रमा मानू चंद्रमा, कोणता ?

---

## ९.अतिशयोक्ती

कोणतीही कल्पना आहे त्यापेक्षा खूप फुगवून सांगताना त्यातील असंभाव्यता अधिक स्पष्ट करून सांगितलेली असते त्या वेळी अतिशयोक्ती हा अलंकार होतो. उदाहरर्णाथ

दमडीच तेल आणल, सासूबाईच न्हान झाल,
मामंजीची दाढी झाली, भावोजींची शेंडी झाली,
उरल तेल झाकून ठेवल, लांडोरीचा पाय लागला,
वेशीर्पयत ओघळ गेला, त्यात उंट पोहून गेला.
जो अंबरी उफळता खुर लागलाहे
तो चंद्रमा नीज तनुवरी डाग लाहे

काव्य अगोदर झाले नंतर जग झाले सुंदर

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

रामायण आधी मग झाला राम जानकीवर

## १०.दृष्टांत

एखाद्या विषयाचे र्वणन करून झाल्यानंतर ती गोष्ट पटवून देण्यासाठी त्याच र्अथाचा एखादा दाखला किंवा उदाहरण दिल्यास दृष्टांत अलंकार होतो. उदाहर्णाथ

लहानपण दे गा देवा, मुंगी साखरेचा रवा,
ऐरावत रत्न थोर, त्यासी अंकुशाचा मार

न कळता पद अग्नीवरी पडे, न करी दाह असे न कधी घडे
अजित नाम वदो भलत्या मिसे, सकल पातक भस्म करीतसे

## ११.अर्थांतरन्यास

एखाद्या सामान्य विधानाच्या सर्मथनात विशेष उदाहरणे किंवा विशेष उदाहरणांवरून शेवटी एखादा सामान्य सिद्धांत काढला तर अर्थांतरन्यास हा अलंकार होतो. (अर्थांतर -दुसरा र्अथ, न्यास = शेजारी ठेवणे) उदाहर्णाथ

बोध खलास न रुचे अहिमुखी दुग्ध होय गरल
श्वानपूछ नलिकेत घातले होईना सरळ

एका हाते कधीतरी मुली वाजते काय टाळी ?

सावळा वर बरा गौर वधूला

जातीच्या सुंदराना काहीही शोभते

मूळ स्वभाव जाईना

का मरणी अमरता हि न खरी ?

अत्युची पदे थोरही बिघडतो हा बोल आहे खरा

## १२.स्वभावोक्ती

एखाद्या व्यक्तीचे, प्राण्याचे, वस्तूचे त्याच्या स्वाभाविक स्थितीचे किंवा हालचालीचे यर्याथ म्हणजेच हुबेहूब पण वैशिष्ट्यर्पूण र्वणन हाही भाषेचा एक अलंकार ठरतो याला स्वभावोक्ती अलंकार असे म्हणतात. उदाहर्णाथ

नोट्स फक्त मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

गणपत वाणी विडी पिताना चावायचा नुसतीच काडी,
म्हणायचा अन मनाशीच कि हया जागेवर बांधीन माडी,
मिचकावुनी मग उजवा डोळा आणि उडवूनी डावी भिवई,
भिरकवुनी तो तशीच द्यायचा लकेर बेचव जशी गवई

पोटीच एक पद लांबविला दुजा तो,
पक्षी तनु लपवी, भूप तया पाहतो

मातीत ते पसरले अतिरम्य पंख,
केले वरी उदर पांडूर निष्कलंक ,
चंचू तशीच उघडी पद लांबविले
निष्प्राण देह पडला श्रमही निमाले

## १३.अन्योक्ती

ज्याच्याबद्दल बोलायचे त्याच्याबद्दल काहीच न बोलता दुसऱ्याबद्दल बोलून आपले मनोगत व्यक्त करण्याची जी पद्धत तिलाच अन्योक्ती असे म्हणतात. अन्योक्तीला अप्रस्तुत प्रशंसा असेही म्हणतात. उदाहर्णाथ

येथे समस्त बहिरे बसतात लोक, का भाषणे मधून तू करीशी अनेक
हे मूर्ख यास किमपिही नसे विवेक, रंगावरून तुझला गणतील काक

## १४.पर्यायोक्त

एखादी गोष्ट सरळ शब्दात न सांगता ती अप्रतेक्ष रीतीने सांगणे यास पर्यायोक्त असे म्हणतात. उदाहर्णाथ

त्याचे वडील सरकारचा पाहुणचार घेत आहेत.

काळाने त्याला आमच्यातून हिरावून नेले.

तू जे सांगतोस ती कल्पित कथा वाटते.

## १५.विरोध किंवा विरोधाभास

एखाद्या विधानात वरचेवर दिसायला विरोध आहे असे वाटते पण वास्तविक तसा विरोध नसतो अशा ठिकाणी विरोधाभास हा अलंकार असतो. उदाहर्णाथ

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

कठोर वज्रापेक्षाही मृदू पुष्पाहुनी अशी,
लोकोत्तरांची हृदये कळती न कुणासही

वियोर्गाथ मिलन होते नेम हा जगाचा

जरी आंधळी तरी मी तुला पाहते

स्वतःसाठी जगलास तर मेलास, दुसऱ्यासाठी जगलास तरच जगलास

सर्वच लोक बोलू लागले कि कुणीच ऐकत नाही.

## १६.असंगती

कारण एका ठिकाणी आणि त्याचे र्काय दुसऱ्या ठिकाणी असे जिथे र्वणन असते तेथे असंगती अलंकार होतो. उदाहरर्णाथ

कुणी कोडे माझे उकलील का ? कुणी शास्त्री रहस्य कळवील का ?
हृदयी तुझ्या सखी दीप पाजळे, प्रभा मुखावरी माझ्या उजळे
नवरत्ने तू तुज भूषविले, मन्मन खुलले आतील का ?
गुलाब माझ्या हृदयी फुलला, रंग तुझ्या गालावर खुलला.
काटा माझ्या पायी रुतला, शूर तुझ्या उरी कोमल का ?
माझ्या शिरी ढग निळा डवरला, तुझ्या नयनी पाऊस खळखळला
शरच्चंद्र या हृदयी उगवला, प्रभा तुझ्या उरी शीतल का ?

## १७.सार

एखाद्या वाक्यातील कल्पना चढत्या क्रमाने मांडून उत्कर्ष किंवा अपर्कष साधलेला असतो तेंव्हा सार हा अलंकार होतो. उदाहरर्णाथ

आधीच मर्कट तशातही मद्य प्याला, झाला तशात जरी वृश्चिक दंश त्याला
झाली तयास तदनंतर भूतबाधा, चेष्टा वदू मग किती कापिच्या अगाचा

काव्यात नाटके रम्य, नाटकांत शकुंतला,
त्यामध्ये चौथा अंक, त्यातही चार श्लोक ते

वाट तरी सरळ कुठे पंदितील सारी, त्यातून तर आज रात्र अंधारी भारी

आणि बैल कसल्याही बुजती आवाजा, किरकिरती रातकिडे झाल्या तिन्हीसांजा

## **१८.व्याजस्तुती**

बाह्यत स्तुती पण आतून निंदा किंवा बाह्यतः  निंदा पण आतून स्तुती असे जिथे र्वणन

असते तिथे व्याजस्तुती हा अलंकार असतो. उदाहरर्णाथ
होती वदनचंद्राच्या दर्शनाचीच आस ती,

र्अधचंद्रच तू दयावा, कृपा याहून कोणती ?

सर्वास सर्व देशी मिथ्या हि चव स्तुती महीपाला
न परस्त्रिया दिले त्वा वक्ष, न वा पृष्ठ तव विपक्षाला

म्हणूनिया आलो तेंव्हा परतुनी घराला
काव्य ऐकविले ते सहर्धमचारीनीला

गानलुब्ध तीही होई झोप ये तियेला
काव्यरसिक तिजसम कोणी जगामधी असेल ?

## **१९.व्याजोक्ती**

एखाद्या गोष्टीचे खरे कारण लपवून दुसरेच कारण देण्याचा प्रयत्न जेथे होतो तेथे व्याजोक्ती हा अलंकार असतो. उदाहरर्णाथ
येता क्षण वियोगाचा पाणी नेत्रांमध्ये दिसे,
डोळ्यांत काय गेले हे ? म्हणुनी नयना पुसे

काग गे बघशी मागे वळूनी वळूनी अशी ?
विचारीता म्हणे, माझी राहिली पिशवी कशी ?

## **२०.चेतनगुणोक्ती**

निर्सगातील निर्जीव वस्तू सजीव आहेत अशी कल्पना करून त्या मनुष्याप्रमाणे वागतात किंवा कृती करतात असे जिथे र्वणन असते तिथे चेतनगुणोक्ती हा अलंकार होतो. उदाहरर्णाथ
आला हा दारी उभा वसंत फेरीवाला
पोते खांद्यावरी सौद्याचे, देईल ज्याचे त्याला

कुटुंबवत्सल इथे फणस हा, कदीखांद्यावर घेवून बाळे
कथित त्याला कुशल मुलांचे, गंगाजळीचे बेत आगळे

नोट्स फुकट मिळत असले तर कृपया उपयोग करून द्या धन्यवाद

# <u>शब्दांच्या शक्ती, रस व काव्यगुण</u>

## <u>अभिधा ( वाच्यार्थ )</u>

र्अथ व्यक्त करण्याची शब्दाची जी शक्ती असते तिला अभिधा असे म्हणतात. या अभिधा शक्तीच्या सहाय्याने प्रगट होणाऱ्या र्अथास वाच्र्याथ असे म्हणतात. उदाहरर्णाथ

साप मारायला हवा.

मी एक लांडगा पाहिला.

आमच्याकडे एक अमेरिकन कुत्रा आहे.

बाबा जेवायला बसले.

घरात फार जळवा झाल्या आहेत.

आम्ही गहू खरेदी केला.

## <u>व्यंजना (व्यंगार्थ)</u>

मूळ र्अथाला बाधा न आणता दुसरा र्अथ व्यक्त करण्याची शब्दाची जी शक्ती असते तिला व्यंजना असे म्हणतात. या शक्तीने प्रकट होणाऱ्या र्अथाला व्यंर्गाथ असे म्हणतात.

उदाहरर्णाथ

समाजात वावरणारे असले साप ठेचून काढले पाहिजेत.

भुंकणारे कुत्रे चावत नसतात.

निवडणुका आल्या कि कावळ्याची कावकाव सुरु होते.

समाजातील असल्या जळवा वेळीच नष्ट केल्या पाहिजेत.

घड्याळाने पाचचे ठोके दिले.

## <u>लक्षणा (लक्षार्थ)</u>

शब्दाच्या मूळ र्अथाला बाधा येत असेल तर त्याला जुळेलसा दुसरा र्अथ घ्यावा लागतो, शब्दाच्या या शक्तीस लक्षणा शक्ती असे म्हणतात व या शक्तीमुळे प्रगट होणाऱ्या र्अथास लर्क्षाथ असे म्हणतात. उदाहरर्णाथ

चला, पानावर बसा.

आम्ही गहू खातो.

बाबा ताटावर बसले.

आम्ही आजकाल ज्वारी खातो.

र्सूय बुडाला.

फुकट मिळाले आहे तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

पानिपतावर सव्वा लाख बांगडी फुटली.

## थोडक्यात पण महत्वाचे

विस्मय हा स्थायीभाव अदभूत रसाचा आहे.

स्थायीभावाना प्रदिप्त करणारे विभाव असतात.
प्रेमाच्या विफलतेतून निमाण होणारा शृंगार --- विप्रलंभ

## वाक्प्रचार व म्हणी

शब्दशः होणाऱ्या अर्थापेक्षा भिन्न व विशिष्ट अर्थाने रूढ होऊन बसलेल्या शब्दसमूहाला वाक्प्रचार असे म्हणतात. यालाच कोणी वाक्संप्रदाय असेही म्हणतात.

## फक्त परीक्षेच्या दृष्टीने महत्वाचे वाक्प्रचार येथे देत आहे.

उजेड पाडणे - मोठे काम करणे.

ओनामा - प्रारंभ

काखा वर करणे - जवळ काही नसणे.

घागरगडाचा सुभेदार - पाणक्या

चहा करणे - स्तुती करणे.

जीवाची उलघाल होणे - खूप भीती वाटणे.

त्राटिका - कजाग बायको

धूळभेट - उभ्या उभ्या झालेली भेट

बिनभाड्याचे घर - तुरुंग.

षटकरणी होणे - गुप्त गोष्ट तिसऱ्यास सांगणे

शेणसडा होणे - परीस्थिती वाईट होणे / वाया जाणे

सदगदित होणे - गहिवरणे

सव्यापसव्य करणे - यातायात करणे.

हात ओला करणे - पैसा किंवा भोजन मिळणे

हात धरणे - वरचढ ठरणे

एरंडाचे गुऱ्हाळ - कंटाळवाणे भाषण करणे.

कणीक तिंबणे - मार देणे.

गुण उधळणे/पाजळणे - दुर्गुण दाखविणे

चर्तुभज होणे - कैद होणे, लग्न होणे.

चुरमुरे खात बसणे - खजील होणे.

तोंड टाकणे - बरळणे

थंडा फराळ करणे - उपाशी राहणे.

पोटास चिमटा घेणे - अर्धपोटी राहणे

वाखाणणी करणे - स्तुती करणे.

सुंबाल्या करणे - पळून जाणे

## समानार्थी शब्द

अनल ----- विस्तव, पावक, अग्नी, वन्ही

अमृत ----- सुधा, पियुष

नोट्स फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

अरण्य ----- रान, कानन, वन, विपिन, जंगल

अश्व ----- घोडा, हय, तुरंग, वारू, वाजी

अही ----- साप, र्सप, भुजंग

आकाश ----- गगन, अंबर, नभ, ख, आभाळ

आश्चर्य ----- नवल, अचंबा, विस्मय

कमळ ----- राजीव, अंबुज, पंकज, सरोज, पद्म

कावळा ----- काक, वायस, एकाक्ष

काळोख ----- अंधार, तिमिर, तम

खल ----- दृष्ट, नीच, र्दुजन

चंद्र ----- इंदू, सुधाकर, हिमांशू, रजनीनाथ, शशी

चांदणे ----- कौमुदी, ज्योत्स्ना, चंद्रिका

झाड ----- तरू, वृक्ष, पादप, द्रुम

तलाव ----- तडाग, सरोवर, कासार

दिवस ----- वार, वासर, अहन

देव ----- सूर, ईश्वर, अमर, निंर्मिक

धनुष्य ----- धनु, चाप, कोदंड, र्कामुक

नदी ----- सरिता, तटिनी, तरंगीणी

नवरा ----- पती, कांत, र्भता, धव, भ्रतार

पत्नी ----- र्भाया, बायको, कांता, दारा, जाया

पर्वत ----- नग, अभी, शैल, गिरी

पाणी ----- जल, अंबू, पय, उदक, जीवन, सलील, वारी

पान ----- र्पण, पत्र, पल्लव

पृथ्वी ----- धरणी, अवनी, भूमी, धरती, वसुंधरा, क्षमा

पोपट ----- राघू, रावा, शुक

फुल ----- पुष्प, सुमन, कुमुद, सुम

भाऊ ----- भ्राता, बंधू, सहोदर

भुंगा ----- भ्रमर, अली, मिलिंद, मधुप

मुलगा ----- पुत्र, सुत, नंदन, तनुज

मुलगी ----- सुता, तनया, आत्मजा, नंदिनी

डोळा ----- नयन, लोचन, चक्षु, नेत्र

ढग ----- जलद, पयोधर, घन, मेघ, अभ्र

युद्ध ----- रण, समर, संगर, संग्राम, लढाई

नोटस पुस्तक मिळत असेल तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

रस्ता ----- वाट, पथ, पंथ, र्माग

राजा ----- भूप, नृप, नरेश, भूपाल, पृथ्वीपती

रात्र ----- रजनी, यामिनी, निशा

लक्ष्मी ----- श्री, रमा, कमला, इंदिरा, वैष्णवी

वस्त्र ----- पट, अंबर, वसन, कपडा

वानर ----- कपी, मर्कट, शाखामृग

वारा ----- अनिल, पवन, वायु, समीरण

वीज ----- चपला, तडित, बिजली, सौदामिनी

शत्रू ----- अरी, रिपू, वैरी, दुष्मन

समुद्र ----- सागर, सिंधू, र्अणव, रत्नाकर

सिंह ----- केसरी, पंचानन, मृगेंद्र, वनराज

स्त्री ----- ललना, महिला, वनिता, नारी, अबला

र्सूय ----- मित्र, रवी, आदित्य, सविता, भानू, भास्कर

सोने ----- कनक, सुर्वण, हेम, कांचन

हत्ती ----- गज, कुंजर, सारंग, नाग

हात ----- कर, हस्त, पाणि, भूज, बाहू

क्षय ----- क्षीण, नाश, ह्रसत्व

**<u>विरुधार्थी शब्द .शब्दसमूहाबद्दल एक शब्द, म्हणी सर्व पुस्तकातून वाचणे.</u>**

नोटस फुकट मिळत आहे तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

## <u>विरामचिन्हे</u>

| क्रमांक | चिन्हाचे नाव | चिन्ह | केव्हा वापरतात ? | उदाहरण |
|---|---|---|---|---|
| १ | पूर्णविराम | . | विधान किंवा वाक्य पूर्ण झाले हे दाखविण्यासाठी<br>शब्दांचा संक्षेप दाखविण्यासाठी | तो घरी गेला.<br>पू.ल.देशपांडे |
| २ | र्अधविराम | ; | दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असताना | ढग खूप र्गजत होते; पण पाऊस झालाच नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | स्वल्पविराम | , | एकाच जातीचे अनेक शब्द लागोपाठ आल्यास --------------------------------<br>संबोधन दर्शविताना ---- मधु, इकडे ये | हुशार, अभ्यासू, खेळकर व आनंदी मुले सर्वांना आवडतात. |
| ४ | अर्पण विराम (उपपूर्णविराम) | : | वाक्याच्या शेवटी तपशील द्यावयाचा असल्यास | पढील क्रमांकाचे बिद्यार्थी उत्तीण झाले : १,८,१४,२७,४० |
| ५ | प्रश्नचिन्ह | ? | प्रश्नार्थक वाक्याच्या शेवटी | तू केंव्हा आलास? |
| ६ | उद्गारचिन्ह | ! | उत्कट भावना व्यक्त करताना ती दाखविणाऱ्या शब्दाच्या शेवटी | अरेरे ! तो नापास झाला. |
| ७. | अवतरण चिन्ह<br>दुहेरी<br><br>एकेरी | " "<br><br>' ' | बोलणाऱ्याच्या तोंडचे शब्द दाखवण्याकरिता<br><br>एखाद्या शब्दावर जोर द्यावयाचा असल्यास तसेच मुख्य गोष्ट सूचित करण्यासाठी<br><br>दुसऱ्याचे मत अप्रत्येक्ष सांगताना | तो म्हणाला, "मी येईन."<br><br>मुलध्वनीन 'र्वण' असे म्हणतात.<br><br>'व्याकरणाचा अभ्यास महत्वाचा' असे त्यांनी सांगितले. |
| ८ | संयोगचिन्हे | - | दोन शब्द जोडताना<br><br>ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास | विद्यार्थी-भांडार, प्रेम-विवाह<br><br>आजचा र्कायक्रम शाळे-<br>पुढील पटांगणावर होईल. |
| ९ | आपसारण चिन्ह (स्पष्टीकरण चिन्ह) | -- | बोलता बोलता विचारमालिका तुटल्यास<br><br>स्पष्टीकरण द्यावयाचे असल्यास | मी तिथे गेलो पण --<br><br>तो मुलगा - ज्याने बक्षीस मिळवले - |

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | आपल्या शाळेत आहे. |

## <u>लेखनविषयक नियमावली</u>

<u>लेखनविषयक नियमांनुसार मराठीत पुढीलप्रमाणे शब्द लिहिले जातात.</u>

आंबा, तंतू, घंटा, हिंग, सुंठ, गमंत, करंजी, गुलकंद, गंगा, कुंकू, तंटा, चिंच, उंट, कंकण, निबंध, अलंकार

संयम, संरक्षण, संलग्न, संवाद, संशय, संसार, सिंह, अंश, संस्कार, मांस, संस्था, संहार, संयुक्त, कंस

मुलांस, घरांत, त्यांचा, त्यांसाठी, देशांसाठी

मी, ही, तू, धू, जू, ऊ, ती, जी, पी, बी, पू, रू

आई, वाटी, टोपी, चेंडू, बाळू, खेळू, पिशवी, चुलती, वही, काठी, पेटी, दांडू, वाळू, बोरू, गिरणी, सुपारी

कवी, हरी, मधू, गुरु, वायू, प्रीती

हरी, अन्योक्ती, अतिथी, विभक्ती, संधी, कुलगुरू

कविराज, लघुकथा, वायुपुत्र, मृत्युलेख, गुरुदक्षिणा, भक्तीपर, हरिकृपा, शत्रूपक्ष, पशुपक्षी, रविवार, भानुविलास, गतिमान

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून द्या धन्यवाद

लक्ष्मीपुत्र, महीपाल, पृथ्वीतल, भूगोल, वधूपरीक्षा, वाणीवैभव, गौरीहर, दासीजन, वधूवर, श्रीधर, नदीतीर, भगिनीमंडळ

विद्यार्थी, प्राणी, पक्षी, मंत्री, गुणी, धनी, योगी, स्वामी

विद्यार्थीगृह, प्राणीसंग्रह, पक्षिगण, मंत्रिमंडळ, स्वामिभक्त, योगिराज

परंतु, अद्यपि, तथापि, अति, इति, यद्यपि, यथामति

खीर, पीठ, फूल, सून, गरीब, कठीण, नाईक, हुरूप, विहीर, दीर, नीट, मूल, ऊस, बहीण, जमीन, ठाऊक, घेऊन, वसूल
गुण, युग, विष, प्रिय, मधूर, बहुत, मंदिर, अनिल परिचित, स्थानिक, बुध, सुख, हिम, शिव, कुसुम, तरुण, रसिक, चतुर, नागरिक, सामाजिक

किडा, गुणी, पिसू, मेहुणा, सरिता, वकिली, पाहिजे, मिळवितो, दिवा, सुरी, सुरु, तालुका, गरिबी, महिना, ठेविले, फसविले

पूजा, भीती, प्रीती, पूर्व, दीप, पीडा, नवीन, संगीत, लीला, नीती, कीर्ती, चूर्ण, नीच, क्रीडा, शरीर, परीक्षा

नागपूर, एखादा, कोणता, हळूहळू, तसूतसू, मुळूमुळू

अर्थात, क्वचित, तस्मात, साक्षात, विद्वान, कदाचित, परिषद, पश्चात, किंचित, विद्युत, सम्राट, श्रीमान, भगवान, संसद

ही

नोटस फुकट मिळत आहेत तर चांगला उपयोग करून घ्या धन्यवाद

## <u>लेखनातील शुद्ध शब्द</u>

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| कल्पना | अशा | चमत्कार | तत्पर | दप्तर | शब्द | शुद्ध | उदाहरण |
| जास्त | भूगोल | सिंह | संसार | | | | |
| | | | | | | | |
| आध्यात्मिक | अतिथी | अनसूया | आशीर्वाद | ऊर्मी | ऊहापोह | उष्ण | कोट्यधीश |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| उज्ज्वल | मथितार्थ | मंदिर | महत्त्व | माहात्म्य | रवींद्र | विध्यर्थ | साहाय्य |
| साह्य | सहायक | सुशीला | सुज्ञ | नैऋत्य | र्निभ | नावीन्य | तत्त्व |
| गृहपाठ | | | | | | | |
| | | | | | | | |
| जादा | तिसरा | दुकान | दुसरा | पहिला | पाणी | पोलीस | मदत |
| सफेत | अध:पात | अंधकार | घनश्याम | धिक्कार | नि:स्पृह | पृथक्करण | दु:ख |
| मन:स्थिती | हाहाकार | | | | | | |
| | | | | | | | |
| अंगुष्ठ | बलिष्ठ | कनिष्ठ | सृष्ट | ज्येष्ठ | वरिष्ठ | विशिष्ट | उत्कृष्ट |
| | | | | | | | |
| इशारा | दृश्य | लेश | विशद | विषाद | विशेष | शुश्रूषा | |
| | | | | | | | |
| अलीकडे | आवश्यक | अधीन | अंग | इस्त्री | इयत्ता | उच्च | उग्र |
| उद्योगीकरण | खाऊन | जेवून | सशाचा | दक्षिणा | दूर्वा | | विनंती |

छापलेला उतारा पाहून तो वहीत उतरविणे याला अनुलेखन असे म्हणतात.

पुस्तकात पाहून उतारा लिहिण्याबरोबरच ऐकलेला मजकूर जसाच तसा योग्य विरामचिन्हांसह सुवाच्च अक्षरात बिनचूक लिहून दाखविणे याला श्रुतलेखन असे म्हणतात.

**<u>लेखनविषयक महत्वाचे</u>**

स्पष्टोच्चारीत अनुनासिकांबद्दल शीर्षबिंदू, अनुस्वार, टिंब द्यावा.

एकाक्षरी शब्द नेहमी दीर्घ लिहावा.

मराठी भाषेत शब्दाच्या शेवटी येणारा इकार किंवा उकार नेहमी दीर्घ लिहावा.

मराठी भाषेतील अंत्य अक्षर दीर्घ स्वरांत असेल तर उपांत्य इकार वा उकार ह्रस्व असतो.

अन हा शब्द व्यंजनांत लिहावा.

नोटस फक्त मिळत आहेत त्यांचा उपयोग करून घ्या धन्यवाद